।। श्रीराम ।।

श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प क्र. ९७

ॐ

# पूर्णकळा

प.पू.सद्गुरू श्रीदासराममहाराज केळकर लिखित
गुरूपाठ, श्रीगुरूपाठ व सद्गुरूपर अभंग

भावार्थ विवरण
**श्री.नारायण रघुनाथ देशपांडे**

प्रकाशक
**सौ. गायत्री गोविंद कुलकर्णी**

आवृत्ती पहिली सांगली सन २०२४

श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प क्र.९७

# पूर्णकळा

(प.पू.सद्गुरू श्रीदासराममहाराज केळकर लिखित गुरूपाठ, श्रीगुरूपाठ व सद्गुरूपर अभंग)

भावार्थ विवरण - श्री. नारायण रघुनाथ देशपांडे, मिरज

**प्रकाशक** सौ. गायत्री गोविंद कुलकर्णी
क्यू ३०३, मेघमल्लार द्वारा प्र.गो.कुलकर्णी,
डी.एस.के. विश्व, धायरी, पुणे ४११०४१

**प्रथम आवृत्ती इ.स.२०२४**

**प्रकाशन दिन** : १३ फेब्रुवारी,२०२४ माघ शुद्ध चतुर्थी
(श्रीगणेश जयंती) शके १९४५

© **सर्व हक्क श्री. दीपक चंद्रशेखर केळकर यांचे स्वाधीन**

अक्षर जुळणी : **श्री.भालचंद्र विनायक सहस्रबुद्धे**

मुद्रक :

**स्वागत मूल्य** : रु.१००/-

**प्रत मिळणेचे ठिकाण :**
श्री. दीपक चंद्रशेखर केळकर
घ.नं.८२७, श्रीराम निकेतन,श्री.बापूरावजी केळकर वाडा,
सेनामंदिर रोड, गावभाग, सांगली ४१६४१६.
दूरध्वनी :०२३३-२३३१७४७
भ्रमणध्वनी : ९८२२००७५२८/९४२०५७४५७०
ईमेल - kelkarnana@gmail.com



# पूर्णकळा

## प्रस्तावना

**।। गुरूपाठ करी गुरूपाठ करी । गुरूलिंग वरी कृपाछत्र ।।**

चिमड संप्रदाय हा ‘स्वरूप संप्रदाय’ आहे, तसाच तो ‘गुरूसंप्रदाय’ आहे. या संप्रदायात सद्गुरूंना अनन्यसाधारण महत्व आहे. श्रीदासराममहाराजांनी अनेक पारमार्थिक विषयावर विपुल प्रमाणात वाङ्मय लिहिलेले आहे. त्यातही त्यांनी लिहलेल्या गुरू-सद्गुरू या विषयांवरील अभंगांना विशेष स्थान आहे. या अभंगांमधून सद्गुरूंचे स्वरूप, कार्य इत्यादि विषयाचा उहापोह करताना, आगम-निगम विषयक पारमार्थिक सिद्धांतही सोप्या भाषेमध्ये मांडलेले आहेत.

श्रीदासराममहाराजांनी लिहिलेल्या अनेक अभंगांपैकी, ‘गुरू’ या विषयाच्या संदर्भाने, त्यांनी लिहिलेल्या त्रेपन्न अभंगांचा अभ्यास विवरण पद्धतीने करण्याचा प्रयत्न येथे केलेला आहे. या त्रेपन्न अभंगांपैकी, ‘सद्गुरू’ या शीर्षकाखाली पंचवीस अभंग असून, ‘श्रीगुरूपाठ ३७/१’, ‘गुरूपाठ ३७/२’ या शीर्षकांखाली उर्वरित अठ्ठावीस अभंग आहेत. पहिल्या ‘सद्गुरू’ या भागातील पंचवीस अभंग हे दासरामगाथा, दासरामगाथा पुरवणी व अक्षरधारा या ग्रंथांमधून घेतले असून, दुसऱ्या ‘श्रीगुरूपाठ ३७/१’, ‘गुरूपाठ ३७/

२' या भागातील अभंग दासरामगाथा व दासरामगाथा पुरवणी यातून घेतलेले आहेत.

**भाग पहिला - सद्गुरू म्हणजे काय ?**

या पहिल्या भागातील पंचवीस अभंगांमधून, सद्गुरूंचे स्वरूप, त्यांचे कार्य व महात्म्य यांचे वर्णन आलेले आहे. गुरू ही एक व्यक्ती नसून, ती एक शक्ती आहे. गुरू एक तत्त्व आहे. '**सद्रुपी ओळख करी तो सद्गुरू.**' जे सत्ब्रह्माची ओळख करून देतात, ते सद्गुरू होत. सद्गुरू हे ब्रह्मरूप असतात. ब्रह्म हे सच्चिदानंद आहे, म्हणून सद्गुरू हे देखील सच्चिदानंदरूपाने सर्वव्यापक आहेत. केवळ शुद्ध व सूक्ष्म बुद्धिच या तत्त्वाचा वेध घेऊ शकते. आत्मरूपाप्रमाणे सद्गुरूना नाश नाही. देहरूपाने ते असोत वा नसोत, परब्रह्माप्रमाणे पूर्णत्वाने ते चराचराला व्यापून असतात. ब्रह्म हे एकमेवाद्वितीय, भेदरहित, अखंडत्वाने सर्व व्याप्त आहे. परात्परसद्गुरूही अशाच स्वरूपाने असतात. चिदाकाशातील सोऽहंआत्मा, हे सद्गुरूंचेच रूप आहे. साधनसमयी त्याची प्रचीति येते.

**अ) सद्गुरूंचे कार्य :-**

मानवी देहामध्ये व विश्वामध्ये, गुप्तरूपाने वसत असलेले चैतन्य, साधकजीवाला प्रगट करुन दाखविण्याचे महत्वाचे कार्य सद्गुरू करतात. साधनकाळी सत्क्रिया कशी आचरावी हे सद्गुरू स्वतः क्रिया करून दाखवितात. सद्गुरू हे कल्पतरू व पूर्णकाम



असतात. सद्गुरू हे शिष्याच्या सर्व इच्छांचाच निरास करून, त्याला निष्काम करतात. कारण वैराग्याशिवाय आत्मज्ञान होणार नाही, झालेच तर टिकणार नाही. म्हणून वैराग्यप्राप्ती ही सद्गुरुकृपेची मोठी खूण आहे. आडमार्गी जाणाऱ्या साधकाला पुन्हा योग्य त्या मार्गावर आणून, साधनमार्गावर तो कसा अग्रेसर होईल याची ते काळजी घेतात. थोडक्यात म्हणजे, आई जशी आपल्या बालकाचा सर्वतोपरी सांभाळ करते, तसे सद्गुरूही आपल्या शिष्याचा सांभाळ करतात. त्याचे सर्वार्थाने पारमार्थिक पोषण करतात व त्याला आपल्याप्रमाणेच आत्मरूप करतात.

**ब) सद्गुरूंचे महात्म्य :-**

'गुरू' हे या जगात सर्वश्रेष्ठ असून, त्या सम कोणीही नाही. 'गुरू हाचि देव' सद्गुरू हे देवरूपच असतात. तसेच संत-महात्मे हे देखील सद्गुरूंचीच रूपे आहेत. सद्गुरू हे आत्मरूप असतात. आत्मा सुखरूप, आनंदरूप व ज्ञानरूप आहे. म्हणून सद्गुरू हे देखील ज्ञानरूप असतात. ते प्रत्यक्ष सुखाचा/ आनंदाचा ठेवा असतात. सद्गुरू हे ब्रह्मनिष्ठ असतात. तसेच ते अत्यंत दयाळू व करुणाकर असतात. त्यांचे हृदय हे करुणरसाने भरलेले असते. आपल्या शिष्याचे भक्तीप्रेम पाहून ते धावून येतात. अशा सद्गुरूंना आपले ध्येय मानून/प्राप्तव्य मानून त्यांचे ध्यान करणे, त्यांचे अनुसंधान ठेवणे, त्यांची सेवा करणे, हीच खरी गुरूभक्ती होय. जगद्गुरू संत श्रीतुकाराममहाराज, ब्रह्मचैतन्य श्रीगोंदवलेकरमहाराज,

श्रीमामामहाराज अशा अनेक संत महात्म्यांचे ठिकाणी ते एकच 'गुरूतत्त्व' विलसत असते.

**भाग २रा - गुरूपाठ म्हणजे काय?**

श्रीज्ञानदेवांचा 'हरिपाठ', श्रीमामामहाराजांचा 'रामपाठ' त्याचप्रमाणे श्रीदासराममहाराजांचा हा 'गुरूपाठ' आहे. हरि म्हणजेच राम व हरि म्हणजेच गुरू. 'हरिनारायण - गुरूनारायण' नावे जरी वेगळी असली तरी सर्वांचे ठिकाणी एकच आत्मतत्त्व/गुरूतत्त्व भरून आहे आणि सर्वप्रकारचे 'पाठ' (अभ्यास) करण्याचे एकच उद्दिष्ट, ''आत्मसाक्षात्कार'' हेच आहे. गुरू हे ब्रह्मस्वरूप असतात, म्हणून गुरूपाठाच्या अभ्यासाने 'ब्रह्मसाक्षात्कार' हेच प्रस्तुत गुरूपाठाचे ध्येय आहे.

**अ) गुरूपाठाचा बोध :-**

हे सर्व होण्यासाठी प्रथम गुरूपाठाचा यथार्थ बोध होणे हे अत्यंत महत्वाचे आहे. गुरूपाठामधील विषयांचे बुद्धिच्या पातळीवर आकलन होणेसाठी, त्यातील पारमार्थिक संकल्पना स्पष्ट होण्याची आवश्यकता आहे. पारमार्थिक संकल्पना स्पष्ट झाल्या असता, अभंगातील अर्थाचा बोध होण्यास मदत होणार आहे. गुरूपाठाच्या यथार्थ अभ्यासाने गुरूबोध झाला असता, गुरूकृपा होते. त्यामुळे गुरूपाठ हा प्रत्यक्ष अनुभवाच्या पातळीवर उतरून आत्मसाक्षात्कार होणार आहे.



**ब) गुरूपाठाचे महत्व :-**

गुरूपाठाच्या अठ्ठावीस अभंगांमधून गुरूभक्तीचे सिद्धांत अत्यंत सूत्रमय भाषेमध्ये सांगितले आहेत. काही अभंगांमधून भूमितीतील संकल्पनेच्या सहाय्याने, परमार्थातील सद्‌गुरूविषयक तात्विक सिद्धांतांचा उहापोह केलेला आहे. काही ठिकाणी गुरूत्वा-कर्षणासारख्या भौतिक सिद्धांताचा उलगडा, अध्यात्मशास्त्रातील सिद्धांतानुसार केलेला आहे. तसेच या सिद्धांताच्या प्रात्यक्षिकाकरिता कोणते साधन अभ्यासावे याचा तपशील दिलेला आहे. आत्मसाक्षात्कारासाठी ''गुरूबोध'' हाच एक केवळ अनुभवसिद्ध उपाय आहे, हे या अठ्ठावीस अभंगांमधून श्रीदासराममहाराजांनी स्पष्ट करून सांगितले आहे.

'सद्‌गुरू' व 'गुरूपाठ' यामधील अभंगात असणाऱ्या विषयांचे आकलन होणे, हे माझ्यासारख्या सामान्य माणसाचे काम नाही. परंतु केवळ, निरंजनपदी विराजमान माझे सद्‌गुरू श्रीदासराममहाराज यांच्या कृपाबळावर मी हे धाडस करीत आहे. सागराचे पाणी घेऊन सागरालाच अर्पण करावे, त्याप्रमाणे सद्‌गुरू श्रीदासराममहाराज यांच्या चिन्मय वाङ्‌मयाच्या आधारे हे विवेचन करण्याचा प्रयत्न केला आहे. याकरिता गु.भ.प. श्रीदीपकनाना यांची प्रेरणा कारणीभूत आहे. अखेरीस माझे सद्‌गुरू श्रीदासराममहाराज व सद्‌गुरू श्रीअण्णामहाराज यांचे चरणी अनेक दंडवत घालतो व येथेच थांबतो.

# मनोगत

प.पू.सद्गुरू श्रीदासराममहाराज केळकर लिखित अभंग (गद्य विवरणासह) '**पूर्णकळा**' या नावाने कीर्तनशताब्दि महोत्सवात प्रकाशित होत आहेत, ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे.

इ.स. २०२३ मधील गुरूपौर्णिमेचे वेळी कीर्तनाच्या विषयाचे चिंतन करीत होतो. त्यावेळी मनात विचार आला की, आमच्या प.पू. श्रीदादांनी गुरूपौर्णिमेला/व्यासपौर्णिमेला अनुसरून काही अभंग लिहिले आहेत का ते पहावे आणि ते आपण चिंतनाकरता घ्यावेत, म्हणून दासरामगाथा उघडला तर **'गुरूपाठ'** या शीर्षकाखाली श्रीदादांचे १४ अभंग दृष्टीस पडले. या अभंगांचे अवलोकन केले असता प.पू.श्रीदादांनी भूमितीतील संकल्पनेच्या आधारे म्हणजे व्यास, त्रिज्या आणि परीघ यांचे आधारे सगळा गुरूपौर्णिमेचा/व्यास पौर्णिमेचा विषय मांडला आहे. माझ्यासारख्या सामान्य बुद्धिच्या पातळीवर या अभंगांचे आकलन होणे कठीण आहे हे माझ्या लक्षात आले. म्हणून याबाबत मी प.पू.श्रीदादांचे अंतरंगातील शिष्य गु.भ.प. श्री.नारायणराव देशपांडे यांना फोन केला आणि याबाबत थोडी माहिती करुन घेतली. पण गुरूपौर्णिमा झालेवर माझ्या मनात आले की या अभंगांचे श्री.नारायणराव देशपांडे यांना विवरण लिहिणेची विनंती करूया. त्याप्रमाणे त्यांना फोन केला आणि लगेचच त्यांनी यास होकार दिला. यानंतर श्री. नारायणराव देशपांडे यांचे मनात असे आले की, या अभंगांबरोबरच '**श्रीगुरूपाठ -१**' यामधेही सद्गुरूंवर





अभंग आहेत. तसेच दासरामगाथा पुरवणीत व अक्षरधारा या ग्रंथात '**सद्गुरू**' या विषयाला अनुसरून काही अभंग आहे. या सर्व अभंगांचेही आपण विवरण करणेचा प्रयत्न करु. याप्रमाणे त्यांनी त्याचे विवरण केले. अशा एकूण ५३ अभंगांचे एकत्रित पुस्तक '**पूर्णकळा**' या शीर्षकाखाली प्रकाशित होत आहे.

'**पूर्णकळा**' हे शीर्षक देण्याचा उद्देशही वेगळा आहे. प.पू. श्रीदादांनी व्यास पौर्णिमेच्या निमित्ताने अभंग लिहिले आहेत. यातील व्यास हा शब्द 'आत्मा' या अर्थाने वापरलेला आहे. आत्मा पूर्ण आहे. '**आत्मा पूर्णपणी लक्ष्य सोऽहं स्मरणी । लक्ष्यासि उन्मनी आणा बा रे ।।**' या श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या उक्तीप्रमाणे आत्मा हा पूर्ण आहे, म्हणजे तो सर्वव्यापी आहे. सोऽहंचे ठिकाणी लक्ष केंद्रित होऊन मन उन्मनी अवस्थेत गेले की होणारे समाधान हे पूर्णच असते. म्हणून आत्म्याची येणारी प्रचीतिही पूर्ण आहे. संत हे पूर्ण, सद्गुरू हे पूर्ण, ते दाखवतात तो मार्गही पूर्ण, सद्गुरू कृपा करतात तीही पूर्ण. अध्यात्मशास्त्र ही कला आहे. अध्यात्मशास्त्रातील ज्ञान हे सद्गुरूकृपेने प्राप्त करावे लागते. सद्गुरू कृपा करत असताना, ते पूर्ण कृपाच करत असतात. पण आम्ही तेथे अपुरे पडलो (साधन न करता), तर त्याला सद्गुरू दोषी नाहीत. आपण दोषी आहोत. म्हणून अध्यात्मातील कळ म्हणजे वर्म साधले की आपले जीवन पूर्ण होते. या उद्देशाने '**पूर्णकळा**' हे शीर्षक दिले आहे.

परमार्थात परिपूर्णतेला अत्यंत महत्व आहे. पूर्णत्व प्राप्त

करुन घेणे महत्वाचे आहे. परमार्थात परिपूर्णता केव्हा येते? याचा खुलासा श्रीतुकाराममहाराजांनी एका चरणाद्वारे केला आहे. ते म्हणतात, '**संसार उडाला संदेह फिटला । पूर्ण तोचि झाला तुका म्हणे।।**' संसार उडाला म्हणजे काय? याचा खुलासा आधी आपल्याला व्हायला पाहिजे. घरावरील पत्रे उडतात, तसा संसार उडाला का? असा प्रश्न आहे. म्हणून आम्ही ज्याला संसार समजतो तो हा संसार नव्हे. आपण घर-दार, बायका-मुले याला संसार समजतो. हा बाह्य संसार आहे. हा संसार टाकावा आणि परमार्थ करावा असे कोणी सांगितले आहे का? आणि हा बाह्य संसार आम्ही टाकतो म्हटले तरी तो टाकता येतो का? येत नाही. म्हणून परमार्थात जेव्हा संसार हा शब्द येतो त्याचा अर्थ वेगळा आहे. जगद्गुरू श्रीशंकराचार्य सांगतात, '**संसरणं इति संसारः ।**' जीवनाचे संसरण हाच खरा संसार आहे. जीवनाचे संसरण म्हणजे जन्ममरणरूपी श्वासोच्छ्वास. श्वास वर घेणे हा जन्म आणि तो खाली सोडणे हे मरण आहे. हा जन्म-मरणरूपी (श्वासोच्छ्वास) संसार कुणाला सुटला आहे का? नाही. '**म्हणती संसार सुटला । श्वासोच्छ्वास तो चालिला ।।**' अशी संतोक्ति महत्वाची आहे. म्हणून आपण ज्याला संसार समजतो, तो सोडायचा नाही. फक्त त्यातील मोह आणि आसक्ति सोडायची. पाण्यात नाव असावी, पण नावेत पाणी असू नये. आता संसारातील आसक्ती जाणे करिता काय केले पाहिजे? याचे उत्तर आहे - संसरणात्मक संसाराचे आकर्षण वाढवायचे. जसजसे याचे आकर्षण वाढेल,





तसतसे बाह्य संसारातील आसक्ति/आकर्षण कमी होते. म्हणून आसक्ति किंवा आकर्षण कमी होणे म्हणजेच संसार उडणे आहे. म्हणून संसार उडाला की संदेह रहात नाही. म्हणजे काय? तर चैतन्याचे आकर्षण वाढले की आपोआप संदेहाची निवृत्ती होते, म्हणजेच संदेह रहात नाही. आणि निःसंदेह झाला की तो परमार्थात पूर्ण होतो. म्हणून श्रीतुकाराममहाराज म्हणतात, '**पौर्णिमेचा चंद्र तुका पूर्ण झाला । क्षणात निमाला पाया जवळी ।।**' प्रतिपदेपासून पौर्णिमेपर्यंत चंद्र जसा कले कलेने वाढून पौर्णिमेदिवशी पूर्ण होतो, तसा मी परमार्थातले अनुभव घेत घेत पूर्णावस्थेला पोहोचलो आणि शेवटी पांडुरंगाच्या चरणी विसावलो. '**ज्याचे मुखी नाम अमृत सरिता । तोचि एक पुरता घटु जाणा ।।**' या श्रीनिवृत्तीनाथमहाराजांच्या हरिपाठातील उक्तीप्रमाणे ज्याच्या मुखातून सदैव नामामृताचा प्रवाह वहात असतो, तोच परमार्थात पूर्ण झालेला असतो.

गुरूत्वाकर्षणाचा सिद्धांत, गुरूत्वमध्य, बिंदू, परिघ, त्रिज्या, व्यास इ. भौमितीक सिद्धांतांचा वापर प.पू. श्रीदासराममहाराजांनी केला आहे. पण या अभंगात हे जे सिद्धांत सांगितले आहेत, ते अध्यात्मिकदृष्ट्या सांगितले आहेत आणि या सिद्धांतांचा सर्व अर्थ आमच्या श्री. नारायणरावांनी सांगितलेला आहे. खरच याला तोडच नाही. अत्यंत अभ्यासपूर्ण आणि प्रत्येक ठिकाणी आधार व दाखले देऊन या सर्व अभंगांचे त्यांनी अत्यंत सुंदर विवरण केले आहे. त्यांना धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच आहेत. आमच्या प.पू.श्रीदादांनी

या पद्धतीने हा विषय या पद्धतीने मांडलेला आहे, हे या विवरणावरून माझ्या लक्षात आले.

अशा या ‘**पूर्णकळा**’ या ग्रंथातील प.पू.श्रीदादांनी सांगितलेल्या अभंगांतील सद्गुरूबोध मला व आपणा सर्वांना व्हावा आणि प.पू.श्रीदादांचे कृपेने आपणालाही पूर्णकळेचा अनुभव यावा अशी प्रार्थना प.पू.सद्गुरू श्रीमामामहाराज केळकर, प.पू.सद्गुरू श्रीदासराममहाराज केळकर व माझे पितृदेव प.पू.सद्गुरू श्रीअण्णामहाराज केळकर यांचे चरणी अर्पण करतो आणि लेखणीस विराम देतो.

दीपक चंद्रशेखर केळकर





# पूर्णकळा/नामकळा

एकूण अठ्ठावीस कळा आहेत. यातील बारा कळा सूर्याच्या आणि सोळा कळा चंद्राच्या आहेत. खरे तर पंधरा कळा चंद्राच्या असतात. सोळावी कळा अनुभवायची असते. चंद्राची सोळावी कळा भगवान शंकरांनी आपल्या मस्तकी धारण केली आहे. या सोळाव्या कळेलाच प.पू.श्रीदादा हे चित्कळा संबोधतात. ‘**शिवाचे मस्तकी सोळावी ती कळा । तयासी चित्कळा बोलताती ।।**’ असे श्रीदासराममहाराज आपल्या अभंग क्र.११४१ मध्ये म्हणतात.

आता हटयोगाच्या दृष्टीने विचार केल्यास :-

आपल्या देहात नाभीस्थानी सूर्याच्या बारा कळा असतात आणि आपल्या भ्रूमध्यस्थानात चंद्राच्या सोळा कळा असतात. योगमार्गाने जेव्हा प्राण आपण वर खेचतो, तेव्हा सूर्याच्या बारा कळा भ्रूमध्यात येतात आणि तेथे १६ + १२ ची मिळणी होते, म्हणजे चंद्र-सूर्य नाड्यांचे ऐक्य होते. हे जेव्हा ऐक्य होते, तेव्हा सुषुम्ना उघडते व तेथे सतरावी जीवनकळा निर्माण होते, यालाच नामकळा म्हणतात. ‘**नामामृत गोडी वैष्णवा लाधली । योगिया साधली जीवनकळा ।।**’ असे ज्ञानोबा म्हणतात. म्हणजे वैष्णवजन या कळेला नामामृत म्हणतात आणि योगीजन जीवनकळा म्हणतात. नामामृत-जीवनकळा म्हणजेच ती श्रीमामामहाराजांची ‘**नामकळा**’ आहे.

परंतु ही हटयोगाची प्रक्रिया साधणे अवघड आहे. म्हणून आमच्या मामांनी-दादांनी खालीलप्रमाणे सोपा मार्ग सांगितला आहेः-

आपल्या इडा आणि पिंगला नाड्यातच १२ आणि १६ कळा आहेत.

इडा नाडी - चंद्राच्या १६ कळा (डावी)

पिंगला नाडी - सूर्याच्या १२ कळा (उजवी)

परंतु या १६ आणि १२ नाड्यांचे भ्रूमध्य स्थानात जेव्हा ऐक्य होते, तेव्हा सुषुम्ना नाडी उघडते आणि तेथेच नाम हाताला येते. यादृष्टीनेच प.पू.श्रीमामामहाराज म्हणतात, '**इडा आणि पिंगला सुषुम्नेत सरता । रामनाम हाता येत असे ।।**'

प.पू.श्रीदादा सांगतात की, आपल्या उजव्या नाकपुडीतून १२ अंगुळे जीवन/श्वास वहात असतो आणि डाव्या नाकपुडीतून १६ अंगुळे जीवन/श्वास वहात असतो. म्हणजे उजव्या नाकपुडीतील श्वासांपेक्षा डाव्या नाकपुडीतील श्वासांची लांबी जास्त आहे. याचाच अर्थ आपले जीवन/श्वास हे विषम आहे. हे श्वास जेव्हा (१६+१२) भ्रूमध्य स्थानात येतील, तेव्हा ते सम होतील. तेव्हाच सुषुम्ना नाडी उघडेल आणि तेथे नामकळ/नाम प्राप्त होईल. हीच ती पूर्णकळा आहे. तर आमचे प.पू.श्रीअण्णा सांगतात की, 'श्वासाच्या गतीवर लक्ष ठेऊन रहा आणि केवल कुंभकामध्ये नाम घ्या. आपोआप नामकळा प्राप्त होईल.'





# प्रकाशकाचे चार शब्द

माझे सद्गुरू प.पू.श्रीदासराममहाराज केळकर हे खरोखरच ब्रह्मस्वरूप, साक्षात्कारी, परिपूर्ण ज्ञानी असे अधिकारी संतश्रेष्ठ होते. त्यांचे बोलणे, प्रवचन, कीर्तन व निरूपण हे सारेच अवाक् होऊन ऐकावे असे होते. त्यांच्या लेखनाची व्याप्तीही अमर्याद अशीच आहे.

श्रीदासरामगाथा ही त्यांची अभंग गाथा पाहिल्यास त्यांच्या अध्यात्मिक अत्युच्य अधिकाराचा, अवस्थेचा व ज्ञानाच्या प्रकटीकरणाचा प्रत्यय येतो. या सर्वच अभंगातून त्यांचे अनुभवजन्य ज्ञान प्रगट झालेले दिसते.

या गाथेमधील सर्वच अभंगांचा सर्वसामान्य भक्तांना अर्थ उकलतो असे नाही. काही अभ्यासू साधकांनी त्याचे विवरण केले तर अर्थ समजण्यास सोपे जाते. अशाचप्रकारे श्रीदासरामगाथा, श्रीदासरामगाथा पुरवणी व अक्षरधारा यामधील सद्गुरू, श्रीगुरूपाठ व गुरूपाठ या प्रकरणामधील ५३ अभंगांचा भावार्थ व विवरण श्रीदासराममहाराज यांचे कृपांकित, अभ्यासू साधक श्री. नारायणराव देशपांडे यांनी अत्यंत उत्कृष्ठ असे केले आहे. त्यामुळे या अभंगांची उकल होणे सोपे जाणार आहे.

या ग्रंथाचे नांव '**पूर्णकळा**' हेही अत्यंत समर्पक असेच आहे. या ग्रंथाची प्रस्तावनाही श्री. नारायणराव देशपांडे यांनीच लिहिली

आहे. आदरणीय श्रीदीपकनाना यांनी या ग्रंथासाठी सूत्रबद्ध, मार्मिक असे चार शब्द लिहिले आहेत. त्यामध्ये '**पूर्णकळा**' याचा यथोचित उहापोह केला आहे. तो वाचला असता आपल्याला '**पूर्णकळा**' म्हणजे नेमके काय हे सहज लक्षात येते.

या ग्रंथाचे टाईप सेटिंगचे काम श्री. भालचंद्र सहस्रबुद्धे यांनी अचुक व सुबक पद्धतीने केले आहे. या ग्रंथाचे प्रुफरिडिंगचे अत्यंत किचकट असे काम श्री. रमेश लाळे काका यांनी अचूकपणे केले आहे. मुखपृष्ठाचे डिझाईन श्री. सागर मोहिते यांनी आकर्षक असे केले आहे. तसेच या ग्रंथाची छपाई एस.बी.प्रिंटर्सचे श्री. अमोल कुलकर्णी यांनी उत्तम पद्धतीने केली आहे. या सर्वांविषयी मी कृतज्ञता व्यक्त करते.

अशा साधकोपयोगी '**पूर्णकळा**' या ग्रंथाची प्रकाशन सेवा मला लाभली हे मी माझे परम भाग्य समजते. श्रीसद्गुरूकृपेने याही पुढे अशीच सेवा घडत राहो ही प.पू.श्रीमामामहाराज, प.पू.श्रीदासराममहाराज व प.पू.श्रीअण्णामहाराज यांचे चरणी प्रार्थना करून माझे चार शब्द संपविते.

सौ.गायत्री गोविंद कुलकर्णी



# अनुक्रमणिका


| अ.क्र. | अभंग | पान क्र. |
|---|---|---|
| * | प्रस्तावना ... ... ... | एक |
| * | मनोगत ... ... ... | सहा |
| * | पूर्णकळा ... ... ... | अकरा |
| * | प्रकाशकाचे चार शब्द ... ... | तेरा |
| | **सद्गुरू** | |
| ०१. | गुरूचा पंखा असावा वरती | ०१ |
| ०२. | गुरुचा चटका | ०५ |
| ०३. | सद्गुरूराजाने मंथिला सागर | ०९ |
| ०४. | गुरुचे नाम घेता वाचे | १३ |
| ०५. | सद्गुरू देव सद्गुरू देव | १७ |
| ०६. | सद्गुरू सद्गुरू गाता निरंतर | २१ |
| ०७. | सद्गुरूवाचोनी उमजेना वाट | २५ |
| ०८. | सद्गुरूचे स्थान किती रम्य जाण | २९ |
| ०९. | एक दिस मन लागेल हो जेव्हा | ३३ |
| १०. | कशी मोहिनी घातली गुरुनी | ३६ |
| ११. | गुरू माझा सखा गुरू माझा सखा | ३९ |

| अ.क्र. | अभंग | पान क्र. |
|---|---|---|
| १२. | फिरली गुरूकिल्ली | ४२ |
| १३. | मोठे संत चित्रकार | ४५ |
| १४. | गुरुनाथ ध्यान गुरुनाथ मन | ४८ |
| १५. | गुरुरायाचा रायाचा मी दास | ५१ |
| १६. | आत्मबोध कैसा प्रत्ययासी आला | ५५ |
| १७. | गुरूनाम सर्वामाजी थोर पुण्य | ५८ |
| १८. | श्रीगुरू माऊली सद्गुरूमाऊली | ६२ |
| १९. | अनुपम हातोटी गुरूविना कळेना | ६६ |
| २०. | गुरुराजे कृपा केली | ६९ |
| २१. | सद्गुरूंची थोर दया | ७३ |
| २२. | राजहंसालागी मोतियाचा चारा | ७७ |
| २३. | नामात सद्गुरू डोल रे खेळिया नामात कीर्तन प्रगटे | ८१ |
| २४. | हनुमंत कीर्तनी प्रगट होय आत्मबोध | ८५ |
| २५. | हनुमंत चरित्राचा दाता श्रीसद्गुरू | ८९ |
| | **श्रीगुरूपाठ** | |
| २६. | आता एक मज जहाले श्रीगुरू | ९३ |
| २७. | ब्रह्ममूर्ती संत सद्गुरू अनंत | ९७ |



| अ.क्र. | अभंग | पान क्र. |
|---|---|---|
| २८. | सद्गुरू दयाळ सद्गुरू दयाळ | १०१ |
| २९. | ब्रह्मपूर्ण संत ब्रह्माते दाविती | १०४ |
| ३०. | सद्गुरू घरीचे आले जरी श्वान | १०७ |
| ३१. | सद्गुरू सद्गुरू करिता गजरू | ११० |
| ३२. | आता जेथे जेथे जैसे धावे मन | ११३ |
| ३३. | सद्गुरूंनी केले उघडे अंतर | ११७ |
| ३४. | हनुमंत सद्गुरू सुखाचे निधान | १२१ |
| ३५. | किती कनवाळू नारायणराव | १२४ |
| ३६. | श्रीगुरू श्रीगुरू देही जयजयकारू | १२७ |
| ३७. | श्रीगुरूंचा पाठ हनुमंत गुरूनी | १३१ |
| | **गुरूपाठ** | |
| ३८. | गुरू जगी थोर बोलतसे श्रुती | १३५ |
| ३९. | गुरूत्व तो गुरू गुरूत्व तो गुरू | १३८ |
| ४०. | गुरत्वाकर्षण विश्वा आकर्षण | १४२ |
| ४१. | गुरूत्वमध्य तो जीवनाचा मध्य | १४६ |
| ४२. | गुरूत्वमध्य तो दावी विश्वमध्य | १४९ |
| ४३. | व्यासाने परीघ परिघाने व्यास | १५२ |
| ४४. | गुरू दावी गोल गोल दावी गुरू | १५५ |

| अ.क्र. | अभंग | पान क्र. |
| --- | --- | --- |
| ४५. | पौर्णिमा ते व्यास व्यास ते पौणिमा | १५८ |
| ४६. | ज्यास कळे व्यास विरे पंचत्वास | १६१ |
| ४७. | सद्गुरू समान नाही कोणी जगी | १६४ |
| ४८. | गुरू ध्येय ध्यान गुरू संध्या स्नान | १६७ |
| ४९. | गुरूलागी जेणे लावियेला गुणा | १७० |
| ५०. | गुरू एक ग्रह ऐसा ज्याचा ग्रह | १७३ |
| ५१. | संच साधोनिया मंचकी संचले | १७९ |
| ५२. | श्रीगुरूची वसती असे जया धामा | १८५ |
| ५३. | हृदयी वसती श्रीगुरू पाऊले | १८८ |

***



## सद्गुरू

### १

**गुरूचा पंखा असावा वरती ।**
**डंका गाजे त्रिजगती ।।१।।**
**गुरुकृपेचे असावे छत्र ।**
**श्रीराम हालवितो सूत्र ।।२।।**
**रामनामे रंगलिये वाणी ।**
**हीच लावण्याची खाणी ।।३।।**
**दास म्हणे नका धरू शंका ।**
**एक हलवा गुरुपंखा ।।४।।**

**अर्थ -** ज्यांची महती स्वर्ग, मृत्यू व पाताळ या तिन्ही लोकामध्ये गाजते आहे अशा चिद्रूपी सद्गुरूंचा चैतन्यरूपी पंखा, आपल्यावरती नित्य असावा. त्यांचे कृपाछत्र मस्तकी असेल तरच, आपल्या जीवनाची सूत्रे तो ईश्वर/तो श्रीराम कसे चालवितो आहे, याचे भान येईल. सद्गुरूकृपेचे फळ म्हणून मिळालेले रामनाम हे चारीवाचेमध्ये चैतन्यरूपाने मिसळणे, हीच त्या चारी वाणींच्या लावण्याची शोभा आहे. नाम व सद्गुरु यांचेविषयी निःशंक होऊन रामनामाचे साधन केल्याने, त्या चैतन्याच्या वाऱ्याचा लाभ होणार आहे, असे श्रीदासराममहाराज म्हणतात.

**विवरण -** या अभंगामध्ये चैतन्यरूप सद्गुरू व त्यांच्याच कृपेने मिळालेल्या रामनामाचे वर्णन आलेले आहे. या देहामध्ये चिदाकाश हाच गुरूपंख्रा आहे. चिदाकाश हे देहाच्या अत्युच्च स्थानी, मस्तकाच्या वरच्या भागात आहे. म्हणूनच 'गुरूचा पंखा असावा वरती' असे म्हटले आहे. चिदाकाश हे चैतन्यानी ओतप्रत असते. चैतन्याशिवाय तेथे काहीच नसते. हे विश्व त्या चिदाकाशापासूनच बनले असल्याने, ते चैतन्यच त्रिखंडात/त्रिजगतामध्ये म्हणजेच स्वर्ग, मृत्यू व पाताळ ह्या लोकी समत्वाने व्यापून राहिलेले आहे. सद्गुरू हे चैतन्यरूप असून, ते नित्य चिदाकाशात स्थित असतात. चैतन्य हे सर्वत्र व्यापून असते. तसेच सद्गुरूही सर्वत्र चैतन्यरूपाने विश्वात सर्वत्र व्यापून असतात. अशा सद्गुरूंची सर्वत्र ख्याती असून, त्यांच्याच श्रेष्ठत्वाचा डंका सर्वत्र वाजतो आहे. या चैतन्यरूपी गुरूपंख्यातून चैतन्याचे वारे आपल्याला प्राप्त करून घ्यावयाचे झाल्यास, तो चैतन्याचा पंखा हलविणे जरूरीचे आहे. याकरिता सद्गुरूंनी सांगितलेल्या नाममंत्राच्या प्रक्रियेने हा पंखा हलविला जाऊ शकतो. नाममंत्राच्या प्रक्रियेने पंखा हलविला असता, त्यातून उत्पन्न झालेले 'चैतन्याचे वारे' साधकाला निश्चित प्राप्त होणार आहे.

सर्व जीव व हे जगत हे ईश्वराधीन आहेत. श्रीराम/ईश्वर हा सूत्रधाराप्रमाणे आहे. पूर्वी बाहुल्यांचा खेळ दाखविला जात असे.





त्यामध्ये कळसूत्री बाहुल्यांना नाचविणारा सूत्रधार असे. बाहुल्यांच्या सर्व दोऱ्या खेळ करणाऱ्या सूत्रधाराच्या हातात असतात. सूत्रधार नाचवील त्याप्रमाणे त्या बाहुल्या नाचत असतात. त्यांना स्वतःचे कर्तृत्व नसते. याप्रमाणे विश्वातील सर्व जीवांची सूत्रे त्या ईश्वराच्या हातात आहेत. ईश्वर आपल्या हातातील सूत्रांच्या आधारे या जगाला व त्यातील जीवांना नाचवित असतो. जीवाचा सूत्रधार ईश्वर असल्याने तोच खरा कर्ता आहे. परंतु जीव मात्र त्याचे कर्तृत्व स्वतःकडे घेतो. वास्तविक जीवाच्या मर्यादित कर्तृत्वाचे अधिष्ठान देखील ईश्वरच असल्याने तोच खरा कर्ता आहे. सद्गुरू हे ईश्वररूपच असल्याने आपल्या जीवनाचे सूत्रधार हे आपले सद्गुरूच असतात. त्यांची कृपा अत्यंत महत्वाची आहे. त्यांचे कृपाछत्र आपल्यावर असता, संसारातील त्रिविध ताप निवारणे शक्य होणार आहे, संसारभयापासून आपले रक्षण होणार आहे. त्यांच्याच कृपेने रामनामाची प्राप्ती होऊन, साधन होणार आहे.

मानवी शरीरात परा, पश्यंती, मध्यमा व वैखरी या चार वाणी आहेत. बेंबीपाशी प्राणवायूचे स्फुरण ही परावाचा, हृदयस्थानी वायुचे स्फुरण ही पश्यंती वाचा, कंठामधील प्राणवायूचे स्फुरण ही मध्यमा व मुखावाटे अक्षर/शब्दरुपाने प्राणवायूच बाहेर पडत असतो, ही वैखरी वाचा होय. निःशंक होऊन रामनाम घेतले असता, ते रामनाम चारही वाचेमध्ये मिसळून जाते, गढून जाते. नाम हे चैतन्यरूप

असते, म्हणून चारही वाचेमधील चैतन्यस्फुरण हीच खरी लावण्यशोभा होय. यामुळे अंतःकरणात आनंद ओसंडून वाहू लागतो.

माणसाला व्यवहाराप्रमाणे परमार्थातही अनेक शंका येतात. ईश्वर आहे काय? तो सर्व कर्ता आहे काय? नामाने आत्मप्राप्ती शक्य आहे काय? अशा विविध शंकांमुळे त्याची परमार्थात प्रगती होत नाही. परंतु संशयरहित होऊन नामाचा अभ्यास केला असता, चिदाकाशातील चैतन्याच्या वाऱ्याचा लाभ निश्चित होणार आहे, असे श्रीदासराममहाराज सांगतात.

***





## २

**गुरुचा चटका ।**
**हा प्रपंच अवघा लटका ।।१।।**
**ज्याला कळला गुरुचा चटका ।**
**तो म्हणे अवघा प्रपंच लटका ।**
**कशासि करिता मजा घटका घटका घटका ।**
**घ्या नामरसाचा घुटका ।।२।।**
**घेता नामाचा घुटका ।**
**होईल प्रपंचातून सुटका ।**
**८४ लक्ष योनि सुटका सुटका सुटका ।**
**हा दासाचा ऐका फटका।।३।।**

**अर्थ -** श्रीदासराममहाराजांनी येथे 'फटका' या वाङ्मयीन काव्यप्रकाराच्या माध्यमातून पारमार्थिक उपदेश केलेला आहे. गुरूप्रेम उत्पन्न होऊन त्याचे रुपांतर गुरूनिष्ठा, गुरूभक्तीमध्ये झाले असता, देह व भोवतालचे जग मिळून बनलेल्या प्रपंचाचे वैयर्थ/ मिथ्यत्व कळून येते. हे होण्याकरिता बाह्य जगाचे आकर्षण संपले पाहिजे. असे झाले असता, सद्गुरूंच्याकडून नामसाधनेचा प्रसाद

मिळतो. साधनकाळी उत्पन्न झालेला नामरस हाच ब्रह्मरस असतो. त्यामुळे संसारभय व मृत्यूभय ह्या दोहोंपासून सुटका होते, असे श्रीदासराममहाराज सांगतात.

**विवरण -** 'फटका' हा शाहिरी वाङ्मयाचा एक वैशिष्ट्यपूर्ण प्रकार आहे. एखादी गंभीर, महत्वाची गोष्ट, व्यवहारिक पातळीवरील भाषेच्या माध्यमातून पटवून देणे, सांगणे ह्याला 'फटका' म्हटले जाते. दासराममहाराजांनी या फटका नावाच्या वाङ्मयप्रकाराच्या माध्यमातून पारमार्थिक बोध केला आहे. गुरूचा चटका लागणे म्हणजे सद्गुरूंच्या विषयी आत्यंतिक आवड निर्माण होणे. पण ह्यासाठी जगाविषयी नावड उत्पन्न झाली पाहिजे. या जगातील नश्वर पदार्थावरील आसक्ती संपून, तीच आसक्ती सद्गुरूंच्याविषयी वाटली पाहिजे. सद्गुरूंवरील प्रेम/निष्ठा ह्यालाच सद्गुरूभक्ती म्हणतात. अशी सद्गुरूभक्ती उत्पन्न न होण्याचे कारण म्हणजे जीवाला आपल्या जीवनाच्या सार्थकतेविषयी वाटणारा संभ्रम होय. जीवाला आपल्या जीवनाचे खरे सार्थक कशात आहे हे समजत नाही. जगाच्या सार्थकते विषयी निरनिराळ्या कल्पना असतात. जगाला सत्य मानून, या जगात, सत्ता, पैसा, प्रतिष्ठा, यश व किर्ती मिळविणे, यातच जीवनाची सार्थकता मानली जाते. चार दिवसाच्या या संसारातील अनेक गोष्टींचे वेड धरून, मौजमजा करुन, उगाच भटकत राहणाऱ्या माणसाला यातील व्यर्थता समजत नाही.





असा जीव पूर्वपुण्याईने परमार्थाकडे वळला असता, त्याला योग्य अशा सद्गुरूंची गाठ पडते. सद्गुरूंनी सांगितलेल्या नामसाधनेने, सद्गुरूंचे चिद्स्वरूप जाणले जाते. सद्गुरू हे चैतन्यरंगामध्ये दंग असतात. अशा सद्गुरूंवरती आपली दृष्टी खिळून राहिली असता, त्यांचेविषयी प्रितीरस उत्पन्न होतो. असा प्रितीरस उत्पन्न होणे म्हणजे सद्गुरूंविषयी आवड/चटक निर्माण होणे होय. असे होणे हे सद्गुरूंशी असलेल्या जन्मोजन्मीच्या नात्याची खूण आहे.

सद्गुरू भक्तीचा पहिला परिणाम म्हणजे या जगाचा लटकेपणा/ खोटेपणा ध्यानात येतो. द्वैतात्मक जग हे अद्वैत भासते व जे जे भासते ते सर्व खोटे असते. द्वैतात्मक जग व त्यातील मी-तूपणा हे द्वैतही भासमान असल्याने ते सत्य नाही. हा सर्व खोट्याचा म्हणजे लटक्याचा पसारा आहे. आत्मज्ञानाअभावी हे सर्व खरे वाटते हे त्याच्या लक्षात येते. सद्गुरूभक्तीचा दुसरा परिणाम म्हणजे असे आत्मज्ञान आपल्या शिष्याला प्राप्त व्हावे म्हणून ते त्याला नामस्मरणाचा बोध करतात. सुषुम्नेतील हरिनामामध्ये खरा जीवनरस असतो. 'रसौ वै सः।' अशी श्रुती आहे. हरिनामामधील जीवनरसाचे ग्रहण केले असता, चैतन्यरसाचे सार म्हणजे 'आत्मा' प्राप्त होतो.

श्रीदासराममहाराज हा 'फटका' पूर्ण करताना सांगतात की, 'जीव' हा आत्मसुखाला विसरून, देह उपाधीच्या नादाने,

नानाप्रकारची बरी वाईट कर्मे करू लागला. कर्माचे फळ म्हणून जीवाच्या पाठीमागे जन्ममरणाचे चक्र लागले आहे. आत्म्याला जन्ममरण नाही म्हणून आपणही आत्मस्वरूपाशी एकरूप होऊ तर, आपणही या जन्ममरणाच्या फेऱ्यातून मुक्त होऊ व तसेच प्रपंचातील त्रिविध तापाने निर्माण होणारी दुःखे व सर्वप्रकारच्या संसार बंधनातूनही आपोआपच आपली सुटका होणार आहे.

***





## ३

**सद्गुरूराजाने मंथिला सागर ।**
**नामामृत थोर काढियेले ।।१।।**
**अमृतप्राशने मुक्त नोहे नर ।**
**न कळे भक्तिसार उगाउगी ।।२।।**
**नामामृत पाही गुरुविना नाकळे ।**
**देव तो नाकळे गुरूविना ।।३।।**
**सद्‌गुरुराजाने पाजिता नामामृत ।**
**देव भेटे सत्य साच खरा ।।४।।**
**गोविंदतनय सांगतो महिमा ।**
**जिव्हाळ्याचा प्रेमा हृदयस्था ।।५।।**

**अर्थ -** प्राणापानाच्या सागर मंथनातून निघालेल्या नामामृताची प्राप्ती सद्‌गुरूकृपेने होते. या हरिनामाची प्राप्ती हेच सद्‌गुरूभक्तीचे सार आहे. सद्‌गुरूंच्यामुळे देवाचे स्वरूप कळून येते व त्या देवाची साक्षात् भेट होते, हे त्रिवार सत्य आहे. चैतन्याचा जिव्हाळा असलेल्या, प्रेमरूप हृदयस्थ सद्‌गुरूंचा महिमा हा दासराम गातो आहे.

**विवरण -** 'अमृत' हे देव व दानव यांच्या समुद्रमंथनातून निघालेले व देवांना अमरत्व देणारे दिव्य पेय समजले जाते. स्वर्गसुखाच्या कल्पनेमध्ये अमृतप्राशन महत्वाचे समजले जाते. मृत्यूच्या भयाने ग्रासलेल्या मानवाला 'अमृत' या गोष्टीचे आकर्षण वाटते. परंतु हे 'अमृत' स्वर्गलोकी असल्याने मानवाला ते दुर्लभ आहे. म्हणून 'अमृत' सारख्या अप्राप्य गोष्टींनी मानवाला मुक्ती मिळणे, अमरत्व प्राप्त होणे शक्य नाही. भक्तीमार्गात भक्तीचा आनंद हा अमृतापेक्षा मोठा आहे, असे वर्णन आहे. साक्षात्काराला 'अमृतानुभव' म्हणून संबोधले जाते. तसेच पराभक्तीची फलश्रुती ब्रह्मरस/ब्रह्मानंद मानली जाते.

नामाचे महत्व सांगताना, नामाला अमृताची उपमा दिली जाते. एवढेच नव्हे तर नाम हे अमृतच आहे, असे म्हटले जाते. हे नामामृत म्हणजे स्वर्गातील प्रशन केले जाणारे अमृत नव्हे. नाम ही जीवाला त्याची मूळची अ-मृत/अमर स्थिती प्राप्त करून देते. या अर्थाने नामामृत असा शब्द वापरला जातो. नामामृताने मनाचा लय होऊन समाधान वाटणे हाच नामाच्या गोडीचा प्रत्यय होय. ''**अमृताहूनी गोड नाम तुझे देवा**'' असे श्रीनामदेवमहाराज म्हणतात. तर '**अमृत संजीवनी । नाम तुझे अमृत संजीवनी ।।**' असे रामदासस्वामी सांगतात. एकतत्त्वी नामाची गोडी वैष्णवाना लागते. '**नामामृत गोडी वैष्णवा लाधली । योगिया साधली जीवनकळा ।।**'





असे श्रीज्ञानदेव म्हणतात.

नरदेहातील ज्या नामाने मुक्ती प्राप्त होते, ते नाम म्हणजे 'अमृत ' आहे. असे हे गोड नामामृत धीट होऊन/धैर्य करून घेतले पाहिजे, असे श्रीमामामहाराज 'रामपाठात' म्हणतात. आत्मस्वरूप हे खरे अमृत आहे. त्याच्याशी एकरूप होण्याने जीवही चिरंतन अविनाशी होतो. या अमृतस्वादाला वीट नाही. या दिव्य नामाने सहस्रदळातून अमृतरस पाझरून तो सर्व शरीरभर पसरतो. यामुळे अंतःकरण वासनारहित होते व अवर्णनीय स्वरूपाच्या तृप्ततेचा अनुभव येतो.

नामाला अमृतसंजीवनी म्हणतात. आपल्या देहातून आत्मतत्त्व बाहेर पडले असता, त्या देहाला 'मृत' म्हटले जाते. म्हणून आत्मतत्त्व हेच अमृत आहे. ते आत्मतत्त्व म्हणजे देवाचे/भगवंताचे नाम आहे. या नामात चैतन्याशिवाय काहीही नाही. ते नाम चैतन्यरूप आहे. त्या नामाने आत्मतत्त्व प्रकट होते. असे हे नाम सद्गुरूंच्याकडून जाणून घेणे आवश्यक आहे. म्हणून नामदेवमहाराज म्हणतात, '**सद्गुरूवाचोनि नाम न ये हाता । साधन साधिता कोटीगुणे ।।**' सद्गुरू कृपेनेच अशा नामामृताची प्राप्ती होते.

देव म्हणजे काय व त्याची भेट कशी होते हे सद्गुरूवाचून

कळत नाही. देवभक्तीचे सार म्हणून रामनामाची प्राप्ती सद्गुरूकृपेनेच होते. आत्मा हा देव आहे. आत्मा हा नादप्रकाशयुक्त आहे. साधनप्रक्रियेमधे अनाहत नाद श्रवण होतो. त्या श्रवणाशी एकरूप झाले असता, आत्मदेवाची/आत्मप्रकाशाची भेट होते. जीव अमृतरूप होतो.

अनेक संतांच्या पदांमधून 'गुरूमहिमा' हा विषय प्रामुख्याने आलेला आहे. सद्गुरू हे साक्षात् चैतन्याचा जिव्हाळा आहेत. तुकाराममहाराज त्यांना मायबाप म्हणतात. संत हे दयाळू असतात, त्यांचे हृदय हे करुणेने भरलेले असते. अशा या प्रेमस्वरूप गुरूमाऊलींचा महिमा मी गातो आहे, असे श्रीदासराममहाराज म्हणतात.

***





## ४

**गुरुचे नाम घेता वाचे ।**

**कैवल्य मुक्ती तेथे नाचे ।।ध्रु।।**

**हेचि कडु का म्हणावे ।**

**तेचि तेथे गोड व्हावे ।।१।।**

**हेचि रामनाम ध्याया ।**

**दुधासाखरे पिआया ।।२।।**

**राम म्हणे बुद्धिबाई ।**

**राही सद्गुरूचे पाई।।३।।**

**अर्थ -** सद्गुरुंनी दिलेल्या नामाने संसार बंधनातून मुक्ती मिळून मोक्षपदाची प्राप्ती होते. त्यासाठी रामनामाचा अभ्यास होणे आवश्यक आहे. परंतु आपल्या सर्वांचा अनुभव असा आहे की, ते नाम गोड वाटत नाही, म्हणून नाम घ्यावेसे वाटत नाही. दुधामध्ये गोड साखर घालून दूध घेतले असता, ते गोड लागते म्हणून ते घ्यावेसे वाटते. याप्रमाणे आपण घेत असलेल्या नामामध्ये सद्गुरूंचे प्रेम मिसळले असता, तेच रामनाम गोड वाटणार आहे. ते घ्यावेसे

वाटणार आहे. सद्‌गुरुंचे पायी बुद्धि शरणागत झाली असता, हे सर्व होणार आहे.

**विवरण -** या अभंगामध्ये अनुग्रहामध्ये सद्‌गुरूंनी दिलेल्या नामाच्या अभ्यासाविषयी सांगितले आहे. गुरूचे नाम याचा अर्थ, अनुग्रह देतेवेळी सद्‌गुरूंनी आपल्या शिष्याला साधन अभ्यासासाठी दिलेले नाम. सद्‌गुरूकडून मिळालेल्या नामाचे वैशिष्ट्य आहे. सद्‌गुरू हे त्या नामाच्या मागे सत्तारुपाने असतात. सद्‌गुरूंनी आपली शक्ती त्या नामामध्ये संक्रमित केलेली असते. दुसरे म्हणजे, साधकाला साधनकाळी आपल्या हातून होत असलेले नामस्मरण हे सद्‌गुरूंच्या सत्तेवर चालते आहे, अशी जाणीव राहते. त्यामुळे 'मी' नामस्मरण करतो आहे, अशा तऱ्हेचा अहंकार त्याचे ठिकाणी रहात नाही. त्याचेकडून नाम घेतले असल्याने, माझ्या कर्तेपणाच्या अहंकाराला वाव रहात नाही. म्हणून सद्‌गुरूंच्याकडून नाम घेणे जरुरीचे आहे.

सद्‌गुरूंच्याकडून घेतलेल्या नामाने कैवल्य म्हणजेच मोक्षाची प्राप्ती होते. या नामाने संसारबंधनातून मुक्ती प्राप्त होते. माणूस संसारपाशात अडकलेला आहे. मी आणि माझे, हेच ते दोन पाश आहेत. या संसारात जीव विषयवासनेच्या जाळ्यात गुंतून पडलेला आहे. त्यामुळे तो अटळ दुःखभोग भोगतो आहे. दुसरे म्हणजे, वासनापूर्तीकरिता स्वतःवर त्याने कर्माचे बंधन घालून घेतले आहे. कर्माचा अटळ परिणाम म्हणजे जन्ममरणाचे चक्र. या संसारसागरातून





तरून जाण्यासाठी सद्‌गुरुंनी आपल्याकरिता रामनामाची नौका पाठविलेली आहे. मानवी जीवनाचे अंतिम उद्दिष्ट मुक्ति/मोक्ष आहे. जीवाने आत्मरूप होणे हाच मोक्ष, हीच मुक्ती व हीच जीवनाची सफलता होय. पण यासाठी गुरूनाम घेणे जरुरीचे आहे.

संत सांगतात की, देवाचे नाव गोड आहे. पण प्रत्यक्षात माणसाचा तसा अनुभव नाही. याचे कारण म्हणजे विषय वासनेच्या ज्वराने तोंडाची चव गेली आहे. हा ज्वर उतरविण्यासाठी रामनामाचे औषध हवे. हे औषध सुरवातीला कडू वाटले तरी परिणामी गोड आहे. हे रामनाम गोड वाटण्यासाठी त्यात आपली गोडी/आवड घातली पाहिजे. नाम म्हणजे काही खडीसाखर नाही. त्यात आपण आपले प्रेम ओतले पाहिजे. मग ते नाम गोड वाटू लागेल. जे आपणास आवडते ते गोड लागते, गोड वाटते. तेव्हा नामस्मरणात आपले प्रेम/आवड घालून श्रद्धापूर्वक ते केले असता, ते आपला प्रभाव दाखविल्याशिवाय रहात नाही.

हे होण्यासाठी गुरूकृपा हवी व अशी कृपा होण्यासाठी सद्‌गुरूंचे ठिकाणी शरण जाणे भाग आहे. परंतु असा शरणभाव लवकर उत्पन्न होत नाही. बुद्धिभेद होणे, हे परमार्थातील मोठे संकट आहे. बुद्धि हे निर्णय घेण्याचे स्थान आहे. इंद्रियांचा मनाशी संयोग होऊन, बाह्य जगताचा संपर्क येतो. त्यातील चांगले व वाईट कोणते ह्याचा निर्णय बुद्धि घेते. पण असा योग्य निर्णय होण्यासाठी बुद्धि

स्थिर हवी. नामाचे महत्त्व बुद्धिला पटायला हवे. चंचल बुद्धिने नाम स्थिर होत नाही. म्हणून प्रथम बुद्धी स्थिर होण्यासाठी सक्तीने नामस्मरण केले पाहिजे. बुद्धी स्थिर झाली असता, बुद्धिचा पालट होईल. '**बुद्धिचा पालट नासेल कुमती । होईल सद्गती येणे पंथे ।।**' (तुकाराममहाराज). बुद्धिचा पालट झाला असता देहबुद्धिची आत्मबुद्धि होते व देवाचे दर्शन होऊन माणूस मुक्तच होऊन जातो, असे श्रीदासराममहाराज सांगतात.

***





## ५

**सद्गुरू देव सद्गुरू देव ।**

**देवांचाही थोर देव ।।१।।**

**तये ठाई काय उणे ।**

**सर्व जयांचे अधीन ।।२।।**

**त्यांची पाऊले धरावी ।**

**तेथे याचना करावी ।।३।।**

**सर्वाधार ऐसे संत ।**

**ज्यांचा झाला भगवंत ।।४।।**

**दास म्हणे जाता शरण ।**

**नर होय नारायण ।।५।।**

**अर्थ -** सद्गुरू हे केवळ देव नव्हेत, तर ते देवांचेही देव आहेत. त्यांचे ठिकाणी देवभाव शिल्लक नसतो. ते आत्मभावावर आरूढ असतात. हा आत्मदेव सर्व देवांचाही देव आहे. या विश्वाचे व त्यातील सर्व जीवांचे अस्तित्व या देवाच्या आधारावर/अधिष्ठानावरती आहे. या विश्वाला व त्यातील सर्व जीवांना चालविणारा तो आत्मदेवच सूत्रधार आहे. अशा सद्गुरूचरणी शरण

गेल्याने, आपणही देवस्वरूप होणार आहे.

**विवरण -** संत हे देवस्वरूप असतात. आपण सद्गुरूंना शरण गेले असता आपणही देवस्वरूप होतो, असा विषय या अभंगात मांडलेला आहे. कारणाशिवाय कोणतेही कार्य घडत नाही, हा नियम आहे. जगत् जर कार्य असेल तर, हे जगत् निर्माण करणारा कोणीतरी असला पाहिजे. मोटारगाडी ही चालक असल्याशिवाय आपणहून सुरू होत नाही. त्याप्रमाणे या अचेतन जगाला चालविणारा कोणीतरी असला पाहिजे. असे जर मानले नाही तर, या अचेतन जगातील सर्व घटना/व्यवहार विशिष्ट क्रमाने, शिस्तीने व ठराविक नियमाने कशा घडतात, याचे स्पष्टीकरण देणे कठीण आहे.

यासाठी सृष्टी निर्मितीची प्रक्रिया सांगितली जाते. प्रथम ब्रह्माला, 'अहं बहुस्याम्' 'मी बहू व्हावे' अशी इच्छा झाली. त्याच्या इच्छेप्रमाणे या जगाच्या उत्पत्ती स्थिती व लय या कार्यासाठी, ब्रह्मा विष्णु व महेश हे देव निर्माण झाले. विश्वात व सर्व जीवांच्या अंतर्यामी देवच व्यापून राहिला आहे. तो सर्व विश्वाच्या व जीवाच्या अंतर्यामी राहून त्यांना क्रियाशील बनवित असतो. सगुण निराकार ब्रह्मा, विष्णु व महेश त्याचप्रमाणे ह्या देवांचे सगुण साकार अवतार असलेले राम, कृष्ण इत्यादि देवांचीही भक्ती केली जाते. परंतु ह्या सर्व देवांना निर्माण करणारा परमात्मा, परब्रह्म हाच खरा थोरला देव आहे असे समर्थ म्हणतात. या आत्मदेवाला निर्माण करणारा कोणी





नाही. तो अजन्मा, अविनाशी व स्वयंसिद्ध असून, या विश्वाच्या व जीवाच्या उत्पत्ती/स्थितीचे व विनाशाचे कारण एकमेव परमात्मा आहे. सद्गुरू हे आत्मरूप/ब्रह्मरूप आहेत. म्हणून त्यांनाच खऱ्या अर्थाने देवांचा देव म्हटले जाते.

ज्याला सद्गुरूहून देव मोठा वाटतो, तो करंटा समजावा, असे समर्थ रामदासस्वामी म्हणतात. सगुण साकार अशा ईश्वराचे अवतार रुपाने असलेले रामकृष्णादि देवांचे देहही नाहिसे होतात. तसेच सगुण निराकार असे ब्रह्मा विष्णु व महेश हे देवही कल्पांती लयास जातात. देव ही कल्पनाच मनुष्यनिर्मित आहे. ईश्वरालाही ब्रह्मरूप श्रीगुरूंची कल्पना असत नाही. ब्रह्मरूप गुरूतत्त्व हे शाश्वत असून, ते देवांचेही देव आहेत. सद्गुरूंनाही देह असला तरी तेथे देहभाव नसतो. ब्रह्मभावावर असलेल्या सद्गुरूंच्या ठिकाणी भगवंताचे दिव्य गुण आपोआपच येतात, म्हणून ते भगवंत/ईश्वरच होतात.

परमार्थामध्ये गुरुचरणांना अत्यंत महत्व आहे. सद्गुरुंचे पाय हीच माझी देवपूजा आहे, असा भाव व्यक्त करणारे, शिवदिनकेसरी यांचे 'माझी देवपूजा देवपूजा । पाय तुझे गुरूराजा ।।' हे पद प्रसिद्ध आहे. गुरूचरणांची लटक लागली असता जीवाची काय अवस्था होते, याचे वर्णन मीराबाई यांच्या, 'मोरी लागी लटक गुरुचरननकी।' या पदामध्ये आढळून येतो. 'गुरुचरणकमलदळ्ळी' या कानडी पदामधून श्रीनिंबरगीकरमहाराजांनी गुरूपदी शरण जाणे म्हणजे त्यांच्या

पदकमली त्यांच्याच नामाचा गुंजारव करीत राहणे, असा शरणभाव व्यक्त केलेला आहे. '**गुरूला शरण जाय रे । तुझा तू शिव होय रे ।।**' या पदामधून चिमडचे महाराजांनी गुरूंना शरण गेले असता, जीवाचा शिव (देव) होतो असे म्हटले आहे. थोडक्यात म्हणजे, गुरूंना शरण गेले असता, त्यांना प्रार्थना केली असता ते आपल्याप्रमाणेच आपल्या शिष्याला ब्रह्मरूप करतात. अशातऱ्हेने नराचा नारायण करण्याचे सामर्थ्य असलेल्या सद्‌गुरूंना मनोभावे शरण जावे, असे दासराममहाराज सांगतात.

***





## ६

**सद्गुरू सद्गुरू गाता निरंतर ।**
**भेटे महेश्वर तयालागी ।।ध्रु।।**
**कर्ता धर्ता हर्ता नियंता सद्गुरू ।**
**जयाचे आधारू जग चाले ।।१।।**
**आत्मा तो रे पाही सकळ जीवांचा ।**
**महादि देवांचा असे प्राण ।।२।।**
**दास म्हणे थोर सद्गुरू पाऊले ।**
**तीही लोकी भले थोर संत ।।३।।**

**अर्थ -** 'सद्‌गुरू' हे शब्दही एक नामच आहे. त्यामुळे सद्‌गुरू–सद्‌गुरू या अखंड नामस्मरणाने, महेश्वराची म्हणजेच शिवाची गाठ पडते. सद्‌गुरू हे शिवात्मरूपच असतात. तेच या जगाचा आधार असून, तेच या जगाचा कर्ता, धर्ता, हर्ता व नियंता आहेत. हा शिव (महेश्वर) व जीव या दोन्ही ठिकाणी तोच परमात्मा/ब्रह्म प्राणरूपाने व्यापून आहे. ज्यांच्या कृपेमुळे आत्मरूपता प्राप्त होणार आहे, अशा तिन्ही लोकी श्रेष्ठ सद्‌गुरूचरणाशी हा दासराम शरण आहे.

**विवरण -** शिवाच्या भेटीसाठी जीवाने 'सद्‌गुरू-सद्‌गुरू' या

नामाचे अखंड स्मरण करणे, नामगायन करणे, आवश्यक आहे. केवळ वैखरीने अखंडपणाने, निरंतरपणे नामाचा उच्चार करणे कठीण आहे. याचा सर्वांना अनुभव आहे. हे नाम अखंडपणाने चालण्यासाठी, आपल्या देहामध्ये अखंडपणे चालणाऱ्या एखाद्या गोष्टीशी हे नाम जोडून घेणे जरुरीचे आहे. आपल्या देहामध्ये श्वासोश्वास ही क्रिया नैसर्गिकरित्या अखंडपणाने चालू आहे. अखंडपणाने चालणाऱ्या श्वसनाच्या अधिष्ठानावर नामस्मरण करणे शक्य आहे. आपले नाम आपण श्वासाशी जोडून घेतले असता, नामस्मरण अखंडपणाने होऊ लागते. अशातऱ्हेने सद्‌गुरूंच्या निरंतर नामाने सद्‌गुरुंचे स्मरणही अखंडत्वाने होते.

सद्‌गुरू चरणांचे महात्म्य तिन्ही लोकी कसे आहे, याचे वर्णन अनेक पुराण ग्रंथातून व संतवाङ्मयामध्ये आलेले आहे. सद्‌गुरू चरणसेवा ही गोष्ट सद्‌गुरूभक्तीमध्ये अत्यंत महत्वाची मानली जाते. ''**सद्‌गुरूंचे पायी । ठेवीन वेळोवेळा डोई ।।**'' (श्रीतुकाराममहाराज). तसेच ''**माझ्या सद्‌गुरूंची पाऊले गोमटी । वंदिताची भेटी हृदयस्था।। सद्‌गुरू सद्‌गुरू करिता उच्चारू । येती हरिहरु भेटावया ।।**'' (संत निळोबाराय). अशाप्रकारे अनेक संतांनी सद्‌गुरू चरणांचे महत्व सांगितलेले आहे. ''**तत् विद्धि प्रणिपातेन ।**'' (गीता अध्याय ४) या गीता वचनाप्रमाणे, सद्‌गुरू चरणांना आपण घट्ट धरले पाहिजे. हा सगळा प्रपंचाचा पसारा लटका, खोटा आहे असे सर्व संत वारंवार





सांगत असतानाही, मायेच्या जबरदस्त प्रभावाने सद्‌गुरूंचे महत्व आपण जाणत नाही. त्यांच्या चरणांची लटक लागत नाही. आधी नरजन्म सहजासहजी मिळत नाही, नरदेहात येऊन साधुसंतांचा सहवास मिळणे कठीण, त्यातून सद्गुरूंचा अनुग्रह मिळणे कठीण, त्यानंतरही त्यांनी सांगितलेल्या नामाचा अभ्यास होऊन त्यांची चरणसेवा घडणे दुर्मिळ आहे.

अशी अनन्यभावे सद्‌गुरूसेवा घडली असता, शिवाची/ शंकराची गाठ पडते. अखिल विश्व व त्यामधील सर्व जीव ह्यांच्या उत्पत्ती, स्थिती व लयाचे कारण, एक शिवच आहे. भगवान सद्‌गुरू श्रीनिंबरगीकरमहाराजांचे ''चिंत्याक् माडती'' असे पद आहे. त्यामध्ये ते म्हणतात, जीवाची उत्पत्ती शिवच करतो, तोच त्याचे पालन पोषण करून सांभाळ करतो व त्याचा शेवटही तोच करतो. जीवाचे ज्ञातृत्त्व, भोक्तृत्त्व व कर्तृत्व हे अंतर्यामी शिवाच्या अस्तित्वामुळेच आहे. आकाशातील ग्रह-ताऱ्यांचे अस्तित्व त्याच्यामुळेच आहे. चंद्र सूर्यांना मार्गावरून चालविणारा तोच आहे. विश्वात घडणाऱ्या सर्व घटनांचा अधिष्ठाता केवळ शिवच आहे. सद्‌गुरू हे शिवरूपच/ आत्मरूपच असतात. म्हणून या विश्वाचा कर्ता, धर्ता, हर्ता व नियंता एक सद्‌गुरूच आहेत.

श्रीदासराममहाराज पुढे सांगतात की, सकळ जीवांचे ठिकाणी व शिवाच्या / ईश्वराच्या ठिकाणी एकच एक परमात्मा/ब्रह्म प्राणरुपाने

समान आहे. हरिपाठामध्ये श्रीज्ञानदेव म्हणतात, '**एक हरि आत्मा । जीव शिव समा ।।**' जीव व शिव हे व्यष्टीरुपाने व समष्टिरुपाने परमात्म्याचे अंश आहेत. त्यामुळे अज्ञानउपाधीरुपाने असलेला जीव व ज्ञानउपाधीरुपाने असलेला शिव यांचे ऐक्य होऊन, दोन्हीही विज्ञानस्वरूप परमात्म्यात / ब्रह्मात विलीन होतात.

अशातऱ्हेने तिन्ही लोकी श्रेष्ठ असलेल्या सद्‌गुरूचरणांची सेवा व त्यांच्या निरंतर स्मरणाने जीव-शिवाचे ऐक्य होणार आहे, असे श्रीदासराममहाराज सांगतात.

***





## ७

**सद्गुरूवाचोनी उमजेना वाट ।**
**उगीच बोभाट का करावा ।।१।।**
**सद्गुरूवाचोनि कळेना साधन ।**
**उगीच का शीण करुनि घ्यावा।।२।।**
**सद्गुरूवाचोनि नोहे ते दर्शन ।**
**का करावी जाण खटपट ।।३।।**
**दास म्हणे यासी एकचि उपाव ।**
**एक सद्गुरूराव आळवावा ।।४।।**

**अर्थ -** परमार्थाच्या प्रत्येक टप्प्यावर सद्‌गुरूंची आवश्यकता आहे. सद्‌गुरूंशिवाय, परमार्थातील परमार्थप्राप्तीची वाट उमगत नाही. व्यवहारामधील विद्वत्तेचा डांगोरा, परमार्थामध्ये चालत नाही. आपल्या मनाने/बुद्धिने परमार्थाचे साधन करणे निरर्थक असून, तो व्यर्थ शीण आहे. केवळ सद्‌गुरूच नेमके साधन सांगू शकतात. परमार्थाच्या शेवटच्या टप्प्यावर, आत्मदेवाच्या दर्शनाकरिता फक्त सद्‌गुरूंची कृपाच कामास येते. तेथे अन्य उपायांची खटपट चालत नाही. दासराममहाराज सांगतात की, 'हे सर्व साधण्यासाठी,

सद्‌गुरूंना अंतःकरणपूर्वक आळवणे हा एकच नामी उपाय आहे.'

**विवरण -** परमार्थामध्ये, मुमुक्षू पासून सुरवात करुन, स्वरूपप्राप्तीच्या प्रवासाच्या प्रत्येक टप्प्यावर सद्‌गुरूंची अनिवार्यता कशी आहे, याचे वर्णन येथे आले आहे. आपला व्यवहारातील अनुभव सांगतो की, जर आपणास एखाद्या विविक्षित ठिकाणी जाण्याचे असेल तर, त्या ठिकाणी जाण्याचा रस्ता/वाट आपण जाणकार माणसाकडून विचारुन घेतो. आपण जर एखादे ध्येय निश्चित केले असेल तर, त्या ध्येयाकडे जाण्याचा मार्ग दाखविणारे पुष्कळजण असू शकतात. परंतु आपणास जर परमार्थ करावयाचा असेल तर, एका सद्‌गुरूशिवाय आत्मस्वरूपाकडे जाण्याचा मार्ग/वाट अन्य कोणीही दाखू शकत नाही. ते स्वतः आत्मरूप असल्यानेच, दुसऱ्याला तो मार्ग दाखवू शकतात. म्हणूनच कबीरसाहेबांनी '**गुरूबीन कौन बतावे वाट**' असे म्हटले आहे. सद्‌गुरूविना आपल्याला परमार्थाची वाट कळली आहे, असा जर कोणी गाजावाजा/बोभाटा करीत असेल तर ते निरर्थक आहे. ती आत्मवंचना आहे. आत्मप्राप्तीची वाट ही अत्यंत बिकट आहे. ती वाट अत्यंत अरुंद व सूक्ष्म स्वरूपाची आहे. हा अत्यंत सूक्ष्मबुद्धिचा प्रांत आहे. चिमडचे महाराज म्हणतात, '**आकाशातून वाट रे । न करावा बोभाट रे ।।**' आत्मस्वरूपाकडे जाणारी सूक्ष्म वाट देहाच्या उर्ध्वभागी असलेल्या चिदाकाशामधून जाणारी आहे व ही वाट केवळ सद्‌गुरूच दाखवू शकतात.





आपल्याला परमार्थातील आत्मस्वरूपाची प्राप्ती हे ध्येय आहे, हे कळले पाहिजे. तसेच या स्वरूपाप्रत कोणत्या वाटेने जावयाचे याचे परोक्ष ज्ञान सद्‌गुरूंकडून जाणून घेतले पाहिजे. आता हे ध्येय गाठण्यासाठी योग्य ते साधन करणे महत्वाचे आहे. प्रत्येक व्यक्तीच्या पिंडधर्मानुसार योग्य तो साधनमार्ग सद्‌गुरूच सांगू शकतात. सद्‌गुरूंचे मार्गदर्शन न घेता, आपण आपल्या बुद्धिनुसार साधन करू तर आत्मसिद्धी कधीच होणार नाही. तो व्यर्थ खटाटोप, केवळ शीणच ठरणार आहे. चिदाकाशाचा मार्ग हे केवळ योगारुढ सद्‌गुरूच दाखवू शकतात. सुषुम्ना मार्गाच्या नामसाधनेने काम-क्रोधादि खट पटतात व चित्त शुद्ध व शांत होते. पण हे साधन साधण्याची हातोटी सद्‌गुरूंकडून शिकून घ्यावी लागते.

आतापर्यंत पाहता, आपले आत्मरुपता साधण्याचे ध्येय ठरले, त्या आत्मस्वरूपाचे शब्दांनी परोक्ष ज्ञान झाले, पुढे सद्‌गुरूंनी साधनाची हातोटी सांगितली. इतके झाल्यानंतर साधक, सुषुम्नामार्गाचे साधन अभ्यासाने चिदाकाशाच्या गाभ्यापर्यंत येतो. आता चिदाकाशामध्ये असलेल्या आत्मदेवाच्या दर्शनाकरिता कोणत्याही साधनेची खटपट करावी लागत नाही. आता केवळ सद्‌गुरू कृपेची वाट पाहणे शिल्लक राहते. आपल्या साधनअभ्यासाची पराकाष्ठा झाली असता, सद्‌गुरू कृपा करतात व आपल्याला चिदाकाशातील आत्मदेवाचे दर्शन होते.

श्रीदासराममहाराज अभंगाच्या शेवटी वर्माची गोष्ट सांगतात. वर पाहिल्याप्रमाणे, आत्मप्राप्तीच्या प्रत्येक टप्प्यावर सद्गुरू आपल्याला मार्गदर्शन करीत असतात. परंतु अंतिम देवदर्शनासाठी फक्त 'कृपा' लागते. सद्गुरू प्रसन्न असता ही कृपा होते. आपण अंतःकरणपूर्वक त्यांना आळविले असता, ते प्रसन्न होतात व त्यांची कृपा प्राप्त होते, असे श्रीदासराममहाराज सांगतात.

***





## ८

**सद्गुरूचे स्थान किती रम्य जाण ।**
**प्रत्यक्ष भुवन वैकुंठचि।।१।।**
**सद्गुरूंचे ते घर हे माझे माहेर ।**
**किती हो सुंदर काय वर्णू ।।२।।**
**सद्गुरू हे माझे खरे मायबाप ।**
**हरविती ताप संसारीचे ।।३।।**
**सद्गुरूंचे तीर्थ हे माझे औषध ।**
**तोडी भवबंध महारोग ।।४।।**
**पवित्र ती गंगा सद्गुरू स्मरण ।**
**तयांचे दर्शने देव भेटे ।।५।।**
**सद्गुरूंचा वारा चुकवील फेरा ।**
**तयांचा अंगारा गोड करी ।।६।।**
**आम्ही गुरूनाथपंथी दास म्हणे।**
**तयांचे स्मरणे काळ पळे ।।७।।**

**अर्थ -** गुरुनाथपंथी दासरामांनी येथे आपल्या सद्‌गुरूंच्या संबंधाने असणाऱ्या प्रत्येक गोष्टीचे पावित्र्य सांगितलेले आहे. आपल्या सद्‌गुरूंचे स्थान हे प्रत्यक्ष वैकुंठ असून, ते अत्यंत रमणीय आहे. सद्‌गुरूंचे घर हे माहेराप्रमाणे असून, तेथील सौंदर्य अवर्णनीय आहे. सद्‌गुरु हे माझे खरे मायबाप असून, तेच माझ्या संसारातील त्रिविध तापांचे हरण करणारे आहेत. त्यांचे चरणतीर्थ हे भवबंधाचा महारोग दूर करणारे जालीम औषध आहे. पवित्र गंगेचा भाव सद्‌गुरुरुस्मरणाने अंतःकरणात उत्पन्न होतो व त्यांच्या दर्शनाने देवाची भेट होते. सद्‌गुरूस्थळीचा अंगारा वैराग्याचे गोड फळ देणारा आहे. त्यांच्या कृपेचा वारा, जन्ममरणाचा फेरा चुकविणारा आहे. सद्‌गुरुस्मरणाने काळाचीही पिछेहाट होते, असे श्रीदासराममहाराज सांगतात.

**विवरण -** गुरूंच्या अस्तित्वाला संस्पर्श झालेल्या प्रत्येक गोष्टीला दिव्यत्व प्राप्त होते, पावित्र्य प्राप्त होते. सद्‌गुरूंच्या अस्तित्वाच्या अशा काही खुणा व त्यांचे महत्व, दासराममहाराजांनी येथे सांगितलेले आहेत. वैकुंठभुवन हेच सद्‌गुरूंचे खरे देवस्थान असून ते अत्यंत रमणीय आहे. ''**आम्ही वैकुंठीचे वासी । आलो याचि कारणासी ।।**''(श्रीतुकाराममहाराज). ईश्वरीय कार्य पुढे चालू ठेवण्याकरिता साधु-संत जगात अवतार घेतात. वेद-उपनिषदामधील तत्त्वज्ञानाचे जीवनात प्रत्यक्ष आचरण करून, लोकांना मार्गदर्शन करण्याकरिता त्यांचा जन्म असतो.





प्रत्येक स्त्रीला आपले माहेर प्रिय असते. याप्रमाणे प्रत्येक साधकाला आपल्या सद्‌गुरूंचे घर हे माहेराप्रमाणे वाटते. या माहेराचे विशेष हे आहे की, मायेमध्ये न गुंतविता साधकाला मुक्त करणारे हे माहेरघर आहे. अशा या सुंदर माहेराचे वर्णन करावे तेवढे थोडेच आहे.

आपल्याला आपले आई-बाप जन्मास घालतात. परंतु आपल्या आई-बापांच्या देहामध्ये चैतन्य नसते/ चैतन्यात्मा नसता, तर ते आपल्याला जन्म देऊ शकले नसते. याचा अर्थ तो चैतन्य आत्मा हाच आपले खरे आई-बाप आहेत. सद्‌गुरू हे चैतन्यरूप असतात. म्हणून तेच आपले खरे आई-बाप आहेत. लहान बालकाला दुःख झाले असता ते आपल्या आई-बापाकडे धाव घेते. त्याचे आई-बाप त्याचे दुःख दूर करण्याचा प्रयत्न करतात. अध्यात्मामध्येही असेच आहे. हा जीव संसारातील आधिदैविक, अध्यात्मिक व आधिभौतिक तापाने पोळला जातो व त्यामुळे अखंड दुःखी असतो. सद्‌गुरूंना शरण गेले असता, ते त्याच्या त्रिविध तापांचे हरण करून, शाश्वत सुखाचा मार्ग सांगतात.

सद्‌गुरूचरणांचे तीर्थ हे अत्यंत पवित्र असून, ते औषधाप्रमाणे काम करते. हे जग द्वद्वांनी भरलेले आहे. द्वंद्व याचा अर्थ परस्पर विरुद्ध गोष्टी, उदा. मान-अपमान, सुख-दुःख, अशा द्वंद्वातून मिळणारे सुख-दुःख हे सापेक्ष स्वरूपाचे असते. देवाचे नाम हेच केवळ निरपेक्ष सत्य आहे. सद्‌गुरूंनी दिलेल्या या नामाने भवबंधनातून

सुटका होते.

सद्‌गुरूंचे स्मरण हे गंगेच्या शुद्धतेचा व पावित्र्याचा अनुभव आहे. सद्‌गुरूनामाने मन वासनारहित व शुद्ध होते. अशा शुद्ध व शांत अंतःकरणामध्ये देवाची भेट होते.

सद्‌गुरूंच्या कृपेचा वारा साधकाच्या पाठी असता, जन्म-मरणाच्या फेऱ्यातून सुटका होते. सद्‌गुरूस्थानीचा अंगारा भाळी लावला असता, वैराग्यप्राप्ती होऊन आत्मरूपतेचे गोड फळ मिळते. आपल्या सद्‌गुरूंना अनन्यभावाने जे सर्वस्व मानतात, ते गुरुपंथी होत. आपण गुरूनाथपंथी असल्याचे सांगून, सद्‌गुरू स्मरणात निरंतर राहिले असता आपल्यावर काळाची सत्ता रहात नाही, असे श्रीदासराममहाराज सांगतात.

***





## ९

**एक दिस मन लागेल हो जेव्हा ।**

**त्याग होईल तेव्हा संसाराचा।।१।।**

**गुरूकृपेविना रामपद नाही ।**

**संग धरी पाही सद्गुरूंचा ।।२।।**

**गुरूकृपा झाली काय फळा आली ।**

**दास म्हणे बोली राम वाचा।।३।।**

**अर्थ -** या जगाचा संग सुटला असता, संसारातील विषयांचा त्याग झाला असता, गुरुपायी मन जडले जाईल. गुरूपायी मन जडले असता, सद्‌गुरूंचा संग घडला असता, त्यांची कृपा होते. त्या कृपेचे फळ म्हणून आत्मपदाची / रामपदाची प्राप्ती होते. या आत्मरूप सहजावस्थेमध्ये रामवाचेने अखंड रामस्मरण सुरू होते.

**विवरण -** विषयत्यागाने सद्‌गुरूंचा संग घडतो. त्यामुळे ते प्रसन्न होतात व त्यांची कृपा होते. त्या कृपेचे फळ म्हणून आत्मरुपाची प्राप्ती होते व त्यानंतर अखंडपणाने आत्मस्मरण राहते, असा विषय या अभंगामध्ये आलेला आहे. ''**जगाचा तोडी या तटका । तरी तुझा लागे मज चटका ।।**'' (श्रीदासराममहाराज). सद्‌गुरूचरणांचा वेध लागावासा वाटत असेल तर, प्रथम या जगाची आसक्ती सुटली

पाहिजे. आपली सर्व ज्ञानेंद्रिये व कर्मेंद्रिये ही बहिर्मुख आहेत. ह्या सर्व इंद्रियांची ओढ बाह्य जगतातील शब्द, स्पर्श, रुप, रस व गंध ह्या पाच बाह्य विषयाकडे सतत असते. प्रथम ही इंद्रिये बाह्य विषयांचे ज्ञान करुन घेते व त्यापाठोपाठ मन-बुद्धिही त्या विषयाकडे धावते व तेथेच अडकून पडते. हीच जगाची आसक्ती होय. वासना पूर्ण करण्यासाठी कर्म, त्यातून सुखदुःखाचे भोग व पुन्हा जन्ममरणाचे चक्र चालू राहते. असे असूनही मन येथेच रमते. देवाची माया अघटित आहे. माणूस संसारातील विविध विषयांना भुलून स्वतःचे मूळ आत्मस्वरूप विसरून जातो. मायेने या जगाचा मोह पडतो व मायेला वश होऊन संसारचक्रामध्ये बद्ध होऊन राहतो.

जगामधील पंचविषयांच्या आसक्तीपेक्षाही, पंचमहाभूतांनी बनलेल्या देहाची व त्या देहसंबंधाने असलेल्या मी व माझे यांची ओढ/आसक्ती ही अधिक खोलवरची आहे. देहाची संगत सुटली असता, देहामुळे खरे वाटणाऱ्या जगाचे सत्यत्वही संपेल व खऱ्या अर्थाने संसाराचा त्याग होईल आणि हे होण्यासाठी ईश्वरप्राप्तीची ओढ/ सद्गुरूंच्या संगतीची ओढ लागणे आवश्यक आहे. असे झाले असता सुखरूप/आनंदरूप अशा रामपदाची प्राप्ती होणार आहे.

रामपद म्हणजे आत्मारामपद. हाच ईश्वर असून, यालाच शिवात्मपद असे म्हणतात. हाच तो सोऽहं आत्माराम आहे, ज्याने हे विश्व निर्माण केले व हा सर्व विश्वात भरून राहिला आहे. या





आत्मदेवाच्या साक्षात्काराचे वर्णन श्रीदासराममहाराजांनी 'वायुलहरी' या ग्रंथातील ''**वाऱ्यावरी लागली नजर**'' या पदामध्ये केलेले आहे. जगाची आसक्ती दूर करण्यासाठी, सद्गुरू साधकाला विवेक-वैराग्याचा अभ्यास करावयास सांगतात. त्यामुळे इंद्रिय संयम होऊन, दृष्टी अंर्तमुख होते. अशा अंर्तमुख जीवाला ते शरीरातील चैतन्यावर प्रेम करण्यास शिकवितात. खरे तात्त्विक रामनामाचे साधन सांगतात. त्यांनी सांगितलेल्या साधन प्रक्रियेने, सुषुम्ना मार्गीचा प्राण सहस्रदळी मिसळत रहातो. हेच वाऱ्यात वारे मिसळणे आहे. अशावेळी देहभानाचा विसर पडून, सर्वत्र चैतन्यरूपाने परमेश्वर दिसू लागतो. यावेळी चारी वाचेचा निरास होतो. अशा सहजावस्थेत चारी वाचेपलीकडील रामवाचेने रामनामाचा गजर आपोआप होत रहातो. हेच अखंड विष्णुस्मरण होय, असे श्रीदासराममहाराज सांगतात.

***

## १०

**कशी मोहिनी घातली गुरुनी ।**

**मज दावी देव नयनी ।।१।।**

**देही प्रगटले ज्ञान ।**

**दिसे परमात्मा प्रसन्न ।।२।।**

**करी नामाचा गजर ।**

**दासा दिधला सुखकर ।।३।।**

**अर्थ -** श्रीदासराममहाराज सांगतात :– गुरुने अशी काही मोहिनी घातली आहे की, ज्यामुळे हा जीव, आत्मस्वरूप प्राप्तीसाठी वेडा झालेला आहे. सद्‌गुरूकृपेने मला देवाचे दर्शन झाले. दुसरे म्हणजे या देहामध्येच आत्मस्वरूपाचे / देवाच्या स्वरूपाचे ज्ञान झाले, त्यामुळे आत्मस्वरूपाचे पूर्णरूप परमात्मा प्रसन्न झाला. अशा सुखरूप आत्म्याच्या प्राप्तीने माझ्याकडून सद्‌गुरुनामाचा गजर आपोआपच होऊ लागला आहे.

**विवरण -** गुरूने मोहिनी घातली याचा अर्थ गुरू प्रसन्न होऊन त्यांनी कृपा केली आहे, असा होतो. असे झाले असता, साधकाला आत्मदेवाचे वेडच लागते. अशा वेडाने काय फळ प्राप्त होते, याचे वर्णन या अभंगात आले आहे. सगळ्यांचे चर्मचक्षु सारखेच असतात.





चक्षु/डोळा हा व्यवहारात पाहण्याचे साधन. पाहिलेली वस्तु कशाची बनली आहे, हे दाखविणारा डोळा म्हणजे दृष्टी होय. जो आपणास आत नेऊन देवदर्शन देतो, त्या डोळ्याला 'नयन' म्हणतात. बाह्य डोळा ज्ञानयुक्त नाही. केवळ बाह्य वस्तु दाखविणारा डोळा हा ज्ञानाचे साधन नाही. ज्ञान बुद्धिला होते. बुद्धि त्रिगुणात्मक असते. अशा त्रिगुणात्मक बुद्धिने व्यवहार होतो. ही बुद्धि व्यवहारास उपयोगी असते. परंतु परमार्थामध्ये अशी त्रिगुणात्मक वासनेची बुद्धि उपयोगी पडत नाही. येथे त्रिगुणाच्या पलीकडील शुद्ध बुद्धिच केवळ परमार्थाला उपयोगी पडते. अशा शुद्ध त्रिगुणातीत बुद्धिला 'प्रज्ञा' नांव आहे. या प्रज्ञाचक्षुला देव/परमेश्वर दिसतो.

म्हणून देवदर्शन होण्यासाठी नुसती कल्पना करणे अगर इच्छा करुन चालत नाही. देहाच्या डोळ्यांना देव दिसत नाही. तसा देव पाहणारा डोळा कमवावा लागतो. तो डोळा कसा कमवावा हे सद्‌गुरू सांगतात. साधनेमध्ये सुषुम्नेतील उर्ध्वगामी प्राणगती हीच देवाला पाहण्याचा डोळा बनते. हाच डोळा आता नयन बनतो. याच नयनाला चिदाकाशातील आत्मदेवाचे दर्शन होते. हाच 'नयन' जेव्हा विश्वाकार होतो तेंव्हा त्याच नयनात, व्यापकरुपाने असलेल्या आत्मदेवाचे/ परमेश्वराचे सर्वत्र दर्शन होते.

सद्‌गुरूंनी सांगितलेल्या नाममंत्राचे स्मरण पूर्ण केले असता, चिदाकाशात आत्मरूप प्रगट होते. नाद बिंदू कला व ज्योतीरुपाने, सोऽहंआत्म्याचे स्वरूप देहामध्ये बाहेरही प्रगट होते. अशा आत्मखुणा

या आत्म्याचे प्रकर्ष आहेत, हा अनुभव जीवाला येत नाही. तर जीव जेव्हा जीवात्मभाव सोडून आत्मभावात प्रविष्ट होतो/ आत्मरूप होतो, तेव्हा आत्माच आत्मप्रकर्षाचा अनुभव घेत असतो. जीवभावावर असताना हा अनुभव येत नाही. परंतु त्रिकुटापासून चिदाकाशात येणारा नादबिंदूचा अनुभव हा त्याच्या प्राथमिक पूर्व खुणा असतात. केवळ चिदाकाशामध्ये आत्मज्ञान प्रगटते. अशाप्रकारे देहामधील चिदाकाशात सद्गुरूकृपेने आत्मज्ञान प्रगट होते.

सद्गुरूकृपेचा प्रकर्ष म्हणजे, तो परमात्मा/परब्रह्म प्रसन्न होते. परब्रह्मापासून/परमात्म्यापासून आत्मरूप स्फुरणरूपाने चिदाकाशात प्रगट झाले. परमात्मा निश्चळ भक्तीने प्रसन्न होतो.

**'तूंचि मला सोड वायू तूंचि मला सोड रे ।'**

सद्गुरू दासराममहाराजांनी आपल्या 'वायुलहरी' या ग्रंथामध्ये उपरोक्त पदात, सोऽहंआत्मपद ब्रह्मपदी विलीन होते, त्याकरिताच्या निश्चळ भक्तीचे वर्णन केलेले आहे.

असे झाले तरी, ज्यांच्यामुळे ब्रह्मरूपता प्राप्त होते, त्या सद्गुरूंची ज्ञानोत्तर भक्ती चालूच राहते. हरिवाचेने सद्गुरूस्मरण/ ब्रह्मस्मरण चालूच राहते. सद्गुरूकृपेने अशाप्रकारच्या सुखरूपतेचा लाभ झाल्याचे, श्रीदासराममहाराज सांगतात.

***





## ११

**गुरू माझा सखा गुरू माझा सखा ।**
**दुसरा सलोखा न करी मी।।१।।**
**त्यासी पामर मी नोहे उतराई ।**
**नमस्कार पायीं शतशः ।।२।।**
**दीन पामराचा केलासे उद्धार ।**
**त्याचे वारंवार स्मरी नाम ।।३।।**
**दास म्हणे थोर सद्गुरूपाऊले ।**
**मज सोडविले बंदीखानी ।।४।।**

**अर्थ -** सद्गुरू हा माझा सखा आहे. त्याच्या व्यतिरिक्त मला अन्य कोणीही जीवलग नाही. माझ्या सारख्या पामराला, त्यांनी संसारभयाच्या बंदीखान्यातून सोडवून बंधनमुक्त केले. अशा सद्गुरूंचा उतराई होणे कदापीही शक्य नाही. त्यामुळे केवळ मी त्यांच्या पायी शतशः नमन करतो व त्यांच्याच नामाचे नित्य स्मरण करीत असतो.

**विवरण -** दासबोधामध्ये सांगितलेल्या नवविधा भक्तीपैकी आठव्या 'सख्य' भक्तीविषयीचे वर्णन येथे केलेले आहे. सख्यभक्तीमध्ये सद्गुरूंचे व सत्‌शिष्याचे नाते हे अत्यंत रमणीय स्वरूपाचे असते.

समर्थांनी सांगितले आहे की, सख्यभक्ती ही देवाप्रमाणेच सद्‌गुरूंचीही करावी. या दोहोंच्या नातेसंबंधामध्ये सद्‌गुरूंचे स्वरूप व त्यांच्या अंगीचे दैवी गुण यांची भक्ताच्या अंतःकरणावर प्रेमभक्तीभावाची गडद छाप उमटलेली असते. सद्‌गुरूंचे जीवन, हाच साधकाच्या जीवनाचा आदर्श असतो. आपल्या अपूर्ण पारमार्थिक जीवनाचे पूर्ण स्वरूप म्हणून, तो सद्‌गुरूंच्याकडे पहात असतो. ईश्वर/सद्‌गुरूंच्याकडून माझ्या जीवनाची सूत्रे हलविली जात आहेत, त्यामुळे माझ्या जीवनात घडून येत असलेली घटना ही अंतिमतः माझ्या कल्याणासाठीची आहे, अशी शिष्याची दृढ श्रद्धा असते. संत हे देहधारी दिसत असले तरी, त्यांचा आत्मा व्यापकत्त्वाने सर्व सृष्टीशी एकरूप झालेला असतो. ब्रह्माशी ऐक्य पावल्याने त्यांचे अंगी सर्व ईश्वरीय गुण असतात. सद्‌गुरू हे कृपाळू असतात, म्हणून त्यांचे सख्यत्व जीवापाड जपावे. म्हणूनच समर्थ म्हणतात, '**देवाच्या सख्यत्वासाठी । पाडाव्या जीवलगासी तुटी । सर्वस्व अर्पावे शेवटी। प्राण तोही वेचावा ।।**'

नवविधाभक्तीतील श्रवण, कीर्तन, स्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन व दास्य ह्या सात भक्तीचे साधन जाणीवपूर्वक करावयाचे असते. परंतु आठवी 'सख्यभक्ती' हा या सात भक्तीचा सहज होणारा परिणाम आहे. स्वतःला पूर्ण बाजूस सारून देवाशी/सद्‌गुरूशी अनन्य होऊन रहाणे, हे सख्य भक्तीचे वर्म आहे.

ईश्वराचे अवतार वारंवार होत नाहीत. परंतु त्याचेच कार्य





पुढे चालवून लोकांचा उद्धार करण्यासाठी संत अवतार घेतात. संत हे जीवनमुक्त महात्मे असतात. ते ईश्वरस्वरूप झालेले असतात. प्रत्येक जीव हा ब्रह्मरूपच आहे. परंतु अज्ञानाने तो तसे समजत नाही. जीवाने ब्रह्मरूप होणे हे त्याचे खरे प्राप्तव्य आहे. तो त्याचा जन्मसिद्ध हक्क आहे. परंतु संसारपाशात अडकून जीवाची अधोगती झाली आहे, त्यामुळे संसार दुःखाच्या ज्वाळेने तो पोळतो आहे. हा जीव आपणहून देहरुपी बंदीखान्यात पडलेला आहे. देह उपाधीच्या सानिध्याने स्वतःलाच देह समजून, देहाची सुख-दुःखे भोगत आहे. या अधोगतीतून सोडवून त्याचा उद्धार फक्त सद्‌गुरूच करू शकतात.

बंदिखान्यात अडकणे म्हणजे बंधनात अडकणे. आधी देहाचे बंधन व या देहामुळे आलेले संसाराचे बंधन, अशा दुहेरी बंधनात जीव अडकलेला आहे. या बंदीखान्यातून तेंव्हाच सुटका होईल, जेंव्हा सद्‌गुरूकृपेने 'हा देह म्हणजे मी नाही - मी आत्मरूप आहे' असे ज्ञान जीवाला होईल.

श्रीदासराममहाराज अखेर सांगतात की, मी सद्‌गुरूंच्या ठिकाणी शरणागत भावाने गेलो असता, त्यांनी मला बंधनातून मुक्त करून माझा उद्धार केला. माझा जिवलग सखा असलेल्या माझ्या सद्‌गुरूंच्या पायी मी शतशः नमन करतो आहे आणि त्यांच्याच नामाचे नित्य स्मरण करतो आहे, अशाप्रकारे श्रीदासराममहाराज आपल्या सख्य भक्तीचा भाव व्यक्त करतात.

***

## १२

**फिरली गुरूकिल्ली ।**

**आता हो दुसरी नाहीं वल्ली ।।१।।**

**शास्त्र पुराण धर्म सज्जन ।**

**वेद कृष्ण बोलीं ।।२।।**

**सुलभ उत्तम सकळ सार ।**

**ते रामनाम बोली ।।३।।**

**गुरूने सोपी वाट दाविली ।**

**दासे आक्रमिली ।।४।।**

**अर्थ -** सर्व शास्त्रे,धर्म, पुराणे, वेद व उपनिषदांमध्ये तसेच कृष्णबोली म्हणजे गीता ह्या सर्वांमध्ये एकच रामनामाचे सार सांगितले आहे. परंतु संजीवन वल्ली असलेले हे रामनाम कसे घ्यावे, याची किल्ली/कळ मात्र फक्त सद्‌गुरूच सांगू शकतात. एकदा रामनामाची कळ हस्तगत झाली की, मग मात्र आत्मस्वरुपाची वाट सोपी होते व आत्मध्येयापर्यंतची ही वाट सुलभतेने आक्रमिली जाते.

**विवरण -** सर्व शास्त्र, पुराणे, उपनिषदे इत्यादिमधून, ज्या रामनामाचा उद्‌घोष केलेला आहे, ते रामनाम साध्यही आहे व साधनही आहे. अशा रामनामाची गुरुकिल्ली केवळ सद्‌गुरूच





दाखवितात, हाच या अभंगाचा विषय आहे. सर्व शास्त्र, पुराण व अन्य ग्रंथांमधून नामाचे महत्व तसेच नामसाधनेने ब्रह्मप्राप्ती निश्चित होते, हे वारंवार सांगितले आहे. परमार्थात नाम हे साध्यही आहे, तसेच ते साधनही आहे. नाम हे स्वयंसिद्ध आहे, नित्य आहे, तसेच ते चैतन्यरूप आहे. चैतन्य म्हणजे नाम आहे. ब्रह्मस्वरूप हे सच्चिदानंदरूप आहे. म्हणून आपले साध्य असलेले ब्रह्मरूपही नाम आहे. नाम हेच परब्रह्म आहे. चैतन्यरूप नामाच्या अभ्यासाने चैतन्याचा/देवाचा साक्षात्कार होतो व अखेरी जीव हा ब्रह्मरूप होऊन स्वतःचे मूळ रूप प्राप्त करुन घेतो.

नाम घेताना नामाची पथ्ये पाळणे आवश्यक आहे. ''**जेणे विठ्ठल मात्रा घ्यावी । तेणे पथ्ये सांभाळावी ।।**'' (श्रीतुकाराममहाराज). तुकाराममहाराज सांगतात की, परस्त्री व परधन यांची अभिलाषा धरू नये. स्वप्नातही त्यांची इच्छा करु नये. काम-क्रोध हे तिखट मिरचीप्रमाणे असून, त्यांची चव घेऊ नये. चित्त शुद्धिसाठी रामकृष्ण इत्यादि देवांच्या नामाचा जप करणे महत्वाचे आहे. परंतु यापुढील सूक्ष्म नामाचा अभ्यासही व्हावयास हवा. ज्या नामाने आपण देवरूपच होऊन जातो, ते नाम वेगळे आहे. ते तत्त्वरूप नाम आहे. या तत्त्वरूप नामाचा अभ्यास सद्‌गुरूंनी सांगितलेल्या पद्धतीने व्हावयास हवा. ''**नाम श्वासोश्वासी असे**'' असे श्रीसमर्थांनी म्हटले आहे. देवाने जन्माबरोबरच प्रत्येकाला श्वासोश्वासमध्ये असणारे नाम दिलेले आहे. श्वासोच्छ्वासातील प्राणगतीवर आपली दृष्टी व कान एकवटले असता नामस्मरणाला सुरवात होते, असे श्रीदासराममहाराज सांगतात.

श्वासोच्छ्वासातील नामस्मरण हा देवप्राप्तीचा राजमार्ग आहे. या नामाने माणूस देवरूप होतो.

ही 'संजीवनी' प्राप्त करुन देणारी नामावली आहे. ही रामनामाची कळ साधली असता, काही खुणा आपोआप दृगोच्चर होतात. या नामाने चित्त तद्रुप होते. "**बीज माथा चमकली । नेत्र बाहुली हसली ।।**" श्रीमुक्ताबाईंनी आपल्या साक्षात्काराचा अनुभव सांगताना म्हटले आहे की, या नामाने चिदाकाशामधील तेजाचा प्रकर्ष झाला. त्या तेजाचा संचार नेत्रामध्ये होऊन नेत्र बाहुली हसली, म्हणजेच सर्वत्र आत्मानंदाचा अनुभव आला.

दुसरा अनुभव श्रीतुकाराममहाराजांचा आहे. तुकाराममहाराज म्हणतात, "**देव पहावया गेलो । तव तो अंगे देवचि झालो ।।**" नाम घेता घेता देवाला पाहणारा स्वतःच देवरूप होऊन जातो हे नामसाधनेचे अंतिम 'गमक' आहे.

आत्मवस्तु ही अस्तित्वरूप आहे. हे आत्मवस्तुचे अस्तित्व हे कशाच्याही असण्या-नसण्यावर अवलंबून नसून, ते निःखळ 'असणे'पणाने आहे. आत्मा/ईश्वर हा सर्वव्यापक/सर्वत्र आहे. मानवी देहातील आत्मा कळला असता, सर्वव्यापक आत्म्याचे/ईश्वराचे ज्ञान होते. हा देहातील आत्मा जाणून घेण्यासाठी/आत्मदर्शन करून घेण्यासाठी, नेमकी 'नामकळ' सद्गुरू सांगतात. त्यामुळे ही वाट सोपी होते व आनंदरूप होण्याचा हा राजमार्ग सहजपणे आक्रमिला जातो, असे श्रीदासराममहाराज सांगतात. ✻✻✻





## १३

**मोठे संत चित्रकार ।**

**देव दाविती साकार ।।१।।**

**मोठे होत चित्रकार ।**

**परी देव निराकार ।।२।।**

**शुद्ध बीजाचा आरसा ।**

**देव उमटतो कसा ।।३।।**

**दास म्हणे नाम गाई ।**

**गुरूकृपे देव पाही ।।४।।**

**अर्थ -** निराकाराचे चित्र साकारणारा चित्रकार या भौतिक/लौकिक जगात जन्माला आलेला नाही. मात्र निराकाराला साकार करण्याची हातोटी असलेले संत-सद्गुरू हे विलक्षण चित्रकार आहेत. आपल्या भक्तीच्या भावबळाने त्यांनी निराकार निर्गुण ब्रह्माला, सगुण साकार देवस्वरूपात/ईश्वरस्वरूपात प्रगट करावयास लावले. अंतःकरणात हा देव उमटण्यासाठी/प्रगट होण्यासाठी सद्गुरुंची कृपा लागते. सद्गुरुंनी दिलेल्या नामाने अंतःकरणामध्ये शुद्ध बीजाचा अंकुर फुटतो व अशा शुद्ध/निर्मळ अंतःकरणात देव आपोआप प्रगट होत असतो.

**विवरण -** निर्गुण निराकार ब्रह्म व सगुण साकार परमेश्वर हा या अभंगाचा मुख्य विषय आहे. ब्रह्म हे निर्गुण/निराकार व अरूप आहे. आकाराला रंगाशिवाय राहता येत नाही. म्हणून विश्वातील सर्व पदार्थ कोणत्या ना कोणत्या रंगाचे असतात. ब्रह्म अरूप/निराकार असल्याने तेथे कोणताही रंग नाही. म्हणून म्हटले आहे, '**आत्म्याचे अंग पारदर्शक जैसे भिंग ।।**' ब्रह्मामध्ये कोणताही नाद नाही व बिंदूरूप सूक्ष्म आकारही नाही. सत् ब्रह्माच्या चिद्चे स्फुरणातून हा ईश्वर विश्वरूपाने साकार झाला. या ईश्वरालाच सगुणब्रह्म म्हटले जाते. निर्गुण सत्ब्रह्म हे केवळ अधिष्ठानरूप असून, त्याचे ठिकाणी मायाशक्तीचा/चिद्शक्तीचा प्रादुर्भाव झाला व त्यापासून सगुण ब्रह्मरूप ईश्वर निर्माण झाला. चैतन्यशक्तीच्या गतीमुळे हे चित्रमय जगत् बनले आहे.

संतमहात्मे या चिद्शक्तीच्या अनुभवाचे वर्णन अनेक प्रकाराने करतात. साक्षात्कारामध्ये चिद्शक्तीच्या श्याम वर्णाचे उल्लेख अनेक ठिकाणी येतात. जीवाला चिद्शक्तीचा रंग आला असता, जीव हा चिद्पासून वेगळा न राहता तो चिद्रूप/चैतन्यरूपच होतो. चिद्शक्तीच्या रंगामुळेच प्रकृतीचे सारे रंग चालतात. '**माझा रंग तुझे गुणी । बोले नामयाची जनी ।।**' जनाबाई म्हणतात की, तुझा चैतन्याचा गुण माझे ठिकाणी समरस झाला असून, या चैतन्याच्या प्रीतीरसामध्ये मी अखंडपणाने न्हाऊन निघते आहे.

व्यवहारातील चित्रकार हा केवळ आकाररुपाने असलेल्या पदार्थाचे चित्र काढतो. तो निराकाराचे चित्र काढू शकत नाही. परंतु





सद्गुरू हे मात्र असे चित्रकार आहेत की, आपल्या ईश्वराचे ठिकाणी असलेल्या प्रेमभावाच्यायोगे, निर्गुण निराकार ब्रह्माला, सगुण साकार ईश्वररुपात प्रगट करु शकतात. असेही म्हणता येईल की, भक्ताचा प्रेमभाव पाहून देव आपण होऊन त्याच्यापुढे साकार होतो. साधकाला साधनकाळी आत्म्याचेच प्रकर्ष असलेल्या नाद, बिंदू, कला व ज्योती याचा अनुभव येतो. अशा साकार झालेल्या देवाच्या खुणा गुरूकृपेने प्राप्त होतात.

देवाची भेट होण्यासाठी अंतःकरणाची शुद्धता व स्थिरता ह्या दोन गोष्टींची अत्यंत आवश्यकता असते. शुद्धि दोन प्रकारची असते. एक म्हणजे बाह्य शुद्धि. स्नान आदि कर्मे करून आपण आपल्या बाह्य देहाची शुद्धि करु शकतो. अंतःकरणाची शुद्धि होण्यासाठी मात्र जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात. मनाचे स्वरूप, संकल्प-विकल्पात्मक असल्याने, बरे-वाईट विचार व काम क्रोधादि विकार ह्यामुळे मन गढूळ/अशुद्ध होते. ही अशुद्धता, सत्संग व विवेक-वैराग्य यांच्या सहाय्याने घालवावी लागते. आरशावर मळ बसला असता, प्रतिबिंब स्वच्छपणाने दिसत नाही. परंतु काचेवरील मळ दूर झाला असता, प्रतिबिंब स्पष्टपणाने दिसू लागते. तसेच चित्तातील मल व विक्षेप हे दोन दोष दूर झाले असता, देवाला पाहणारी दृष्टी प्राप्त होते. चित्ताचा खरा मळ हा स्वरूपाचे 'अज्ञान' आहे. तत्त्वरूप/सूक्ष्म नामसाधनेने हे अज्ञान दूर होते. चित्ताचे चैतन्य होते. हे सर्व गुरूकृपेने प्राप्त होते, असे श्रीदासराममहाराज सांगतात.

***

## १४

**गुरुनाथ ध्यान गुरुनाथ मन ।**
**गुरुनाथ स्मरण वैखरीचे ।।१।।**
**सर्व झाला माझा एक गुरुनाथ ।**
**सत्य हित नीत सद्गुरूनाथ ।।२।।**
**मार्गशीर्ष वद्य पंचमी शनिवार ।**
**बोधामृत सार गुरुनाथ ।।३।।**
**दासराम लोळे सद्‌गुरूचरणी ।**
**स्वयेंचि भेटोनी अभय दिले ।।४।।**

**अर्थ -** माझ्या गुरूंच्या नामाचे स्मरण मी वैखरीने करीत आहे. मी सद्‌गुरूंचेच ध्यान करीत आहे. माझ्या ध्यानामनाचा विषय आता केवळ सद्‌गुरूच आहेत. नित्य सत्‌ब्रह्मरूपाने असलेले सद्‌गुरू हे माझे सार–सर्वस्व आहेत. मार्गशीर्ष वद्य पंचमी, शनिवार, या दिवशी सद्गुरू प्रत्यक्ष माझ्यासमोर प्रगट झाले व त्यांनी ज्ञानबोधामृताचे सार मजला दिले आणि भवभयापासून माझी सुटका केली. दासराम अशा सद्‌गुरुंचे चरणी अत्यंत प्रेमाने लोटांगण घालीत आहे.

**विवरण -** सद्‌गुरूचे ध्यान, हा गुरुभक्तीचा उच्च आविष्कार आहे. हाच सद्‌गुरूभक्तीचा विषय येथे मांडलेला आहे. या अभंगाचा





आणखी एक विषय म्हणजे या अभंगात, सद्‌गुरूनाथ हे प्रत्यक्ष दासराममहाराजांचे समोर प्रगट झाले, त्या दिवसाचा उल्लेख आलेला आहे.

परमात्मस्वरूपाचे ध्यान, हे परमार्थामध्ये महत्त्वाचे आंतरिक साधन मानले जाते. ध्यान प्रचितीमध्ये, ध्याता-ध्येय व ध्यान अशी त्रिपुटी असते. त्रिपुटी याचा अर्थ तीन गोष्टींचा समूह. ज्ञाता-ज्ञेय-ज्ञान/ कर्ता-क्रिया-कर्म अशाप्रकारच्या त्रिपुटींचा उल्लेख, साधनप्रक्रिया समजून सांगताना केलेला आढळतो. त्रिपुटी ही संकल्पना भेदावर आधारलेली आहे. जसे ज्ञाता हा ज्ञेयापेक्षा नेहमी वेगळा असतो. ध्याता हा ध्येयापेक्षा वेगळा असतो. द्रष्टा-दृश्य व दर्शन ह्या त्रिपुटींचा उल्लेख आत्मदर्शनाच्या संबंधाने केला जातो. या प्रक्रियेत आत्म्याचे दर्शन होताच, जीव हा 'द्रष्टा' म्हणून वेगळा रहात नाही. द्रष्टा नसल्याने दृश्यही रहात नाही व केवळ अशातऱ्हेने त्रिपुटीच संपल्याने केवळ आत्मदर्शन शिल्लक राहते.

जो नियम आत्मस्वरुपाच्या दर्शनाकरिता/ आत्मस्वरुपाच्या ध्यानाकरिता, तोच नियम व तीच प्रक्रिया सद्‌गुरूंच्या ध्यानासाठी लागू पडते. येथे साधक प्रथम सद्‌गुरूंच्या सगुण रुपाचे ध्यान करीत असतो. सद्‌गुरू हेच ध्येय असतात. ''**सगुणाचे आधारे । निर्गुण पाविजे निर्धारे ।।**'' या समर्थांच्या वचनानुसार, सद्‌गुरूंच्या सगुण ध्यानाचे रुपांतर निर्गुण ध्यानात होते. सद्‌गुरू सच्चिदानंद ब्रह्मस्वरूप असतात. साधक त्यांच्या सच्चिदानंद रुपाशी ध्यानाने ऐक्य पावतो. आता ध्याता-ध्येय-ध्यान त्रिपुटी संपते. त्रिपुटीच्या तिन्ही अंगामध्ये

सद्गुरूच भरून राहिले आहेत असा अनुभव येतो. त्याचे अवघे अस्तित्व गुरूमय होऊन जाते. वेगळेपणाने न राहता शिष्य गुरूरूप/ब्रह्मरूप होतो. अशा उन्मनी अवस्थेत देखील नित्यसत्‌रूप कल्याणकारक सद्गुरूंचे स्मरण मात्र चालूच राहते. सिद्धावस्थेत असूनही सद्गुरूंचे वैखरी वाचेने चालू राहणारे नामस्मरण, हा त्यांचा सहजस्वभाव बनतो. ज्ञानोत्तर भक्तीचा हाच महिमा आहे.

''**जातस्य हि ध्रुवोर्मृत्युः ध्रुवं जन्म मृतस्यच ।**'' असे गीतेत म्हटले आहे. जे जे म्हणून जन्माला येते, त्याला मृत्यू अटळ आहे. हा नियम कोणीही चुकवू शकत नाही. म्हणून मृत्यूला 'महाभय' म्हटले आहे. मृत्यूपासूनच्या महाभयातून केवळ सद्गुरू त्याची सुटका करतात व त्याला 'अभय' देतात. गीतेमध्ये दैवी संपत्तीचे वर्णनामध्ये 'अभय' ला प्रथम क्रमांक दिलेला आहे. परमार्थात भयाला वाव नाही. आत्मा अमर आहे. मी जर आत्मरूप झालो तर मीही अमर होणार आहे. मला देह जाण्याची भीती राहणार नाही, अशी निर्भयता कशी येईल? द्वैतामुळे भय असते. आपल्याला नेहमी दुसऱ्याकडून भय वाटते, म्हणून मी जर अद्वैतबोधावर असेन तर मला कोणापासून व कशापासूनही भय राहणार नाही.

अशातऱ्हेने, ''मार्गशीर्ष वद्य पंचमी, शनिवार या दिवशी सद्गुरू स्वतः मजसमोर प्रगट झाले व त्यांनी ब्रह्मानंदाचे बोधामृत सार मला दिले. अशा या सद्गुरूचरणी हा दासराम अत्यंत प्रेमभावाने लोळण घेतो आहे,'' असे श्रीदासराममहाराज सांगतात.

***





## १५

**गुरुरायाचा रायाचा मी दास ।**
**त्याने रक्षावे रक्षावे आम्हास ।**
**मी तो हजर हजर सेवेस ।**
**त्यांचे उपकार काय बोलू वाणी ।।१।।**
**त्यांचे उपकार कधी न फिटती ।**
**किती अनंत केलिया हो भक्ती ।**
**परी ते नामाने संतुष्ट पै होती ।**
**त्यांचे उपकार काय बोलू वाणी।।२।।**
**त्यांनी मजला मार्गासी आणिले ।**
**परब्रह्म ते हाती आणुनी दिले ।**
**अज्ञानाचे हो मालिन्य धुतले ।**
**त्यांचे उपकार काय बोलू वाणी।।३।।**
**त्यांनी ज्ञान हे हृदयी जागृत केले ।**
**आपरूप ते मजला दाविले ।**
**गोविंदतनये चरण वंदिले ।**
**त्यांचे उपकार काय बोलू वाणी ।।४।।**

**अर्थ -** गुरूरायांचा मी दास असल्याने, त्यांच्या सेवेमध्ये सदैव तत्पर आहे. त्यांनी माझे रक्षण करावे अशी त्यांना मनोभावे प्रार्थना करीत आहे. त्यांची अपार, अनंत सेवा केली, भक्ती केली तरी त्यांचे उपकार फिटणारे नाहीत. केवळ नामाने ते संतुष्ट होतात, म्हणून मी अखंड नामस्मरण करतो. त्यांचे उपकार वाणीने व्यक्त होण्यासारखे नाहीत. त्यांनी मला खऱ्या परमार्थाचा मार्ग दाखविला आणि परब्रह्माची ओळख करुन दिली. माझ्या अंतःकरणातील अज्ञानाचा मल घालवून, तेथे आत्मस्वरूपाचे ज्ञान जागृत केले. माझे ब्रह्मस्वरूप मला दाखविले. म्हणून दासराममहाराज म्हणतात की, माझ्या सद्‌गुरूंचे उपकार कधीही न फिटणारे असून, मी त्यांना केवळ मनोभावे वंदन करीत आहे.

**विवरण -** सद्‌गुरूचे दास्यत्व पत्करणाऱ्या शिष्याचा मुमुक्षूपासून ब्रह्मप्राप्तीपर्यंतच्या प्रवासाचे वर्णन या अभंगात केलेले आहे. नवविधा भक्तींपैकी सातवी 'दास्यत्वभक्ती' आहे. सद्‌गुरूंचे दास्य अंगीकारल्याखेरीज भक्ती पूर्णत्वाला जात नाही. सद्‌गुरू माझे आहेत व मी सर्वस्वी त्यांचा आहे, अशा भावामध्ये दिव्य प्रेम प्रगट होत असते. आपले सद्‌गुरू प्रसन्न असावे एवढीच इच्छा असते. दास्यभक्ती विकसित झाल्याशिवाय, सद्‌गुरूंच्या अंतरंगामध्ये प्रवेश होत नाही. सद्‌गुरूंच्या अंतरंगात प्रवेश करण्याचा हा सर्वात सुलभ मार्ग आहे. दासाला स्वतंत्र अस्तित्व नसते, स्वतःची वेगळी इच्छा नसते. सद्‌गुरू आज्ञेचे पालन करणे एवढे एकच कर्तव्य उरते.





सद्‌गुरू शिष्याची गुरूभक्ती पाहून प्रसन्न होतात. मुमुक्षुत्व हे परमार्थाच्या प्रवासातील पहिला टप्पा आहे. सद्‌गुरु प्रथम आपल्या शिष्याचे मुमुक्षुत्व तीव्र करतात. आडमार्गी पाऊल न ठेवणे हाच अहर्निश परमार्थ आहे. आत्मस्वरुपाकडे जाण्याचा मार्ग सोडून, अन्य सर्व मार्ग हे आडमार्गच असतात. सद्‌गुरू शिष्याला परमार्थाच्या योग्य मार्गावर आणतात.

असे तीव्र मुमुक्षुत्व प्राप्त झाले असता, सद्‌गुरू संजीवन नामाचा उपदेश करतात. सद्‌गुरूंना आपल्याकडून कशाचीही अपेक्षा नसते. आपण मनापासून नाम घेतले की ते संतुष्ट होतात. म्हणूनच तुकाराममहाराजांनी म्हटले आहे, '**तेणे आम्ही सुखी । म्हणा विठ्ठल विठ्ठल मुखी ।।**'.

आपल्या अंतःकरणात मन, विक्षेप व आवरण असे तीन प्रकारचे दोष असतात. अंतःकरणाचा मल हा निष्काम कर्माने व सत्संगाने दूर होतो. परंतु अंतःकरणाचा मूलभूत 'मल' म्हणजे स्वरुपाचे अज्ञान होय. मी म्हणजे देह आहे याची खात्रीच असणे, हेच खरे अज्ञान होय. सद्‌गुरूने दिलेल्या नामाच्या अभ्यासाने हे अज्ञानाचे मालिन्य दूर होते. ज्ञान हेच केवळ अज्ञान दूर करण्याचा मार्ग आहे.

अंतःकरणातील मल व विक्षेप दूर झाले असता, मनाची शुद्धता व चंचलता दूर होते व केवळ आवरणदोष शिल्लक रहातो. हा आवरणदोष केवळ सद्‌गुरूकृपेनेच दूर होतो. येथे स्वतःचे प्रयत्न कामास येत नाहीत. मी आत्मरूप आहे / ज्ञानरूप आहे, असे ज्ञान

होणे, हीच ज्ञानाची जागृती होय.

अशी ज्ञानाची जागृती आली असता, सद्‌गुरू आपल्याला आपरूप/आत्म्याचे रूप दाखविणाचा डोळा प्रदान करतात. नाद, बिंदू, कला, ज्योतीरुपाने आत्म्याचे प्रकर्ष अनुभवास येतात.

परमार्थातील अखेरचा टप्पा म्हणजे ब्रह्मरूपतेचा अनुभव होय. आत्मज्ञानाची जागृती आल्यानंतर सद्‌गुरूकृपेने निश्चळ भक्तीच्या योगाने तो भक्त ब्रह्मरूप होऊन जातो. हीच सायुज्य मुक्ती होय.

अखेरीस श्रीदासराममहाराज म्हणतात, 'सद्‌गुरूंचे माझ्यावर अनंत उपकार आहेत. मी त्यांच्या दासांचाही दास आहे. त्यांनी मला माझे मूळ रूप दाखवून मुक्तच केले. त्यांच्या उपकाराची परतफेड होणे शक्य नाही. मी श्रेष्ठ अशा माझ्या सद्‌गुरूंना विनम्रभावे वंदन करीत आहे.'

***





## १६

**आत्मबोध कैसा प्रत्ययासी आला ।**
**आम्हावरी वोळला सद्गुरूराज।१।।**
**धन्य हनुमंत पांडुरंगसुत ।**
**जगामाजी मात केली ज्यांनी ।।२।।**
**हनुमंतकृपे वश झाला राम ।**
**होता जो दुर्गम ब्रह्मादिका ।।३।।**
**दासराम लीन गुरूचरणासी ।**
**प्रेमे आनंदेसी सर्वकाळ ।।४।।**

**अर्थ -** आपले सद्‌गुरू श्रीहनुमंतराय कोटणीसमहाराज हे मिथ्या जगावर मात करुन ब्रह्मपदी विराजमान झालेले महान संत आहेत. असे सद्गुरू माझ्यावर प्रसन्न झाले व त्यांच्या कृपेमुळे ब्रह्मा, विष्णु व महेश या तिन्ही देवांनाही दुर्लभ अशा आत्मारामाची भेट मला झाली. त्यामुळे आत्मबोधाचा अनुभव प्राप्त झाला. अशा आपल्या सद्‌गुरूचरणी लीन होऊन, हा दासराम नित्य प्रेमानंदाचा प्रत्यय घेत आहे, असे श्रीदासराममहाराज सांगतात.

**विवरण -** आपले सद्‌गुरू श्रीहनुमंतराय कोटणीसमहाराज यांचे महात्म्य वर्णन करणारा, दासराममहाराजांचा हा अभंग आहे. हणमंत पांडुरंग कोटणीस म्हणजेच श्रीतात्यासाहेब कोटणीसमहाराज हे

श्रीदासराममहाराजांचे सद्‌गुरू होते. सद्‌गुरू श्रीतात्यासाहेब महाराजांनी सांगली येथे नित्यकीर्तन सेवा केली. आपल्या नित्य हरिकीर्तनाद्वारे खऱ्या परमार्थाचे स्वरूप व त्याचे ज्ञान, लोकांच्या हृदयात रुजविले. त्यांनी चिमड संप्रदायाचे नांव सर्व महाराष्ट्रात सर्वतोमुखी केले. असे हे ब्रह्मीभूत संत श्रीतात्यासाहेबमहाराज व श्रीदासराममहाराज या दोहोंचा गुरूशिष्य संबंध पूर्वनियोजित होता. श्रीदासराममहाराजांना वयाच्या चौदाव्या दिवशी, कुरूंदवाड या गावी श्रीतात्यासाहेबमहाराजांनी, दृष्टिद्वारे अनुग्रह केला व या मुलाचे नांव 'राम' असे ठेवा असे म्हणाले. अशाप्रकारे आपल्या सद्‌गुरूंचा कृपानुग्रह आणि आशीर्वाद श्रीदासराममहाराजांना प्राप्त झाला. 'अनेक जन्मीच्या पुण्याईचे फळ म्हणून, संतकुळीचे राजे असलेले हे सद्‌गुरू मजवर प्रसन्न झाले आणि कृपा करुन आत्मबोधाचा प्रत्यय आणून दिला,' असे श्रीदासराममहाराज सांगतात.

'प्रत्यय' या शब्दाचा 'प्रत्यक्ष अनुभव' असा अर्थ आहे. दासराममहाराजांचा प्रत्ययावरती फार भर आहे. त्यांचे अवघे वाङ्मय हे आत्मबोधाच्या प्रत्ययावरती साकारलेले आहे. सर्वप्रकारच्या प्रचीतिमध्ये 'आत्मप्रचीति' ही सर्वश्रेष्ठ होय. या प्रचीतिमध्ये अन्य सर्व प्रचीतिंचा अंतर्भाव होतो. ज्या गोष्टींचा प्रत्यक्ष अनुभव येत नाही, ते 'अनुमान' होय. प्रत्यक्ष अनुभवामध्ये तात्विक भेद, विचारामधील विरोध, विसंगती इत्यादि गोष्टी विरघळून जातात. सर्वत्र आत्माच आहे असे पाहणारा, जाणणारा मनुष्य, आत्म्याचेच ठिकाणी रममाण होऊन राहतो. आत्म्याचेच सुख भोगतो व आनंद





पावतो. श्रीदासराममहाराजांनी सद्‌गुरूचरणी लीन झाल्यानंतर प्राप्त होणाऱ्या भक्तीप्रेमातील सुखाला व आनंदाला अद्वैत-अनुभवपर अर्थ दिलेला आहे. सद्‌गुरूकृपेने सर्व चंचळाचा अर्थात प्रकृतीचा संपूर्ण निरास होतो आणि साररूप असे निश्चळ ब्रह्म तेवढे शिल्लक राहते. चैतन्य अविनाशी आहे. चैतन्य हे अमृत आहे. शरीर नाश झाले, दृश्य विश्व जरी नष्ट झाले तरी, चैतन्य कधीच नष्ट होत नाही. सद्‌गुरूकृपेने आपण चैतन्यरूपच होऊन जातो.

मूळमाया हे ईश्वराचे स्वरूप आहे. सृष्टीची उत्पत्ती सगुण निराकार ईश्वरातून झाली अशी संकल्पना आहे. ब्रह्मा, विष्णु व महेश हे अनुक्रमे रजोगुण, सत्वगुण व तमोगुणाचे स्वामी आहेत. ब्रह्मा हा विश्व उत्पत्ती करतो, विष्णु सृष्टीचे पालन करतो व महेश त्याचा संहार करतो. ईश्वर म्हणजेच ब्रह्मादिदेव कल्पांती लयास जातात. त्यावेळी त्यांचे सामर्थ्य शिल्लक रहात नाही. हे सर्व देव ब्रह्मस्वरूपात लय पावतात, म्हणजेच ब्रह्मादि देवांनाही ब्रह्मस्वरूपाचा महिमा कळत नाही. गुरू हे ब्रह्मरूप असतात. ब्रह्मरूप गुरूतत्त्व शाश्वत आहे. म्हणून सद्‌गुरूंहून ज्यांना देव मोठा वाटतो, त्यांना समर्थांनी 'करंटा' म्हटले आहे. त्यामुळेच ब्रह्मादि देवांनाही सद्‌गुरूंचा महिमा कळत नाही असे म्हटले जाते.

'अशा या सद्‌गुरूंच्या कृपेने आत्मारामाची भेट झाली, म्हणून मी त्यांच्या चरणाशी लीन होऊन प्रेमानंदाचा नित्य अनुभव घेतो आहे' असे श्रीदासराममहाराज सांगतात.

***

## १७

**गुरुनाम सर्वांमाजी थोर पुण्य ।**
**संती धन्य धन्य म्हणितले ।।१।।**
**गुरुकृपा गुरुनाम उच्चारण ।**
**लाविले निशाण वैकुंठासी।।२।।**
**साधुमहाराजांच्या दर्शनासी गेला ।**
**जगी धन्य झाला हरिभक्त ।।३।।**
**ऐसा गुरुपुत्र अद्वैती निमाला ।**
**गोविंदतनय झाला शरण त्यासी ।।४।।**

**अर्थ -** गुरूकृपा व गुरूनामाच्या उच्चारणाच्या तपाने उर्जीत झालेल्या पुण्याईने, श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराजांनी ब्रह्मरूपता प्राप्त करून घेतली आणि जगामध्ये एक थोर हरिभक्त म्हणून विख्यात झाले. ते खऱ्या अर्थाने गुरूपुत्र होते. कारण ते निंबरगीकर महाराजांच्या अंतरंगातील पट्टशिष्य होते. दासराममहाराज सांगतात की जो साधक श्रद्धाभावाने चिमड येथे जाऊन, साधुमहाराजांचे दर्शन घेईल, तोही 'हरिभक्त' होईल. अशा अद्वैत ब्रह्मस्थितीतील साधुमहाराजांचे ठायी दासराम शरणागत आहे.





**विवरण -** श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज हे निंबरगीकरमहाराजांचे पट्ट शिष्य होते. चिमड येथे त्यांची समाधी आहे. आजही ते आपल्या भक्तांसाठी चिमड येथे वास्तव्यास आहेत, अशी भक्तांची श्रद्धा आहे. साधुमहाराजांची महती गाणारा हा अभंग आहे. '**चुकवी जो जन्ममरण । ऐशा कर्मा नाव पुण्य ।।**' (श्रीदासराममहाराज). ज्या कर्माच्या योगे जन्ममरणरूप संसार संपून जातो, ते पुण्यकर्म होय. अनेक संतांनी, परमार्थामध्ये पुण्यकर्म कशाला म्हणतात ते सांगितले आहे. '**हरिमुखे म्हणा हरिमुखे म्हणा । पुण्याची गणना कोण करी ।।**' असे सांगून ईश्वराचे नाम घेणे हे पुण्यकर्म आहे, असे श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात. श्रीमामामहाराज केळकर म्हणतात, '**रामपाठ करी रामपाठ करी । पुण्याची ही थोरी वर्णवेना ।।**' मामामहाराजांच्या मते, रामनाम घेणे हेच थोर पुण्य आहे. या रामनामाने देवाचे दर्शन होते आणि जन्ममरणातून सुटका म्हणजेच मुक्ती प्राप्त होते. थोडक्यात म्हणजे, ईश्वराचे नामस्मरण हे पुण्याचे फार मोठे काम आहे. या नामसाधनेच्या योगे, द्वैतरूप - जन्ममरणरूप संसार संपून जातो. संसाराचे बंधन तुटते व मोक्ष प्राप्त होतो.

श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराजांनी, गुरूनामाचे साधनाचा अभ्यास करून ईश्वरप्राप्ती/ मोक्षप्राप्ती करून घेतली. गुरुनामाच्या उच्चारणतपाने वैकुंठी निशाण लावले व जगी धन्य होऊन राहिले. वैकुंठ म्हणजेच आत्मा/परमात्मा/ईश्वर होय. परमात्मप्राप्तीने त्यांचे अंगी दैवी गुण प्रगटले. अंगी दैवी गुण प्रगटणे, हीच परमात्मस्वरूपाच्या

प्राप्तीची  निशाणी आहे.

साधुराज हे गुरुपुत्र होते. गुरूपुत्र याचा अर्थ गुरूचा औरस पुत्र असे नसून,गुरुचा सत्‌शिष्य असा आहे. अशा खऱ्या गुरुपुत्राला परमार्थाची खूण पटते. पण ज्यानी गुरू केलेला नाही, त्यांना परमार्थ हा विषय असाध्य ठरतो. परमार्थाबद्दल त्यांच्या मनात केवळ संशयकल्लोळ असतो. म्हणून दासराममहाराजांनी अन्यत्र एका अभंगात म्हटले आहे की, ''**खूण तो जाणेल गुरूपुत्र केवळ । संशयकल्लोळ येरा मनी ।।**''.

जीव हा द्वैतात घुटमळत असतो. मूळ आत्मरूप मात्र अद्वैत आहे. द्वैतात भय व दुःख आहे. अद्वैताचे सुख आगळे असून, तेथे दुःख व भय औषधालाही सापडत नाही. ब्रह्मरुपता ही अद्वैताची असते. साधुमहाराज अशा अद्वैतस्थितीशी एकरूप होऊन राहिलेले आहेत.

श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज हे थोर हरिभक्त होते. ज्याने आत्म्याचे/ब्रह्माचे ज्ञान करून घेतलेले आहे, त्यास 'हरिभक्त' म्हणतात. जगाच्या संसारचक्राकडे ते मिथ्यत्वाने पहात असतात व जगाच्या उपाधीच्या आत सर्वत्र वसत असलेल्या चैतन्याचाच स्विकार करतात. चैतन्य म्हणजेच ब्रह्म व ब्रह्म म्हणजेच हरि. म्हणून त्यांना सर्व सृष्टी हरिरूप दिसते. अशा या चिमडक्षेत्री स्थित असलेल्या हरिभक्त





साधुमहाराजांच्या दर्शनाला जाणारा सद्‌भक्तही हरिरूपच होऊन जातो असे श्रीदासराममहाराज सांगतात.

अशातऱ्हेने 'गुरूभक्ती व गुरूनामाने ब्रह्मरूप होऊन, अद्वैत अवस्थेत स्थित असलेल्या रघुनाथप्रिय साधुमहाराजांच्या ठायी हा दासराम शरणागत आहे,' असे श्रीदासराममहाराज सांगतात.

***

## १८

**श्रीगुरू माऊली सद्गुरूमाऊली ।**
**जय जय गुरु माऊली गुरु माऊली।।१।।**
**निर्वासन मम करुनी टाकिसी ।**
**करिसी कृपा साऊली साऊली।।२।।**
**हरिभक्तीने प्रेरित होऊनी ।**
**कीर्तन गुण गाउली गाउली ।।३।।**
**पान्हावली प्रभु प्रेमरसाते ।**
**पाहुनी मम तान्हुली तान्हुली ।।४।।**
**बहू अपराधा पोटी घेण्या ।**
**वायुगती धावली धावली ।।५।।**
**दासराम हे बाळ नमितसे ।**
**ठेवूनी शिर पाऊली पाऊली ।।६।।**

**अर्थ -** सद्गुरू माऊलीचा जयजयकार असो. त्यांनी माझ्यावरती कृपेची सावली केली. त्यामुळे मी आसक्तीमुक्त झालो, निर्वासन झालो. सद्गुरूमाऊलीनी हरिभक्तीने प्रेरित होऊन, कीर्तनामध्ये हरिगुणगायन केले. त्यामुळे सर्वत्र भक्तीरसाचा/हरिरसाचा उत्कर्ष





झाला. सद्गुरू हे अत्यंत दयाळू आहेत. माझ्याविषयी प्रेमरसाचा पाझर फुटल्याने, माझ्या सर्व अपराधांना पोटी घालण्यासाठी माऊली त्वरेने धावून आली. अशा माझ्या सद्गुरूंच्या पाऊली हा दासरामबाळ नमन करीत आहे.

**विवरण -** सद्गुरू माऊलींनी (श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस) दयाळूपणाने आपल्यासाठी कोणकोणत्या गोष्टी केल्या याचे वर्णन दासराममहाराजांनी या अभंगामध्ये केलेले आहे. दासराममहाराजांनी आपल्या सद्गुरूंना ‘माऊली’ म्हणून संबोधले आहे. सर्व प्रकारच्या मानवी नात्यामध्ये आई-मुलाच्या प्रेमाच्या नात्याला अन्य उपमा देता येत नाही. प्रेमाचा अत्युच्च आविष्कार या नात्यामध्ये दिसतो. आईचे प्रेम हे निःस्वार्थी व निरपेक्ष असते. सद्गुरूचे प्रेमही आईच्या प्रेमाच्या नात्यासारखे आहे. म्हणून आता सद्गुरूमाऊली असे म्हटले जाते. आई ज्याप्रमाणे आपल्या बालकाच्या हितासाठी तत्पर असते, तसे सद्गुरुमाऊली देखील आपल्या भक्तासाठी धावून येते व त्याच्यावर कृपेची सावली धरते.

श्रीदासराममहाराज म्हणतात की, माझे सद्गुरूही माझ्यासाठी धावून आले. माझ्यावर कृपा केली आणि मला आसक्तीरहित निर्वासन करुन टाकले. या जगातील सर्व बाह्य वस्तुविषयी, व्यक्तिविषयी वाटणारी आसक्ती/प्रेम यांचा अभाव म्हणजे वैराग्य होय. जगातील सर्व वस्तु/व्यक्ती ह्या नश्वर आहेत. म्हणून त्यामध्ये आपली मानसिक गुंतवणूक करु नये, हा विवेक

उत्पन्न व्हावयास हवा. विचाराने कांही काळ असे वैराग्य उत्पन्न होते, परंतु मोहाच्या पुढच्या क्षणी ही वैराग्यवृत्ती मावळून जाते. विकार प्रबळ होतात व अंतःकरण पुन्हा गढूळ बनून जाते. परंतु '**वैराग्यावाचून काही ज्ञानास तगणे नाही**'. (पूर्ण वैराग्य प्राप्त झाल्याशिवाय अखंड ज्ञानावस्था प्राप्त होऊ शकत नाही.) जगावर आसक्ती ठेऊन 'मी आत्मा आहे' असे ज्ञान होणे शक्य नाही. '**भक्तीस मूळ विरक्ती, ज्ञानास मूळ अग्नि**' **(बुद्धितील तेजतत्त्व)**. आत्मदेवाच्या भक्तीसाठी वैराग्य जरुरी आहे. सद्‌गुरूंना शरण गेल्याने वैराग्य स्थिर होते. वैराग्याची प्राप्ती होणे ही सद्‌गुरुंची सर्वात मोठी कृपा आहे.

आपले सद्‌गुरू श्रीहनुमंतराय कोटणीसमहाराज यांच्या नित्याच्या कीर्तनाचे वर्णन करताना दासराममहाराज म्हणतात की, त्यांचे कैवल्य कीर्तन म्हणजे हरिभक्तीच्या उत्कटतेचा उच्च अनुभव होता. रज-तम-सत्व गुणात आधारलेल्या देहभावावर राहून कैवल्यकीर्तन केले जाऊ शकत नाही. '**श्रोता आणि वक्ता स्वये झाला श्रीरंग**' अशा प्रकारची प्रचिती आणून देणारे ते कीर्तन होते. त्यांचे कीर्तन म्हणजे अखंडपणे चाललेल्या ब्रह्मचिंतनाचा आविष्कार होता. त्यांच्या कीर्तनावर चैतन्याचा रंग चढलेला असे. शुद्ध सत्वगुणाचा आविष्कार असलेले त्यांचे कीर्तन म्हणजे चैतन्याचे अवीट गाणे होते. त्या कीर्तनामध्ये अखंड प्रीतिरसाची उधळण असे. असा सद्‌गुरूंच्या हरिकीर्तनाचा थाट होता.





सद्‌गुरूंची भेट होणे ही दुर्लभ गोष्ट आहे. पूर्वपुण्याईने अशी भेट झाली असता, सद्‌गुरू अनुग्रह देतात. अनुग्रहानंतर सद्‌गुरूंनी सांगितल्याप्रमाणे साधन करणे आवश्यक आहे. असे साधन न करणे हा 'अपराध' होय. त्याप्रमाणे सद्‌गुरू, नामाचा उपदेश करतात. असे नामसाधन करताना काही पथ्ये पाळावी लागतात. 'विषय त्यागपूर्वक' नामस्मरण हवे, अन्यथा तो 'नामापराध' ठरतो. असा अपराध झाला आणि त्याचा पश्चात्ताप झाला असता, सद्‌गुरूंना सत्वर शरण जावे म्हणजे ती प्रेमरसमूर्ती आपले अपराध पोटी घालून, आपल्याला पुन्हा परमार्थाच्या मार्गावर आणण्यास सत्वर धावून येते.

हा बालक अशा दयाळू सद्‌गुरूमाऊलींच्या चरणी मस्तक ठेऊन त्यांना नमन करीत आहे, असे दासराममहाराज सांगतात.

***

## १९

**अनुपम हातोटी गुरूविना कळेना।**
**जरी झाले ज्ञाना साधनाच्या।।१।।**
**अनुभव येई घडता साधन ।**
**साधन हे पुण्य थोर बहू ।।२।।**
**प्रक्रियेचे रूप उगाउगी न कळे ।**
**जव हा न गळे अहंभाव ।।३।।**
**गुरूकृपा झाल्या सोपे होय सर्व ।**
**दासरामा देव येई हाता ।।४।।**

**अर्थ -** परमार्थातील तत्त्वज्ञान व त्यातील साधनप्रक्रियेचे बौद्धिक ज्ञान झाले तरी, ती साधनप्रक्रिया साधण्याची हातोटी/वर्म हे गुरुविना कळत नाही. गुरुकृपेने ती हातोटी साधली असता, साक्षात्काराचा अनुभव प्राप्त करुन देणारे साधन व त्या साधनेतून प्राप्त होणारे थोर पुण्य/शुद्ध पुण्य हाती येते. ही प्रक्रिया सहजासहजी साधणारी नाही. अहंभावरहित होऊन सद्गुरूंना शरण गेल्याने, त्यांची कृपा होते व त्यामुळे परमार्थ मार्गावरील वाटचाल सोपी होऊन जाते.

**विवरण -** नामसाधनेची अनुपम हातोटी ही केवळ सद्गुरुकृपेने प्राप्त होते, हा या अभंगाचा विषय आहे. कोणत्याही





गोष्टीचे बौद्धिक ज्ञान म्हणजे त्या वस्तुचा अनुभव नसतो. आत्मस्वरूपाविषयीचे ज्ञान, तात्विक सिद्धांताचे ज्ञान किंवा साधनप्रक्रियेचे परोक्ष ज्ञान / बौद्धिक ज्ञान हे पूर्णतः निरुपयोगी नाही. त्या विषयाचे बौद्धिक आयुक्त होण्याच्यादृष्टीने त्याचे निश्चितच महत्व आहे. पारमार्थिक विषयाच्या/ग्रंथांच्या अभ्यासाने, नित्यानित्यविवेक जागृत होऊन, परमार्थाची प्रेरणा होणे व मुमुक्षूत्व अंगी बाणणे, हा त्याचा लाभ आहे. परंतु यापुढील प्रवासात सद्गुरुंशिवाय एकही पाऊल पुढे पडणार नाही. यासाठी सद्गुरुंचा अनुग्रह व बोध होणे आवश्यक आहे.

सद्गुरू हे आत्मसाक्षात्कारी असतात. त्यामुळे त्यांनी केलेल्या परमार्थविषयीच्या बोधाला विशेष महत्व आहे. तो बोध बुद्धित ठसतो कारण, त्यांच्या शब्दांनी त्यांचा स्वानुभवच व्यक्त होत असतो. आपल्या शिष्याचे मुमुक्षूत्व तीव्र स्वरूपाचे झाल्याची खात्री होताच, ते ती साधनप्रक्रिया त्याचे ठिकाणी उमटवतात. म्हणजेच त्या शिष्याची इडा व पिंगला सुषुम्नाकार होऊन, प्राणगती उर्ध्वदिशेने वाहू लागते. हीच हातोटी साधण्याची खूण होय. उर्ध्वगतीने वाहणारा प्राण मस्तकात साचणे, हाच खरा पुण्यसंचय होय. हेच ते थोर पुण्य होय. येथे नाद व प्रकाशाचा अनुभव येऊ लागतो. नादाच्या अनुसंधानाने चित्तवृत्ती आत्माकार होण्यास मदत होते. नाद हा आत्म्याचाच प्रकर्ष असलेने नादश्रवणाला/नादानुसंधानाला अत्यंत महत्व आहे. नादानुसंधान करता करता, परमानंदाचा चिरकालीन अनुभव येत

रहातो. यामुळे होणारा चित्ताचा लय हा इतर अनेक लयांच्या अपेक्षेने अत्यंत श्रेष्ठ आहे. म्हणूनच, ''हे नादानुसंधाना, तुला नमस्कार असो. तुझी योग्यता फार मोठी आहे. कारण तू 'तत्त्वपदाचे' साधन आहेस. तुझ्या प्रसादाने माझे मन विष्णुपदी लीन होते'' असे श्रीमद् शंकराचार्य म्हणतात. नामस्मरणाशी तदाकारता हे आत्मस्मरणच होय, असे श्रीदासराममहाराज म्हणतात.

हे सर्व साधण्यासाठी सद्‌गुरूंचे ठिकाणी शरणागती हवी. सद्‌गुरूंच्या ठिकाणी शरण जाणे म्हणजे आपले सारसर्वस्व त्यांना देणे. एकवेळ आपल्याकडील लौकिकात असणारे पैसा, सत्ता, संपत्ती वगैरे सर्व आपण सद्‌गुरूंना देऊ शकतो, परंतु आपल्यामधील 'मी'रुपी अहंकार सद्‌गुरूचरणी वाहणे अत्यंत कठीण गोष्ट आहे. हा 'मी'पणा सर्व अनर्थाचे मूळ आहे. हा 'अहंकार' प्रपंच व परमार्थ या दोन्ही ठिकाणी अत्यंत घातक आहे. 'मी' पणा सद्‌गुरूंना देता येत नसेल, तर भगवत्‌दर्शन होणे दुरापास्तच आहे. देहबुद्धिमध्ये मी व माझेपणाचे मूळ आहे. देहबुद्धिच्या जागी आत्मबुद्धि होणे हे सद्‌गुरूंच्या कृपेवर अवलंबून आहे.

गुरूकृपेने ब्रह्म होण्याची अंतिम प्रक्रिया म्हणजेच सोऽहंरूप होण्याची प्रक्रिया अवगत होते. सोऽहंदेव हाताशी येतो. थोडक्यात म्हणजे गुरूकृपेने स्वरूपाकडे जाण्याचा नेमका मार्ग कळतो आणि सोऽहंरूप होण्याची वाटचाल सुलभ होते, असे श्रीदासराममहाराज सांगतात. ✻✻✻





## २०

**गुरुराजे कृपा केली ।**
**वृत्ती आनंदित झाली ।।१।।**
**खरे खोटे दाखविले ।**
**बरे डोळे उघडिले ।।२।।**
**नाममंत्र सांगितला ।**
**सोपा मार्ग दाविंयेला ।।३।।**
**आत्मरूप प्रगट केले ।**
**बोल अबोल सरले ।।४।।**
**दास स्वरूपी मिळाला ।**
**जगी होवोनी मोकळा ।।५।।**

**अर्थ -** गुरूकृपेने प्राप्त होणाऱ्या अनुभवाचे वर्णन करणारा, दासराममहाराजांचा हा अभंग आहे. गुरुराजाने कृपा केली, त्यामुळे आत्माकार वृत्तीमध्ये आनंद पसरून राहिला आहे. 'ब्रह्म सत्य असून जगत् मिथ्या आहे' असा अनुभव देणारी 'ज्ञानदृष्टी' सद्‌गुरुरायांनी उघडली. त्यांनी नाममंत्राचा सोपा मार्ग दाखविला. त्यामुळे बोलणे-अबोलणे हे दोन्हीही संपून गेले व हृदयी आत्मरूप

प्रगट झाले. अशातऱ्हेने जीव-शिवाचा संयोग होऊन, दासराम जीवनमुक्तच होऊन राहिला आहे.

**विवरण -** सद्‌गुरूंच्या कृपादृष्टिचा अनुभव सांगणारा हा अभंग आहे. सद्‌गुरूंनी कृपा केली आणि त्यांनी नाममंत्र दिला. हे 'नाम' तात्विक स्वरूपाचे असून, ते साध्यही आहे आणि साधनही आहे. सद्‌गुरूंनी सांगितल्याप्रमाणे नामसाधनेमध्ये, श्वसनातील प्राणगतीचे उर्ध्वगमन अपेक्षित आहे. या प्राणगतीतील नामसाधनेने चिदाकाशामध्ये आत्मरूप प्रगटले म्हणजेच तेथे सोऽहंज्योतीचा अनुभव आला.

सद्‌गुरूकृपेने खऱ्या-खोट्याचा निवाडा होतो. वेदांतानुसार, ब्रह्म सत्य असून जगत् मिथ्या आहे. उदाहरणार्थ, अंधुक प्रकाशात पडलेला रज्जू आहे, हा सर्प भासू लागतो. बॅटरीच्या प्रकाशात तो सर्प नसून रज्जू आहे हे कळताच, सर्प मिथ्या/खोटा ठरतो. त्याप्रमाणे ब्रह्माचे ज्ञान होताच ब्रह्मावर भासणारे जग मिथ्या ठरते. मायेमुळे/अज्ञानामुळे जीवाला ब्रह्मावर जग भासते. ब्रह्मावर जगाचा विक्षेप दाखविणे/आभास दाखविणे हे मायेचे/अज्ञानाचे अद्‌भूत कार्य आहे. ब्रह्मावर जग दिसते/भासते व ब्रह्माच्या ज्ञानाने जगाचा भास संपतो. जगाचा भास होणे व तो भास संपणे म्हणजेच जगाची उत्पत्ती आणि नाश होय. भास हा नेहमीच मिथ्या/खोटा असतो. म्हणून जगाची उत्पत्ती व नाश हे दोन्ही सत्य नसून मायीक आहे. सद्‌गुरूंनी कृपा केली आणि त्यांनी जगन्मिथ्यत्वाची ज्ञानदृष्टी दिली. सद्‌गुरू





अज्ञान घालवतात व ब्रह्म हे सत्य असून, हे जगत् खोटे/मिथ्या आहे असा बोध करतात.

ब्रह्मरुपतेने साधनेला पूर्णता येते. त्यासाठी व्यवहारातील उदाहरण दिले आहे. पुरी तळायला टाकली असता, चुरचुर असा आवाज करते. पण जेव्हा ती पूर्ण तळून होते, तेव्हा चुर चुर हा आवाज थांबतो. साधकाच्या देहभावावरील साधनेमध्ये पूर्णता नसते. बाह्य वाचा पूर्णतः बंद झालेली असते. परंतु साधक जेव्हा, देहभावरहित अवस्थेत येतो, तेव्हा अबोलण्याचे बोलणे सुरू होते. ''**बोलो अबोलणे मरोनिया जीवे । असोनी नसणे जनी आम्हा ।।**'' तुकाराममहाराजांच्या उक्तीप्रमाणे, जीवे मरुनच अबोलाचे बोलणे बोलावे लागते. अहंकाराने सळसळणाऱ्या जीवनात हे शक्य नाही. जीव अबोलाच्या बोलण्यात म्हणजेच चैतन्याच्या बोलण्यात येतो. सोऽहंस्मरण हेच चैतन्याचे/अबोलाचे बोलणे होय.

आत्मरूप झाले असता वृत्ती आनंदी होते. सुषुम्नाकार जीवनात उतरणारा चैतन्याचा नाद हे ईश्वराचे नाम आहे. हे खरे तत्त्वरूप नाम होय. चैतन्याच्या नादाशी तदाकार झाले/ एकरूप झाले असता, जीव चैतन्यरूप/ईश्वररूप होऊन जातो. चैतन्य हे आनंदच आहे. म्हणून जीव हा आनंदवृत्तीचा अनुभव आहे. आत्मरूप झालेला जीव आनंदरूपच होतो.

मायेच्या मोहातून जो सुटला तोच मुक्त झाला, मोकळा

झाला. देहाचा बंध सुटला असता जीव मोकळाच होतो. ''**न बंधो न मोक्षः**'' मुक्त स्थिती हे जीवाचे खरे स्वरूप आहे. ते त्याने प्रयत्नपूर्वक, सद्गुरूकृपेने प्राप्त करून घ्यायचे असते. जो मायेत गुंतून राहतो, तो मायेच्या कचाट्यातून कधीच सुटत नाही. म्हणून मुक्त होणे/मोकळे होणे हे मानवी जीवनाचे ध्येय आहे.

अशातऱ्हेने, सद्गुरूकृपेने आपण स्वरूपाशी एकरूप झालो व आपणास सायुज्यमुक्ती प्राप्त झाली, असा हा स्वानुभव श्रीदासराममहाराजांनी येथे सांगितलेला आहे.

***





## २१

**सद्गुरूंची थोर दया ।**
**जैसी पिलावरी माया ।।१।।**
**संत उदार उदार ।**
**भक्ता दे नाम भांडार ।।२।।**
**अहो भाग्यवंत संत ।**
**काय वानू भगवंत ।।३।।**
**दास म्हणे मी तो हीन ।**
**धरितो संतांचे चरण ।।४।।**

**अर्थ -** सद्गुरू अत्यंत दयाळू असतात. ज्याप्रमाणे पक्षिणी आपल्या पिलावर माया करते, त्याप्रमाणे सद्गुरू आपल्या शिष्यावर प्रेम करतात. ते मातृप्रेम असते. संत/सद्गुरू हे दैवीगुण संपन्न असून, त्यांच्याकडे असलेल्या अमाप नामभांडारातून, भक्तांसाठी नाममंत्र देतात. संत हे देवच असतात. मी अत्यंत हीन दीन असून, अशा भगवत्स्वरूप सद्गुरूंचे/ संतांचे चरण मी धरतो आहे, असे श्रीदासराममहाराज सांगतात.

**विवरण -** संतांच्या दयाळूपणाचे व औदार्याचे वर्णन ह्या अभंगात आलेले आहे. पक्षिणीची आपल्या पिलावर माया असते. ''**घार हिंडते आकाशी । चित्त तिचे पिलापाशी ।।**'' याप्रमाणे सद्गुरूंचे

आपल्या सत्शिष्यावरती सतत लक्ष असते. ते सदैव त्याची काळजी घेत असतात. सद्गुरूंच्या मनात कोणत्याही प्रकारचा संकल्प-विकल्प नसतो. त्यांच्या अंतःकरणात केवळ दया असते. आपला अपमान करणाऱ्या, दुःख देणाऱ्याविषयी देखील त्यांच्या मनात कळवळा असतो. असा शांतीपुरुष अत्यंत शांत असतो. ''**हे विश्वचि माझे घर। ऐसी मति जयाची स्थिर । किंबहुना चराचर । आपणचि जाहला ।।**'' अशी ज्ञानी महात्म्याची स्थिती असते. वास्तविक 'ममता/माया' हा दोष आहे याचे कारण, आमची ममता 'मी व माझे' एवढ्या पुरती मर्यादित असते. संतांच्या ठिकाणी सगळेच माझे, मीच विश्वरूपाने आहे, अशी भूमिका असल्याने त्यांचे ठिकाणी असलेली 'ममता' हा त्यांचा 'दैवीगुण' ठरतो.

सद्गुरू/संत हे श्रोत्रीय, ब्रह्मनिष्ठ व दयाळू असतात. आपले आयुष्य कांही एवढेच नाही. अनेक जन्मांमधून हा प्रवास सुरू आहे. आधीच्या जन्मात केलेल्या प्रयत्नांचाच हा जन्म एक भाग असतो. आपल्याला आपला पुढला व मागील जन्म माहित नसतो. परंतु सद्गुरूंना मात्र त्या जीवाची मागील जन्माची गती दिसत असते. ते पाहूनच योग्य ते मार्गदर्शन करीत असतात. सद्गुरू सर्वसमर्थ असतात. त्यांना दया आली असता, आपली मलीन बुद्धि शुद्ध होते. पापसंस्कार नाहिसे होतात. '**आपणासारखे करिती तात्काळ । नाहीं काळवेळ तयालागी ।।**' एवढे त्यांचे सामर्थ्य असते.

सद्गुरू हे अत्यंत 'उदार' आहेत. ते मोक्षश्री अलंकृत श्रीमंत





असतात. त्यांच्याकडे मोक्षाची श्रीमंती असते. ते ज्ञान, वैराग्यादि दैवी संपत्तीने परिपूर्ण असतात. त्यांच्याकडे कधीही न संपणारे नामाचे भांडार असते. याचे कारण ते स्वतः नामरूप असतात. अत्यंत उदारपणाने ते रामनामाची लयलूट करीत असतात. फक्त ते अनमोल दान आपल्या पदरात पाडून घेण्याची आवश्यकता असते. आपल्या सत्शिष्याचा अधिकार पाहून सद्गुरू आपणहून असा नाममंत्र त्याला देतात.

मनुष्यजन्म, मुमुक्षत्व व सद्गुरूभेट या तिन्ही गोष्टी दुर्लभ आहेत. याचा अर्थ या गोष्टी आपल्या प्रयत्नांनी मिळणाऱ्या नाहीत. देवाची कृपा, देवाची इच्छा असेल तरच हे घडते. देवाच्या कृपेने संतकृपा व त्यांची सेवा घडते व पुढील परमार्थाच्या उन्नतीचा मार्ग सापडतो. अशा सद्गुरूंचे स्तवन करण्यात अपार सुख असते, निःशब्द आनंद असतो, असा अनेक संतमहात्म्यांचा अनुभव आहे. ही संधी मिळायला भाग्य लागते. अनेक जन्मात पुण्य कर्मे केल्यावरच सद्गुरूंचे स्तवन करण्याचे भाग्य लाभते.

श्रीदासराममहाराज स्वतःला 'हीन' म्हणून घेतात. त्यामध्ये एक मर्माची गोष्ट आहे. ज्ञानदेव अमृतानुभवामध्ये, 'परमात्मा अहंकाररहित आहे हे सांगताना, '**लघुत्वाचेंनि मुद्दले । बैसला गुरूत्वाचेंनि से ले ।।**' अहंकाररहित असल्याने, परमात्मा अत्यंत सूक्ष्म व अत्यंत व्यापक/थोर आहे. जीवानेही अहंकार सोडला,

लघुत्व धारण केले तर तोही परमात्माच होईल. म्हणून 'दीनभाव' घेतला पाहिजे व सद्गुरूंचे ठिकाणी लीन झाले पाहिजे.

'भाग्यवान अशा संत सद्गुरूंची महती वर्णन करण्यासाठी मजजवळ शब्द नाहीत, म्हणून मी त्यांचे चरणी लीन होऊन राहिलो आहे,' असे श्रीदासराममहाराज म्हणतात.

***





# २२

**राजहंसालागी मोतियाचा चारा । यात आला सारा परमार्थ ।।१।।**
**हंसरूप दावी स्वये हनुमंत । धन्य सद्गुरूनाथ बापूराव ।।२।।**
**सत्य श्री समर्थ गुरुलिंगनाथ । त्यांचे कृपांकित थोर थोर ।।३।।**
**स्वरूप लोपले तेंचि ते दाविले । दासराम लोळे गुरूपायी ।।४।।**

**अर्थ -** हंस पक्ष्यासाठी मोत्यांचा चारा जितका महत्वाचा, तसेच हंसरूप आत्म्याकरिता प्राणस्पंद महत्वाचा आहे. या हंसरूप आत्म्याच्या प्राप्तीचा मार्ग सद्गुरू श्रीहणमंतराव कोटणीसमहाराजांनी दाखविला. तसेच पितृदेव मामामहाराज केळकरांनी (बापूराव केळकर) सोऽहंहंसाचे स्वरूप स्पष्ट करून सांगितले. तर ब्रह्मस्वरूप सद्गुरू श्रीगुरूलिंगजंगममहाराज हे मोक्षदाते असून सर्व समर्थ आहेत. त्यांनी लोपलेला स्वरूपमार्ग सर्वांसाठी खुला केला. त्यांचे कृपांकित अनेक थोर संत होऊन गेले. अशा गुरूंचे पायी हा दासराम लोळण घेत आहे.

**विवरण -** श्रीगुरूलिंगजंगममहाराज यांचेपासून चालत आलेल्या, निंबरगीसंप्रदायातील सोऽहंस्वरूपज्ञान व साधन यांचे महत्व सांगणारा हा अभंग आहे. ''**हंसावरती राम बैसुनि चालले हो पुढती। हंस कसा मग उड्डाण करितो खाली आणि वरती ।।**'' श्रीतात्यासाहेबमहाराजांनी या पदामधून 'सोऽहं-हंसः' याचे मर्म

उलगडून दाखविले आहे. चिदाकाशातील अंगुष्ठप्रमाण सोऽहंदीप/सोऽहंज्योती ही हंसस्थिती होय.सोऽहंहंसःच्या प्राणगतीच्या संघर्षातून सोऽहंदीप होतो. दीप म्हणजे प्रकाश - प्रकाश म्हणजे ज्ञान. म्हणून हंसस्थिती म्हणजे आत्मज्ञानाची स्थिती. या हंसावरती ब्रह्मरूपी राम विराजमान आहे. म्हणून 'स'कार व 'ह'काराच्या पंखाद्वारे, हंसाचे उड्डाण (श्वसन) चालू आहे. हे आत्म्याचे श्वसन आहे. राजहंस पक्षासाठी जसा मोत्यांचा चारा तसे या हंसरुपी आत्म्यासाठी सोऽहंगतीमधील प्राणाचा चारा लागतो. मात्र हंसदीपाचे ठिकाणी हा प्राण गुप्तरूपाने असतो. '**दिवा वाऱ्या घाली खेव । याचा घ्यावा अनुभव ।।**' हा गुप्त अनुभव केवळ योगीच जाणतात. हेच कल्पांताचे बीज आहे. जीवाच्या सर्व कल्पना/जीवभाव येथे विरुन जातो. चिदाकाशातील या सोऽहंस्थितीला ऋषीमुनी व संत 'हंस' म्हणून संबोधतात, असे श्रीदासराममहाराजांनी म्हटले आहे.

श्वसनातील प्राणापान गतीचे मूळ, सहस्रदळीच्या, सोऽहंहंसाच्या गतीमध्ये आहे. ही चैतन्यरूप सोऽहंहंस गती प्राणगतीरूपाने भ्रूमध्यात येते. या प्राणशक्तीमुळे श्वसनाचा दांडा हलतो आणि दृश्यमान झालेल्या श्वासोच्छ्वासाच्या योगे जीव आपल्या आयुष्याची वाटचाल करतो.

सद्गुरूकृपेने, सोऽहंध्यानाची साधना प्राप्त होते. सोऽहंध्यानाने सोऽहंभाव जागृत होतो. सोऽहंदीप/सोऽहंज्योतीचे





दर्शन होते व अखेरीस सोऽहंब्रह्माचा अनुभव येतो. यामध्ये सारा परमार्थ सामावलेला आहे, असे सारांशाने म्हणता येईल.

या सोऽहंस्वरूपाविषयी, श्रीमामामहाराजांनी अमृतवाणी अभंग क्रमांक ८६२ मध्ये म्हटले आहे,

**'हंस ओळखता राम दिसो येई । देहामध्ये पाही शोधोनिया ।।१।।**
**गती ओळखता हंस कळो येई । अघटित नवलाई पाखराची।।२।।**
**गतीमाजी जाता 'मी'पण नुरवी । नामचि उरवी दास म्हणे।।३।।'**

**अर्थ -** यामध्ये साधनेची प्रक्रिया सांगितली आहे. सुषुम्नेतील प्राणगतीच्या नामाभ्यासाने 'मी'पणा संपतो व हंसस्थिती/आत्मस्थितीचा लाभ होतो व अखेरीस, निश्चळ ब्रह्मरूप नामाचे दर्शन या देहामध्ये होते, असे श्रीमामामहाराज सांगतात.

**विवरण -** रेवणसिद्ध हे निंबरगीसंप्रदायाचे मूळ पुरूष. रेवणसिद्ध-मरूळसिद्ध-काडसिद्ध व श्रीनिंबरगीकरमहाराज (गुरूलिंगजंगम महाराज) अशी ही गुरूपरंपरा आहे. आपल्या आत्मस्वरूपाचा साक्षात्कार करुन घेऊन, हा सुखरूप/आनंदरूप होऊन जाणे हे या संप्रदायाचे उद्दिष्ट आहे. हा संप्रदाय काही काळ लोपल्यासारखा झाला होता. या स्वरूपमार्गाला उजाळा देण्यासाठी, निंबरगीकरमहाराजांचा अवतार झाला. त्यांचे पट्टशिष्य म्हणजे श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज होत. श्रीनिंबरगीकरमहाराजांच्या

निर्याणानंतर ही पारमार्थिक परंपरा त्यांच्या कृपांकित थोर शिष्यांनी पुढे चालू ठेवली आहे. महायोगिनी श्रीलक्ष्मीबाईअक्का, श्रीभाऊसाहेबमहाराज उमदीकर, श्रीरामचंद्रमहाराज यरगट्टीकर म्हणजेच चिमडचे महाराज, श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस, श्रीमामामहाराज केळकर असे अनेक थोर विभूती या संप्रदायात होऊन गेले.

'सोऽहंस्वरूपाचे गूढ उकलून त्याचा अनुभव घेण्यासाठी सोऽहंसाधनमार्ग सांगणाऱ्या सद्गुरूंचे चरणी, हा दासराम लोळण घेत आहे,' असे श्रीदासराममहाराज म्हणतात.

***





## २३

**नामात सद्गुरू डोल रे खेळिया नामात कीर्तन प्रगटे ।**
**नामात घनदाट ब्रह्म निघोट सकळाहून मोठे ।।१।।**
**नामाविण ते जीवन जीवाचे सकळ कांही खोटे ।**
**सतरावी जो प्रविष्ट होई भासचि सर्व आटे ।।२।।**
**माया जीवा लाघव दावी नानापरी मोठे ।**
**त्यातचि गुंतवुनी घाली बा जन्ममरण खेटे ।।३।।**
**नामाविरहित दास तळमळी त्यातचि राहे नेटे ।**
**बाजुसी सारुनी काटे चाले सद्गुरूच्या वाटे ।।४।।**

**अर्थ -** सर्व श्रेष्ठ अशा चैतन्यापासून घनदाट, व्यापक ब्रह्म प्रगट होते. तेच नाम कीर्तनरूपाने बाहेरही प्रगट होते. अशा या कीर्तनामध्ये, नामरूप असलेल्या सद्गुरूंना डोल येतो. सामान्य जीवाला मायेचे लाघव, नानाप्रकाराने प्रगट होऊन खेळवित राहते. त्याला भोवतालचे भासमय जग खरे वाटते. या संसारभवात स्वतःला गुंतवून जीव जन्ममरणाच्या फेऱ्यात अडकून राहतो. या सगळ्याचा परिणाम म्हणून तो नामविन्मुख होतो. परंतु सद्गुरू कृपेने 'ते' चैतन्यनाम हाती येताच, सतरावी जीवनकळा प्रदीप्त होते व त्या आत्मप्रकाशात मिथ्या जगाचा भास नाहिसा होतो. परंतु हे सर्व

होण्यासाठी, परमार्थमार्गावरील सर्व विघ्ने, निश्चयाने दूर करून भक्तीभावाने सद्‌गुरूंना शरण गेले असता, सद्‌गुरू परमार्थाची वाटचाल सोपी करतात.

**विवरण -** सद्‌गुरूंनी दिलेल्या चैतन्यनामाने मायाजाळ नाहिसे होऊन, परमार्थाचा मार्ग कसा सुलभ होतो, याचे वर्णन या अभंगात आलेले आहे. सत्‌घन ब्रह्म हे सर्वांपेक्षा मोठे असून, घनदाटपणे सर्वत्र व्याप्त आहे. साधनकाळी हे ब्रह्म गगनाहून वाड असलेल्या चैतन्यनामातून प्रगट होते. म्हणून हे नाम सर्वश्रेष्ठ आहे. '**तरीं कीर्तनाचेनि नटनाचे ।** ' श्रीज्ञानदेवांच्या या उक्तीप्रमाणे कीर्तन म्हणजे त्या नटनाम परमात्म्याचा खेळ आहे. नाम हे ब्रह्मरूप आहे. त्यामुळे परमात्म्याच्या नामाचा देहामध्ये होणारा नाच म्हणजे कीर्तन आहे. नामातूनच कीर्तन प्रगटते. नाम आत मावत नाही, म्हणून जे आपोआपच बाहेर पडते, त्याला नामसंकीर्तन म्हणतात. नामरूप सद्‌गुरू कीर्तनात डोलतात, नाचतात, तेव्हा त्या कीर्तनामध्ये संतमहात्मे तसेच प्रत्यक्ष ईश्वर प्रगट होतो असा अनुभव आहे. '**एकोऽहं बहुस्याम्**' या कल्पनेतून जीवाची निर्मिती आहे. '**कल्पना अविद्या तेणे झाला जीव ।**' विषयाकार कल्पना/जाणीव म्हणजे अविद्या. म्हणून अविद्यात्मक माया म्हणजे जीव. हे मायाजाल मोठे विलक्षण आहे. 'मा' म्हणजे काही नाही व 'या' म्हणजे जाणे. जीवभावावरील मायेच्या जीवनात काही अर्थ नाही. मनुष्य जीवनात क्षणभर सुखी होतो, पण ते तेवढ्यापुरतेच असते. असे क्षणाक्षणाचे/





तुकड्या तुकड्याच्या शोधात मनुष्य सगळे आयुष्य घालवतो. हे सुखही '**जन हे सुखाचे दिल्या घेतल्याचे । बा अंतकाळीचे नाही कोणी ।।**' या स्वरूपाचे असते. थोडक्यात हे सुख क्षणभंगूर व अनित्य स्वरूपाचे आहे.

हे शरीर 'माझे' व या शरीराला चिकटलेलेही 'माझे' असे हे माझे माझेपणाचे जाळे गुंफले जाऊन, त्यात हा जीव अडकून पडतो. वासना पूर्तीसाठी जीव बरे-वाईट कर्मे करतो व त्यामुळे पाप-पुण्याचा गुंता तयार होतो. या जन्मातील वासना पूर्ण करण्यासाठी पुनः जन्म घेतो. अशा जन्म मरणाच्या फेऱ्यात माया जीवाला अलगद अडकवते.

असे हे मायाजाळ नामाने नाहिसे होते. '**मायाजाळ नासे या नामे करोनी ।**'(श्रीतुकाराममहाराज). येथे विशिष्ट अशा देवाचे नाम न घेता केवळ 'या नामे' असे म्हटले आहे. अनेक देवांची अनेक नावे असली तरी, ही सर्व चैतन्यामुळे शब्दयुक्त नामाच्या पातळीवर येऊ शकतात. सर्वत्र समत्वाने व्यापून राहिलेल्या चैतन्याचा ध्वनी हे खरे 'स्वयंसिद्ध नाम' आहे. या ध्वनीयुक्त नामातून इतर नामे उत्पन्न होतात. साधनेमध्ये सुषुम्नाकार प्राणगतीतून चैतन्याच्या नामाला सुरवात होते व त्याचा प्रकर्ष सहस्रदळात होतो. तेथे सतरावी जीवनकळा म्हणजे सोऽहंज्योती/सोऽहंदीप होतो व त्यामुळे जगताचा मिथ्याभास नाहिसा होतो.

हे सर्व होण्यासाठी आडमार्गी पाऊल न ठेवणे आवश्यक

आहे. परमार्थ सोडून अन्य सर्व मार्ग हे आडमार्गाचे आहेत. संत-सद्गुरू हे शिष्याला आडमार्गापासून दूर ठेवून परमार्थप्रवण करतात. अशातऱ्हेने अत्यंत श्रद्धेने, तळमळीने, स्वरुपमार्गावरील सर्व अडथळे बाजूस सारून सद्गुरूला शरण गेले असता, जीवाचे खरे कल्याण होणार आहे, असे श्रीदासराममहाराज सांगतात.





## २४

**हनुमंत कीर्तनी प्रगट होय आत्मबोध ।**

**प्रगटले जेथे श्रीसद्गुरू रेवणसिद्ध ।।१।।**

**प्रकाश पडला तेज दाटोनी गेले ।**

**हास्यमुख केले श्रीसद्गुरूराजांनी ।।२।।**

**कीर्तनाचा महिमा अहो न वर्णावे कोणा ।**

**महासुख लाधे या तो संतांच्या खुणा ।।३।।**

**देहभाव विसरे दुःख पळाले वाटे ।**

**मावळला क्रोध प्रेमाश्रुंनी कंठ दाटे ।।४।।**

**राम म्हणे धन्य धन्य धन्य हनुमंत ।**

**रामरूप झाले केली काळावरी मात ।।५।।**

**अर्थ -** आपले सद्गुरू श्रीहनुमंतराय कोटणीसमहाराज यांचे कीर्तनामध्ये मुखातून बाहेर पडणाऱ्या शब्दाशब्दातून, आत्मबोधाचा प्रत्यय येत असे. त्यामुळे त्यांचे कीर्तनात तेजोप्रकाशयुक्त, सुहास्यवदन अशा, संप्रदायाचे मूळपुरूष असलेल्या रेवणसिद्धांचे दर्शन होते. सद्गुरूंच्या कीर्तनाचा महिमा अगाध असे. त्यांच्या कीर्तनश्रवणाने, देहबुद्धिचा विसर पडत असे. त्यामुळे काम-क्रोधादि विकार व त्यामुळे प्राप्त होणाऱ्या दुःखाची जाणीव होत नसे. त्यांच्या

कीर्तनामध्ये, सुखरूप परमात्म्याच्या अनुभवाने कंठ दाटून, नयनातून प्रेमाश्रु ओघळत असत. त्यांच्या या दिव्य कीर्तनाचा अनुभव अनेक जाणकारांनी घेतलेला आहे. दासराममहाराज म्हणतात, ज्यांनी काळावर मात केली व जे रामरूप/सद्‌गुरूरूप झाले असे आपले सद्‌गुरू धन्य आहेत.

**विवरण -** आपले सद्‌गुरू श्रीहनुमंतराय कोटणीसमहाराज यांच्या कीर्तनाचा महिमा सांगणारा हा अभंग दासराममहाराजांनी लिहिलेला आहे. '**आपुलिया सुखस्वार्था । केलेंचि करावी हरिकथा । हरिकथेविण सर्वथा । राहोंचि नये ।।**' या समर्थांच्या उक्तीनुसार, श्रीतात्यासाहेबमहाराजांनी सांगली येथे राहून, अखंड पंचवीस वर्षे नित्य कीर्तन केले. श्रीरामचंद्रमहाराज यरगट्टीकर म्हणजेच चिमडचे महाराज हे कोटणीसमहाराजांचे सद्‌गुरू होत. आपल्या सत्‌शिष्याची कीर्तननिष्ठा पाहून, चिमडचे महाराजांनी इ.स.१८९० साली, 'तुझी कीर्तने उत्तरोत्तर रसभरीत होत जातील आणि ती ऐकावयास, राजेलोकही येतील' असा आशीर्वाद श्रीतात्यासाहेबमहाराजांना दिलेला होता. सद्‌गुरूंचा अमोघ असा आशीर्वाद फळास आला तात्यासाहेबमहाराज हे आत्मानुभवी साधुपुरुष व पराकाष्ठेचे गुरूभक्त होते. त्यांच्या कीर्तनाची उंची ही केवळ वक्तृत्त्व, पाठांतर, गायन, वादन अशा उपांगावर अवलंबून नव्हती. त्यांच्या कीर्तनात आत्मानुभवाचा जिव्हाळा होता. कीर्तनात त्यांच्या मुखाने जो पारमार्थिक विषय प्रतिपादिला जात असे, त्याला आत्मानुभवाची





पार्श्वभूमी असल्याने, श्रोत्यांच्या मनावर त्याचा खोलवर ठसा उमटत असे. कीर्तन करताना ते देहभानावर नसत. त्यांच्या अंतर्यामी उसळणारा आत्मानंद त्यांच्या तेजोमुखावर विलसत असे. या सर्वांचा परिणाम म्हणून श्रोतेही तो कीर्तनानंद मनमुरादपणे लुटत असत.

कोटणीसमहाराजांच्या कीर्तनात सच्चिदानंद ब्रह्मस्वरूपाचा आविष्कार होत असे. संप्रदायाचे मूळपुरूष रेवणसिद्धाच्या रूपाने सत्‌ब्रह्माचेच प्रकटीकरण होत असे. सत्‌च्या ठिकाणी चिद् असतेच. म्हणून चिद्‌प्रकाशाच्या तेजाने न्हाऊन निघालेली, सर्वांना आशीर्वाद देणाऱ्या रेवणसिद्धांच्याकडे पाहून, कोटणीसमहाराजांच्या मुखावर ब्रह्मानंद विलसत असे.

त्यांच्या कीर्तनात साधकांना साक्षात्काराचे अनुभव येत असत. त्यांच्या कीर्तनाशी एकरूप झालेल्या साधकांचेही देहभान हरपत असे. जेथे देहभान नाही, तेथे कामक्रोधादि विकार तर कोठे असणार? केवळ महासुखाचा अनुभव येत राहिल्याने, दुःखाचा लवलेशही रहात नसे. भक्तीभावाने कंठ दाटून येऊन, नेत्रातून प्रेमाश्रू ओघळत असत. असा आपला अनुभव व्यक्त करणारी अनेक उदाहरणे आहेत..

श्रीकोटणीसमहाराज २४ जानेवारी १९२४ रोजी ब्रह्मी लीन झाले. तो अमृतसिद्धी योग होता. श्रीमामामहाराजांनी ''**श्रीहनुमद्‌गुरूचरित्र-बोध-सार**'' या ग्रंथात वर्णन केल्याप्रमाणे, ते मारुतीरायांचे अवतार होते. मारुतीप्रमाणे त्यांनी काळाला जिंकले होते. रामायणातील श्रीराम अवतारात, हनुमान हेच एकनिष्ठ रामभक्त

होते. त्याचप्रमाणे कलीयुगात कोटणीसमहाराजांनी आपल्या रामचंद्रसद्‌गुरूंची सेवा कीर्तनाच्या माध्यमातून केली. अशाप्रकारे 'रामकार्य' करून अखेर ते सद्‌गुरूरूप/ रामरूपच होऊन राहिले.

अखंड सद्‌गुरूस्मरणाने त्यांनी काळावरही मात केली व अखेर ते सद्‌गुरूरूप/रामरूप होऊन राहिले असे सद्‌गुरू त्रिवार धन्य आहेत असे, श्रीदासराममहाराज म्हणतात.

✻✻✻





## २५

**हनुमंतचरित्राचा दाता श्रीसद्‌गुरू ।**
**माझा नमस्कारु त्यांचे पायी।।१।।**
**क्षीराब्धीचे जैसे घेऊनी जीवन ।**
**नैवेद्य अर्पण त्याचे त्यासी ।।२।।**
**तैशापरी हा ग्रंथ श्रीगुरूसी ।**
**अर्पिला प्रेमेसी दासरामे ।।३।।**
**काय उतराई व्हावे सद्‌गुरूला ।**
**हनुमंत रायाला शरण शरण ।।४।।**

**अर्थ -** दासराममहाराज म्हणतात की, 'आपले पितृदेव श्रीमामामहाराजांनी लिहिलेल्या 'श्रीहनुमद्‌गुरूचरित्रबोधसार' या चरित्रग्रंथाचे दाते स्वतः सद्‌गुरू कोटणीसमहाराजच आहेत. मी त्यांच्या पायी नमस्कार करीत आहे. दुधाच्या सागरातून, दुधयुक्त जल घेऊन, त्याच क्षीरसागराला नैवेद्य म्हणून अर्पण करावे, तसा हा ग्रंथ अत्यंत प्रेमाने, मी सद्‌गुरूंना अर्पण करीत आहे. अशा या मोक्षदाते सद्‌गुरूंचा मी कशाप्रकारे उतराई होऊ हे कळत नाही, म्हणून मी त्यांचे चरणी शरणागत होऊन राहिलो आहे.'

**विवरण -** आपले पितृदेव, मामामहाराजांनी लिहिलेल्या

कोटणीसमहाराजांच्या चरित्राच्या समर्पण सोहळ्यानिमित्त, श्रीदासराममहाराजांनी हा अभंग लिहिलेला आहे. सन १९३६, शके १८५८ पौष शु.४, मकर संक्रमणाचे दिवशी, आपले सद्‌गुरू श्रीतात्यासाहेबांचे साधनमार्गाला धरून ओवीबद्ध चरित्र लिहावे असा विचार श्रीमामामहाराजांचे मनात आला. सद्‌गुरू कोटणीसमहाराजांचे चरित्र, मामांनी लिहावे अशी त्यांच्या वडिलांनी (कै.अनंत गंगाधर केळकर) इच्छा व्यक्त केली होती. पुढे त्यांना सद्‌गुरू श्रीतात्यासाहेबमहाराजांनी, 'तू सातशे ओव्यांचे चरित्र लिही' असा दृष्टांत दिला. महाराजांच्या दृष्टांताप्रमाणे, रोज एक अध्याय याप्रमाणे तेरा दिवसात तेरा अध्यायाचे ओवीबद्ध चरित्र श्रीमामामहाराजांनी लिहिले. श्रीगणेश चतुर्थीच्या दिवशी, श्रीसद्‌गुरू दादासाहेब कोटणीसमहाराज यांचे हस्ते हा ग्रंथ समर्पण सोहळा पार पडला. आपल्या पितृदेवांनी लिहिलेल्या या ग्रंथाच्या समर्पणाच्या निमित्ताने, श्रीदासराममहाराजांनी हा अभंग लिहिलेला आहे. मामामहाराजांनी आपल्या सद्‌गुरूंच्या चरित्राच्या निमित्ताने, आपल्या पारमार्थिक जीवनाची जणू रूपरेषाच मांडलेली आहे. या ओव्यांमधून साधनमार्गाचे गूज सांगितलेले आहे. आपल्या सद्‌गुरूंचा महिमा वर्णन करून, कोटणीसमहाराजांची साक्षात् मूर्ती उभी केली आहे.

चरित्रलेखन करताना, मामामहाराज वारंवार आपल्या सद्‌गुरूंना प्रार्थना करतात की, 'महाराज, आपले चरित्र आपणच माझ्याकडून वदवून घ्यावे. मजला तुम्हीच स्फूर्ती देऊन आपले





चरित्र बोलवले आहे. आपल्या कृपादृष्टिने काय होणार नाही? आपला महिमा कोणास कळणे शक्य नाही. हे दयाळा, माझ्या वाचेने आपल्या चरित्र कथेचा विस्तार व्हावा यासाठी, आपणास शरण जाऊन, आपल्याला मी नमन करीत आहे.'

या ग्रंथाचाच ७वा अध्याय हा साधनमार्ग वर्णनाचा आहे. ''**म्हणोनी अंतरीचे साधन । सद्‌गुरूकृपेवीण न कळे खूण । जे साधलिया भगवान । आपण स्वये भेटवले ।।९।।**'' सद्‌गुरूकृपेने अंतरीचे साधन कळून येते व भगवंत आपण होऊन भेट देतात. याच अध्यायात शेवटी, ''**अनुभवे अनुभवा अनुभविले । अनुभवे अनुभवी राहिले । ये रिती साधन पूर्ण केले । पूर्णत्वेसी परिपूर्ण ।।५९।।**'' या शब्दामध्ये, साधनेच्या पूर्णत्वाचा अनुभव सांगितला आहे. अकराव्या अध्यायात, सिद्धावस्थेत होणाऱ्या साक्षात्काराचे वर्णन आलेले आहे. तेराव्या कळस अध्यायाच्या शेवटच्या ओवीत मामामहाराज म्हणतात, ''**ऐसा कळस अध्याय । संपवोनि नमिले सद्‌गुरू पाय । त्यांचे चरित्र गंगातोय । त्यांचेच चरणी समर्पितो ।।२२।।**''

असा हा श्रीमामामहाराजांनी लिहिलेला ग्रंथ, श्रीदासराममहाराज आपले सद्‌गुरू श्रीहनुमंतराय कोटणीसमहाराजांना अर्पण करीत आहेत. दुधसागरामधील दुधाचाच नैवेद्य दुधसागराला अर्पण करावा, त्याप्रमाणे सद्‌गुरूभक्तीचा ठेवा असलेला त्यांचाच ग्रंथ, त्यांनाच अर्पण करीत आहेत. अखेरीस श्रीदासराममहाराज

म्हणतात की, ‘हे सद्‌गुरूराया, आपल्या कृपाप्रसादामुळेच प्रेमाने व अत्यंत आनंदाने हा ग्रंथ मी आपणास अर्पण करीत आहे. असे हे भाग्य मला मिळाले असून आपले उपकार फेडणे शक्य नाही. म्हणून हे दयाळा, मी आपल्या चरणाशी अनन्य भावाने शरण आलो आहे.’

***



## श्रीगुरूपाठ

## २६

**आता एक मज जहाले श्रीगुरू ।**
**त्यानी चराचरू व्यापियेले।।१।।**
**जेथे जेथे भाव तेथे तेथे देव ।**
**ऐसा नवलाव कैचा झाला ।।२।।**
**हृदयी पाऊले दिसती गोजिरी ।**
**कवतूक भारी गुरूंनी केले ।।३।।**
**दासरामा एक दैवत श्रीगुरू ।**
**तेणे सर्वेश्वरू धाविन्नला ।।४।।**

**अर्थ -** माझे सद्‌गुरू हे माझे ‘उपास्य दैवत’ आहेत, तसेच ते ‘आराध्य दैवत’ही आहेत. भक्तीभावाने त्यांचा धावा केल्याने ते मजवर प्रसन्न झाले. विश्वात्मक सर्वेश्वररुपाने, माझे गुरू हे चराचर व्यापून आहेत. सृष्टीमध्ये जे जे अस्तित्वात आहे तेथे, सद्‌गुरूंच्या असण्याचा अनुभव येतो आहे. हा अनुभव खरोखरीच आश्चर्यकारक आहे. विश्वात भरून राहिलेले सद्‌गुरू देहामध्येही ‘सोऽहं’भावाने स्थित आहेत. शिरोहृदयात आपल्या गोजिऱ्या पाऊलांचे दर्शन घडवून, श्रीगुरूंनी माझे गोड कौतूक केले आहे, असे श्रीदासराममहाराज म्हणतात.

**विवरण -** चिमड संप्रदाय हा गुरूसंप्रदाय आहे. गुरुशिवाय परमार्थ साध्य होणार नाही. येथे परमार्थाच्या प्रत्येक टप्प्यावर गुरूंचे अस्तित्व अनिवार्य आहे. साधन काळापासून ब्रह्मस्वरूपाच्या अंतिम साध्यापर्यंत, सद्गुरू शिष्याच्या अखंडपणाने सोबतीला असतात. त्याच प्रवासाचा आलेख श्रीदासराममहाराजांनी येथे उलगडून दाखविला आहे.

भक्ती करण्यासाठी, उपासना करण्यासाठी भक्ताला, साधकाला, 'उपास्य दैवत' लागते. येथे विशेष गोष्ट म्हणजे, भक्तीची, उपासनेची सोय व्हावी म्हणून, दासराममहाराजांचेसाठी सद्गुरूच उपास्य दैवत होऊन राहिले आहेत. वैदिक काळामध्ये, इंद्र, वरूण, अग्नि अशा अनेक देवतांची ईश्वर समजून उपासना केली जात असे. देहाच्या माध्यमाने ही उपासना केली जात असल्याने, इंद्रियपरत्वे देवतांची नांवे असत. इंद्रियपरत्वे अधिष्ठान पावलेल्या देवतांचे उदाहरण म्हणजे, मुखाची देवता - अग्नि, त्वचेची देवता - वायू इत्यादि. सर्व देवता सामर्थ्याच्या आधाराने राहतात व उपासनेप्रमाणे जीवाला फळे मिळतात. येथे वर्णन केलेल्या देवताचे स्वरूप सर्वस्वी भिन्न आहे. इथे प्रत्यक्ष सद्गुरूच, दासराममहाराजांचे करिता दैवत होऊन राहिले आहेत. निर्गुण निराकार ब्रह्मच, सद्गुरूंच्यारूपाने सगुण-साकार झाले आहे. श्रीदासराममहाराज म्हणतात, 'माझे दैवत' असलेल्या सद्गुरूंचा मी अंतःकरणपूर्वक धावा केला. (धाविन्नलो)





याचा अर्थ - मदतीला धावून येणे असा आहे. असा अंतःकरणपूर्वक धावा करताच, सद्गुरु 'दैवत' स्वरूप त्यागून, सर्वेश्वर/जगदीश्वर होऊन, मजसाठी धावून आले आणि त्यांनी मजवर कृपा केली. आता मी सद्गुरूंचा व सद्गुरू माझे होऊन राहिले. आम्ही एकरूपच होऊन राहिलो आहोत.

कृपावंत सद्गुरू व्यापक विश्वात्मा होऊन चराचरामध्ये व्यापून आहेत. विश्वामध्ये ब्रह्मरूपाने सद्गुरूच भरून राहिले आहेत. तो हरि/गुरू सर्वत्र घनदाटपणे भरून उरला आहे, असा भाव जाणवतो आहे. भाव म्हणजे श्रद्धा, हा एक अर्थ आहे. त्याचप्रमाणे भाव म्हणजे अस्तित्वभाव - ब्रह्मस्वरूपाचा निःखळ असण्याचा भाव. 'भाव तेथे देव' याचा अर्थ, नामरूपात्मक विश्वाच्या आतबाहेर सत्रूपाने म्हणजे निखळ अस्तित्वभावाने ते ब्रह्म सर्वांना व्यापून उरल्याचा अनुभव येणे होय. असा अनुभव येणे ही विशेष नवलाईची गोष्ट असल्याचे श्रीदासराममहाराज सांगतात.

विश्वात देवरूपाने भरून राहिलेले सद्गुरू, मानवी देहातही तत्त्वरूपाने भरून राहिले आहेत. विश्वात्म सद्गुरू देहामध्ये, 'सोऽहंआत्मरूपाने' प्रचितीस येतात. बुद्धिही विषयांचा निश्चय सोडून सोऽहंभावाचा निश्चय करते, तेंव्हा सोऽहंभाव दृढ होतो. असे झाले असता, 'सः अहम् - अहम् सः' या आत्मस्फुरणाचा अनुभव येतो. हेच सद्गुरूंच्या 'गोमट्या' पाऊलांचे दर्शन होय. '**सोऽहंभावे**

**मुकुंदरायी। भरला निजगुरू सर्वांठायी ।।**' (संत श्रीमुकुंदराय).

या गुरूपाऊलाशी मन जडून राहिले असता, सर्वाठायी तोच 'सोऽहं निजगुरू' भरून राहिला असल्याचा आश्चर्यजनक अनुभव सद्गुरूंनी लडिवाळपणे मजला दिलेला आहे, असे श्रीदासराममहाराज सांगतात.

***





## २७

**ब्रह्ममूर्ती संत सद्गुरू अनंत ।**
**रक्षिताती भक्त साधकाते ।।१।।**
**आम्हा बालकासी तारावयासाठी ।**
**किती श्रम घेती कोटी परी।।२।।**
**गुरूपुत्रा सतत हरिचे कीर्तन ।**
**अधिकार पूर्ण हरिभक्ती ।।३।।**
**दासरामा उत्तम श्रीगुरूचा पाठ ।**
**तेणेची अवीट ब्रह्म जोडे ।।४।।**

**अर्थ -** ब्रह्म हे अनादि-अनंत आहे. सद्गुरु हे देखील अनादि-अनंत अशा ब्रह्माची मूर्ती असतात. हे सद्गुरु, आम्हा अज्ञ बालकाच्या कल्याणासाठी अत्यंत श्रम घेतात. आपल्या भक्त साधकाचे सर्व प्रकारच्या विघ्नापासून रक्षण करतात. साधन तपाने त्या शिष्याला गुरूपुत्राची योग्यता प्राप्त होते. हा गुरुपुत्र नामसंकीर्तनामध्ये स्वतःला विसरतो. तेव्हाच त्याला खऱ्या हरिभक्तीचा अधिकार प्राप्त होतो. गुरुपाठाच्या चिंतनाने त्याची हरिभक्ती पूर्णत्वास जाऊन, त्याला अवीट ब्रह्मरसाची प्राप्ती होते, असे श्रीदासराममहाराज सांगतात.

**विवरण -** या अभंगामध्ये हरिभक्तीचे स्वरूप सांगितले आहे. आपल्या शिष्याची हरिभक्ती सिद्ध होण्यासाठी, ब्रह्मस्वरूप सद्‌गुरू त्याला कशाप्रकाराने मार्गदर्शन करतात याचे वर्णन या अभंगात आलेले आहे.

ब्रह्म हे अनादि-अनंत आहे. अनादि म्हणजे ज्याला सुरवात नाही व अनंत म्हणजे ज्याला शेवट नाही. ब्रह्म हे अशाप्रकाराने अखंडत्वाने, अनादि-अनंतरूपाने व्यापक आहे. अशा अखंड व्यापक वस्तुला आकार नसतो. म्हणून ब्रह्म हे निराकार आहे. राम-कृष्ण इत्यादि सगुण साकार ईश्वराच्या, धातूच्या, काष्ठाच्या मूर्ती तयार करून, त्याची उपासना केली जाते. पण निर्गुण-निराकार ब्रह्मवस्तुची मूर्ती कशी बनवणार? म्हणून केवळ ब्रह्मरूप सद्‌गुरुनाथांनाच 'ब्रह्ममूर्ती' म्हटले जाते. सर्व संत-सद्‌गुरू हे ब्रह्माचीच मूर्ती असतात. साधकाच्या उपासनेची सोय व्हावी म्हणून सद्‌गुरूच ब्रह्ममूर्ती होऊन भूतलावर अवतीर्ण होतात.

लहान बालकाची त्याचे माता-पिता काळजी घेतात. कारण ते लहान बालक, स्वतःची काळजी घेण्यास सक्षम नसते. त्यामुळेच माता-पिता त्याचा प्राणपणाने सांभाळ करतात. आपण वयाने मोठे झालो असलो तरी, अध्यात्मिक दृष्टिकोनातून आपण अज्ञ बालकच असतो. अशा अज्ञानातून आपण आपल्या बुद्धिने परमार्थ करू पहातो, पण अखेर सद्‌गुरुशिवाय परमार्थ होणे शक्य नाही याची खात्री पटते. अशावेळी मनोभावे सद्‌गुरूना शरण गेले असता, दयाळूपणाने





त्याचा स्वीकार करतात व आपला कृपाहस्त त्याच्या मस्तकी ठेवतात. त्यानंतर त्या शिष्याची सर्व जबाबदारी घेऊन, त्याच्या अंतिम कल्याणासाठी श्रमतात. साधनकाळात शिष्यावरती येणाऱ्या संकटांचा नाश करून त्याचे रक्षण करतात. त्याच्या इच्छा-अपेक्षा नाहिशा करून त्याला निःष्काम करतात. त्याची पापे नाहिशी करतात व अखेर प्रपंच व परमार्थ या दोन्हीमधील प्रबळ 'अहंकाररूपी' शत्रूला नाहिसे करून, त्याचा प्रपंच व परमार्थ हे दोन्हीही सिद्धिस नेतात.

अध्यात्मिक मार्गामध्ये गुरू-शिष्य संबंधाला विशेष महत्व आहे. केवळ सत्‌शिष्यच गुरूपुत्र होऊ शकतो. येथे रक्ताचे नाते नसले तरी आत्मसंबंध असतो. तो गुरुंच्या मनातील ओळखून वागतो. काया वाचा मनाने त्यांची सेवा करतो, गुरुवचन त्यास प्रमाण असते. अशाप्रकारे अनन्यभावे शरण गेलेला, निष्ठावंत गुरुभक्त शिष्यच केवळ खरा 'गुरूपुत्र' होय. पुत्राला आत्मज म्हणतात. सद्‌गुरू आपल्या कृपेने शिष्याचे अंतरी, आत्मभाव जन्माला घालतात. सद्‌गुरू ज्या शिष्याच्या अंतरी आत्मसूर्याची जागृती करतात, तो शिष्यच गुरुपुत्र होय.

हा गुरुपुत्र नामसंकीर्तन या सगुणभक्तीच्या साधनेद्वारा, हरिविषयी/गुरुविषयी आपला प्रेमभाव व्यक्त करीत असतो. या हरिकीर्तनाच्याद्वारा परमात्मप्राप्तीचे ध्येय अनायासे साध्य होणार आहे, ही श्रद्धा याचा मूलाधार आहे. ही कीर्तनभक्ती आत्मनिवेदनरूपी निर्गुणभक्तीकडे जाण्याची एक पायरीच म्हणावी लागेल. आत्मनिवेदन

ही हरिभक्तीची पराकाष्ठा होय. अशा तऱ्हेने गुरुपुत्राची हरिभक्ती/ पराभक्ती सिद्धिस जाते.

अशातऱ्हेने गुरुपाठाचे वर्म हाती आल्याने, हरिभक्तीच्या योगे ब्रह्मस्वरूपाची प्राप्ती होते. ब्रह्म / हरि हे मूलतत्त्व रसात्मक आहे. हरिविषयीचा प्रेमभाव उत्कट झाल्याने, उत्पन्न झालेल्या अवीट भक्तीरसाचा लाभ मजला झाला आहे, असे श्रीदासराममहाराज सांगतात.

***





## २८

**सद्‌गुरू दयाळ सद्‌गुरू दयाळ ।**
**देती सर्वकाळ आठवण ।।१।।**
**सद्‌गुरू कृपाळ सद्‌गुरू कृपाळ ।**
**सुबोध रसाळ करिती बोधू ।।२।।**
**सद्‌गुरू मवाळ सद्‌गुरू मवाळ ।**
**पाहता निर्मळ भक्त होय ।।३।।**
**सद्‌गुरू तेजाळ सद्‌गुरू तेजाळ ।**
**दासरामा विमल रूप तेची ।।४।।**

**अर्थ -** सद्‌गुरू हे अत्यंत दयाळू, करुणाकर आहेत. ते मला सर्वकाळी माझ्या साधन अभ्यासाची आठवण करून, मला जागृत ठेवतात. ते अत्यंत मायाळू असून, ते मला ब्रह्माभ्यासासाठी आवश्यक अशा सर्व विषयांचा अत्यंत रसाळ पद्धतीने सुबोध करतात. साक्षात्कारामध्ये सद्‌गुरूंचे तेजःपुंज परंतु अत्यंत सौम्य असे दर्शन, भक्ताचे मन दोषरहित करते. अशा विमलरुप सद्‌गुरूंचे रूप माझ्या हृदयी ठसले आहे, असे श्रीदासराममहाराज म्हणतात.

**विवरण -** या अभंगामध्ये श्रीदासराममहाराजांनी पहिल्या दोन कडव्यांमध्ये, सद्‌गुरू शिष्याला कसे मार्गदर्शन करतात हे सांगितले

असून, पुढील दोन कडव्यांमध्ये साधन केल्यानंतर, साक्षात्कारामध्ये होणाऱ्या सद्गुरूंच्या दर्शनाचा अनुभव सांगितला आहे.

सद्गुरू हे जीवनमुक्त महात्मे असतात, असा महात्मा ब्रह्मनिष्ठ असतो. त्याच्या अंगी भगवत्गीतेच्या सोळाव्या अध्यायात सांगितल्याप्रमाणे, 'दैवी संपत्तीची' लक्षणे प्रगट होतात. दया, करुणा, अभय, शांती, परहित वगैरे गुण व्यवहारकाळीही त्यांचे ठिकाणी असतात. प्रत्येक मनुष्याच्या अंतर्यामी ईश्वर वास करीत असतो. म्हणून अन्य माणसांचे विषयी त्याच्या मनामध्ये प्रेम, दया असते. 'दया' हे तर धर्माचे मूळ आहे. सर्वांच्याकडे आत्मवत् पाहण्यातून 'भूतदया' उत्पन्न होते. सर्वांवर करुणा दाखविणे, हा तर भक्तीचा मुख्य सिद्धांत आहे. खऱ्या दयेची परिणीती परोपकारात होते. सद्गुरूंचे जीवन परहितासाठीच असते. अगदी पतीत, दुराचारी माणसालाही ते जवळ करतात, तर आपल्या शिष्याला ते किती बरे जपत असतील? प्रपंचामध्ये काम-क्रोध इत्यादि शत्रुंमुळे, आत्म्याकडे दुर्लक्ष होते. त्याचे विस्मरण होते. तसेच जगातील सुख-दुःख, चांगले-वाईट, इत्यादि द्वंद्वात सापडून तसेच बाह्य विषयांच्या आसक्तीने, परमार्थाचे विस्मरण होते. अशा सर्व वेळी सद्गुरू हे शिष्याच्या विवेकबुद्धिला चालना देऊन त्याला साधनेचे स्मरण देतात. शिष्याच्या पारलौकिक हितासाठी त्यांची सदैव तळमळ असते.

असा शिष्य शरणागत भावाने साधनमार्गावर अग्रेसर झाला असता, सद्गुरू त्याच्यावर कृपादृष्टी टाकतात व त्याला मोक्षाचा





मार्ग दाखवतात. सद्गुरू ब्रह्मरस उत्पन्न करुन देणाऱ्या, सोऽहंभाव साधनेवरती त्याला आरुढ करतात. सद्गुरूंचे स्वरूप व्यापक असल्याने, मुंगीचेही मनोगत ते जाणू शकतात. त्यामुळे त्यांना आपल्या शिष्याच्या मनातील तळमळ कळते, त्यामुळेच ते त्याची सर्वभावे काळजी वाहतात. पारमार्थिक मार्गातील सूक्ष्म अशा सर्व शत्रूंपासून त्याचे रक्षण करतात. त्याला वैराग्यसंपन्न करून सोऽहंबोधावर स्थिर करतात. एकदा गुरुकृपा झाली असता तो शिष्य पुन्हा मागे वळू शकत नाही, कारण सद्गुरूकृपेची शक्ती त्याला आपल्याकडे खेचून घेत असते.

अशातऱ्हेने, सोऽहंसाधन करणाऱ्या शिष्याला चिदाकाशामध्ये सोऽहंगुरूचा साक्षात्कार होतो. तो सोऽहंआत्मा अंतःकरणात सोऽहंज्योती रुपाने प्रगट होतो. ज्योत ही उष्णता व प्रकाश यांचे प्रतीक आहे. रवि-शशीला दिपवून टाकणारे हे तेज असले तरी, साधकाला मात्र ते दाहक न वाटता शीतल व मवाळ भासते. ते तेज अत्यंत अत्यंत सौम्य, शांत व डोळयांना सुखावणारे असते. सद्गुरूंच्या या दर्शनाने मल व विक्षेप हे दोष दूर होऊन अंतःकरण शुद्ध व शांत होते. अशा अंतबार्ह्य तेजोमय, विमलरूप, सद्गुरूंच्या दर्शनाचा लाभ मजला झाला असल्याचे दासराममहाराज सांगतात.

***

## २९

**ब्रह्मपूर्ण संत ब्रह्माते दाविती ।**
**त्यांची चरण माती माझे भाळी।।१।।**
**अंगी ते विभूती चर्चिली सुंदर ।**
**भक्त धुरंधर श्रीरामाचे।।२।।**
**हृदयी धरली सद्गुरूंची मूर्ती ।**
**नाचतो हे गीती गात स्वये ।।३।।**
**दासराम लोळे संतांचे चरणी ।**
**अघटित करणी त्यांची असे ।।४।।**

**अर्थ -** ज्या ब्रह्मरूप संत सद्गुरूंनी मला ब्रह्मरूप दाखविले, त्यांचे चरणाची धूळ ती माझ्या भाळी धारण करतो. श्रीरामाचे अग्रणी भक्त असलेल्या माझ्या सद्गुरुंनी सर्वांगावर भस्म विलोपन केलेले आहे. अशी ही सुंदर सद्गुरुंची मूर्ती हृदयामध्ये स्थापून, त्यांचेच गीत मी गातो आहे. ब्रह्मबोधाची विलक्षण कृती करणाऱ्या संत सद्गुरुंच्या चरणी, हा दासराम लोळण घेतो आहे.

**विवरण -** या अभंगामध्ये श्रीदासराममहाराजांनी आपले सद्गुरू श्रीहनुमंतराय कोटणीसमहाराज यांचे महात्म्य वर्णिलेले आहे. ईशावास्य उपनिषदामध्ये मंत्र आहे, 'ॐ पूर्णमदः पूर्णमिदं





पूर्णात्पूर्णमुदच्यते । पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ।। ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः।।'. परब्रह्म सर्वप्रकाराने पूर्ण आहे. दृश्य जगत् त्या परब्रह्मापासून व्यक्त स्थितीत आले असले तरी, तेसुद्धा पूर्णच आहे. अशातऱ्हेने पूर्ण ब्रह्माच्या पूर्ण स्थितीला बाधा येत नाही. ते आहे तसेच पूर्ण राहते. या सिद्धांताने, विश्वातील जीवही पूर्णच आहे. परंतु जीवभाव धारण केल्याने, त्या जीवाची पूर्णता खंडित होते. सद्गुरू हे ब्रह्माप्रमाणे पूर्णरूपच असतात. त्यांनी जीवभावाचा त्याग करुन विश्वात्मकभाव धारण केलेला असतो. त्यांचे विश्वमन समग्रतेने, पूर्ण स्थिर व तृप्त असते. सामान्य माणसाचे मन हे विश्वमनाचा अंश असल्याने, ते सदैव अपूर्ण, अस्थिर व अतृप्त राहते. अशा अंशमनाला कितीही ज्ञान झाले तरी, त्या ज्ञानाला पूर्णता नाही. कितीही भोग भोगले तरी तृप्तता नाही. मन खंडित/अतृप्त असणे, हे वासनेचे व्यक्त रूप आहे.

माझे सद्गुरू श्रीहनुमंतराय कोटणीसमहाराज हे पूर्णब्रह्मरूपच आहेत. म्हणूनच ते वासनारहित, तसेच शांत व समाधानी आहेत.

भगवान शिवाचा रुद्रावतार आणि प्रभू रामरायांचे सर्वश्रेष्ठ अद्वितीय परमभक्त, हनुमंतराय प्रसिद्ध आहेत. आपल्या सद्गुरूंचे वर्णन करताना श्रीदासराममहाराज म्हणतात, ''माझे सद्गुरू श्रीहनुमंतराय कोटणीस महाराज, हे देखील असेच धुरंधर रामभक्त आहेत. त्यांनी सर्वांगावर वैराग्याचे भस्म विलेपन केलेले आहे.

सद्गुरूंची अत्यंत तेजस्वी मूर्ती अत्यंत विलोभनीय दिसते आहे. श्रीहनुमंतराय कोटणीसमहाराजांच्या सद्गुरूंचे नांवही 'राम' आहे. त्यांचे पूर्ण नाव, प.पू.श्रीरामचंद्रमहाराज यरगट्टीकर असे आहे.'' 'चिमडचे महाराज' या नावाने ते प्रसिद्ध आहेत.

श्रीदासराममहाराजांच्या वयाच्या चौदाव्या दिवशी, ब्रह्मीभूत कोटणीसमहाराजांनी त्यांना दृष्टीद्वारे अनुग्रह दिला. दासराममहाराज हे पूर्वजन्मी योगी ज्ञानी भक्त असल्याने, त्यांचे हृदयी ब्रह्मरूप सद्गुरूमूर्ती स्थिरावली.

ब्रह्मप्राप्तीचा मार्ग सांगून, सत्स्वरूप ब्रह्माचा साक्षात्कार घडवून आणणे ही एक अलौकिक घटना आहे. म्हणून असे हे अघटित घडवून आणणारे सद्गुरू म्हणूनच सर्वश्रेष्ठ आहेत. कृपाहस्त मस्तकी ठेवण्याची विलक्षण कृती केवळ सद्गुरूच करु शकतात. त्यांच्या चरणांची माती मी माझ्या मस्तकी धारण करीत आहे. आणि त्यांना आपल्या हृदयरुपी सिंहासनावर विराजमान करुन त्यांचेच स्तुतीस्तोत्र गात आहे, असे सांगून श्रीदासराममहाराज आपल्या सद्गुरूंची अखंड सेवा घडावी, अशी प्रार्थना करीत आहेत.

***





## ३०

**सद्गुरूघरीचे जरी आले श्वान ।**
**तयाते नमन असो आधी ।।१।।**
**सद्गुरूघरीचा आला जरी वारा ।**
**तयासी सामोरा नमस्कारू ।।२।।**
**सद्गुरूसेवक भेटलिया कोणी ।**
**जाईन लोटांगणी एकदाची ।।३।।**
**सद्गुरूंचेपाशी दासराम उभा ।**
**पहातसे शोभा चैतन्याची ।।४।।**

**अर्थ -** श्रीदासराममहाराज सांगतात की, सद्गुरूचे श्वान जरी दृष्टिस पडले तरी त्याला मी हात जोडून वंदन करतो. सद्गुरुघरचा वारा जरी समोरून आला, तरी त्याला वाकून नमस्कार करतो. एखाद्या सद्गुरूसेवकाची भेट झाली असता, प्रथम मी तत्परतेने त्याला लोटांगण घालतो आहे. आणि चिदाकाशामध्ये प्रत्यक्ष सद्गुरूंचे दर्शन झाल्यामुळे, चिदाकाशामध्ये तसेच बाह्यचराचर सृष्टीत चैतन्य दाटून आल्यामुळे, दिसणारी चैतन्यशोभा हा दासराम पाहतो आहे.

**विवरण -** या अभंगामध्ये, 'गुरूभक्ती' हा विषय आलेला असून येथे गुरूभक्तीच्या आविष्काराचे सोदाहरण वर्णन केलेले आहे.

गुरुभक्तीचे सविस्तर वर्णन ज्ञानेश्वरीच्या १३ व्या अध्यायात व एकनाथी भागवतामध्ये पहावयास मिळते. ''**म्हणौनि जाणतेनी गुरू भजिजे। तेणे कृतकार्य होईजे । जैसे मूळ सिंचने सहजे । शाखा पल्लव संतोषती।।**'' (ज्ञा.१/२५). याचा अर्थ गुरुभक्ती ही जाणून करण्याची गोष्ट आहे. जाणतेपणाने केलेली कृती लवकर फलद्रुप होते. गुरूभक्ती या पदातील भक्ती म्हणजे काय? ज्यांची भक्ती करावयाची त्याच्याशी विभक्त नसणे म्हणजे भक्ती. गुरूरूप होणे हे गुरूभक्तीचे अंतिम साध्य आहे. गुरू हे ब्रह्मरूप असतात, म्हणून ब्रह्मरूप होणे म्हणजे गुरूरूप होणे होय. गुरूभक्तीची कांही प्रमुख लक्षणे अशी आहेत :-

१. सद्गुरू सेवा २. गुरुवाक्य/गुरूआज्ञा प्रमाण ३. सद्गुरूविषयी अनन्य भाव ४. सद्गुरूमूर्तीचे ध्यान ५. गुरूकार्याकरिता प्राणार्पण. ह्या सर्वांमध्ये 'गुरूसेवा' मुख्य आहे. कारण त्यामध्ये अन्य सर्व भावांचा समावेश होतो. गुरूसेवेचे महात्म्य श्रीगुरूचरित्राच्या दुसऱ्या अध्यायात वर्णिलेले आहे. सद्गुरूसेवेत सर्व नवविधा भक्तींचा समावेश होतो अशी गुरूसेवेची महती आहे. परंतु गुरूसेवेचे मर्म समजल्याशिवाय ती फलद्रुप होत नाही. याकरिता 'गुरूसेवेविषयी' गाढ श्रद्धा उपयोगी पडणारी आहे.

श्रीदासराममहाराजांनी येथे सद्गुरूसेवेने, सद्गुरूंच्या अस्तित्वाचा अभ्यास कसा करावयाचा, याची तीन उदाहरणे दिलेली आहेत. प्रथम सद्गुरू घरच्या इमानाचे उदाहरण दिले आहे. सद्गुरू घरातील श्वान जरी पाहिले तरी त्याला वाकून वंदन/नमन असो.





सद्गुरूंच्या संबंधातील प्रत्येक गोष्ट प्रिय आहे. संतांच्या घरचे श्वान होऊन, तेथील उच्छिष्टाचा प्रेमाने स्वीकार करण्याची इच्छा असते. दुसरे उदाहरण सद्गुरू घराकडून आलेल्या वाऱ्याचे आहे. दासराममहाराज 'वायुलहरी' वरील प्रकरणामध्ये सांगतात की, हे सारे विश्व अनाहत नादाने व्याप्त आहे. केवळ पंचमहाभूतांच्या सान्निध्याने विश्वात अनेक प्रकारचे नाद ऐकू येतात. सद्गुरू घराकडून येणारे वारे भौतिक असले तरी, ते अनाहताचा संस्पर्श करून आलेले असते, कारण सद्गुरू हे अनाहतरूपाने असतात. त्यामुळे त्याला नमस्कार असो. तिसरे उदाहरण, सद्गुरूसेवकाचे आहे. सद्गुरूसेवक हा सद्गुरूंच्या सहवासामध्ये असल्याने त्याचे विशेष महत्व आहे. सद्गुरूसेवकाची भेट होणे, त्याचा सहवास मिळणे ही खरी सत्संगत आहे. म्हणून त्याला वाकून वंदन करतो. हा प्रेमभाव सद्गुरूभक्तीचे लक्षण आहे. **साधलीया गुरूसेवा । शिवपद प्राप्त जीवा ।।** (श्रीमामामहाराज केळकर). गुरूसेवा, गुरूभक्तीने चिदाकाशस्थित सद्गुरूंची भेट होते. '**साठविला हरि । जेणे हृदयमंदिरी ।।**' शिरोहृदयामध्ये सद्गुरूंचा साक्षात्कार होतो. चिदाकाशामध्ये ज्ञानदीप उजळला असता, अखिल विश्वाला प्रकाशणारे तेज प्रगट होते. चराचर सृष्टि चैतन्यमय गुरूरूपाने नटलेली दिसते असा अति शोभेचा विलक्षण अनुभव आल्याने सर्वत्र परमानंद प्रगटला आहे, असे दासराममहाराज सांगतात.

***

## ३१

**सद्‌गुरू सद्‌गुरू करिता गजरू । नाचे विश्वंभरू मागे पुढे ।।१।।**
**स्मरणाचे ध्यासे अंगे होय ब्रह्म । पावेल विश्राम सकळासी ।।२।।**
**भाव भक्ती देखे स्मरणाची गोडी । संतसंग आवडी भजनाची ।।३।।**
**त्रिकुटाचे माथा सद्‌गुरूंचे पाय । दासरामा सोय त्यांचे कृपे ।।४।।**

**अर्थ -** सद्‌गुरूकृपेचा महिमा एवढा आहे की, केवळ 'सद्‌गुरू-सद्‌गुरू' असा मनापासून शरणागत भावाने घोष केला असता, तो विश्वंभर प्रसन्न होऊन नाचू लागतो. त्याच सद्‌गुरूंचे निर्गुण स्वरूप, हे त्रिकूट माथ्यावरील चिदाकाशामध्ये 'अहम् सः सः अहम्' या सद्‌गुरूचरणरुपाने गोचर होते. साधक साधनेने चिदाकाशापर्यंत पोहोचला असता, तेथे त्याला सो सऽहं स्मरणाचा वेध लागतो. हे होण्यासाठी संतसंग व सद्‌गुरू भजन यांची नितांत आवश्यकता असते. हे झाले असता साहजिकच त्याला सोऽहंचरणाची, निजस्मरणाची गोडी लागते. अखेर सोऽहंस्मरणाच्या ध्यासाने तो स्वतः ब्रह्मरूप होतो व त्यामुळे त्याला शांतीची पैशांतीचा लाभ होतो, असे श्रीदासराममहाराज सांगतात.

**विवरण -** गुरुभक्तीने होणारी प्राप्ती, हा या अभंगाचा विषय आहे. अभंगाच्या पहिल्या भागामध्ये, सद्‌गुरूच्या सगुणस्वरूपाच्या उपासनेमुळे सगुण परमेश्वराची, विश्वंभराची प्राप्ती होते असे सांगून, अभंगाच्या उर्वरीत भागामध्ये सद्‌गुरूंच्या निर्गुण उपासनेने, परब्रह्माची





प्राप्ती कशी होते, हे सांगितले आहे.

तो विश्वंभर /परमेश्वर सर्व विश्वाला व्यापून उरला आहे. त्यामुळे या परमेश्वराच्या साक्षात्कारासाठी सगुण स्वरूपाचा दृष्टांत सांगितला आहे. देवाच्या सगुण मूर्तीच्या भक्तीने, देव प्रसन्न होऊन भक्ताला साक्षात् दर्शन देतो. जसा देव तसा गुरू, असे शास्त्रात सांगून ठेवले आहे. म्हणून सद्‌गुरूभक्तीनेही देवाचा साक्षात्कार होतो. समर्थ रामदासस्वामींनी दासबोधातील नवविधा भक्ती ही ईश्वराप्रमाणेच सद्‌गुरूचीही सांगितली आहे. आपले उपास्य दैवत सद्‌गुरू असल्याने, त्यांच्या भक्तीमध्ये, त्यांना जे जे आवडते ते मनापासून करावे. सद्‌गुरूंशी अखंड एकतानता प्राप्त होण्यासाठी त्यांचा नामघोष करावा. गजर करावा. केवळ 'सद्‌गुरू-सद्‌गुरू' असा मनोभावे केलेला उच्चारही त्यांच्यापर्यंत पोहोचतो. सद्‌गुरूरुपाच्या अखंड ध्यानाने, त्यांना प्रेम प्रतीने बांधावे. त्यांना आर्ततेने आळवून सख्य बांधावे व आपल्या चित्ताचा लय करावा. अशावेळी देवाला ही स्वस्थ बसवत नाही. तो विश्वंभर आपण होऊन प्रगटतो व भक्ताच्या मागेपुढे प्रेमानंदाने नाचू लागतो.

अभंगाच्या दुसऱ्या भागामध्ये, सद्‌गुरूंच्या निर्गुण उपासनेने ब्रह्मरूपता कशी प्राप्त होते याचे वर्णन आहे. वास्तविक पाहता आपण परिपूर्ण आत्माच आहोत, पण विस्मृतीने व देह उपाधीने आपण, 'हा देह म्हणजेच मी' अशी समजूत करुन घेतलेली आहे. सतत विषयाच्या चिंतनात गुंतल्यामुळे, आपल्याला स्वतःच्या

आत्मरूपतेचे विस्मरण झालेले आहे. यावर उपाय म्हणजे आपल्याला झालेले विस्मरण, त्याच्याच स्मरणाने दूर करणे. असे झाले की आपले मूळचे तादात्म्य आहेच. गुरू हे आत्मरूप असतात. म्हणून गुरूरूप होणे म्हणजेच आत्मरूप होणे होय.

अखंड स्मरणरूप होणे म्हणजे तेच होऊन राहणे. स्मरण ही चिद्रुप/चैतन्यरूप अवस्था आहे. म्हणून आपण आत्मरूप होणे म्हणजे चैतन्यरूप होणे. याचाच अर्थ आपण ब्रह्मरूप होणे असा आहे. याकरिता सहस्रदळीच्या चिदाकाशातील 'सोऽहं सद्‌गुरूचे' ध्यान करणे ही यासाठी साधना सांगितली आहे. सुषुम्नेचे वरचे टोक म्हणजे ब्रह्मरंध्र. त्याच्या वरच्या भागातील पोकळीला 'त्रिकूट आकाश' म्हणतात. त्याच्याही वरच्याबाजूस टाळू खाली छत्रीसारखे सहस्रदळ/चिदाकाश आहे. तेथे सद्‌गुरूंचे वास्तव्य असते. तेथे 'सोऽहं हंसः' या गुरुपादुकांची धारणा करून स्मरण करावे.

ही सोऽहंस्मरण भक्ती साध्य होण्यासाठी, त्याची गोडी हवी. सत्संगती व सद्‌गुरूभजनाच्या आवडीने हे साध्य होते. भजन याचा अर्थ 'रसस्वादन' करणे असा आहे. सोऽहंस्मरण पुनःपुन्हा घोळविणे म्हणजे रसस्वादन होय. असे झाले असता, सोऽहंस्मरणाने भक्ती दृढ होते. अशा सोऽहंभक्तीचे बळ अपार आहे. अशा स्मरणभक्तीने अखेर ब्रह्मरूपता प्राप्त होते. भवभयापासून मुक्त होऊन त्याला चिरशांती प्राप्त होते, असे दासराममहाराज सांगतात.

***





## ३२

**आता जेथे जेथे जैसे धावे मन ।**
**तेथे तेथे चरण सद्‌गुरुंचे ।।१।।**
**नमन ते भक्ती नामीच विश्रांती ।**
**ईक्षणाची स्थिती समाधी हे ।।२।।**
**त्रिवेणी संगम देही या प्रचीति ।**
**होत आहे मुक्ती पुण्यपापा ।।३।।**
**दासरामा आता नामाची आवडी ।**
**गुरूनाथा गोडी सद्रूपाची ।।४।।**

**अर्थ -** नामभक्तीपंथ सर्वश्रेष्ठ आहे. इडा-पिंगला, सुषुम्नाकार होऊन तेथील नामगतीची प्रचीति आली असता, सर्वप्रकारचे पाप-पुण्य नामशेष होते. सुषुम्नेतील ऊर्ध्वगामी प्राणसाधनेने, चिदाकाशातील सोऽहं सद्‌गुरुंचे दर्शन होते. त्यामुळे सहजसमाधीची अवस्था प्राप्त होऊन, नामीच्या म्हणजे आत्मस्थितीच्या ठिकाणी प्रगाढ शांती प्रगटते. नामाच्या आवडीने सत्स्वरूप गुरुनाथांच्या कृपेने सर्वत्र सद्‌गुरूचरण भरून राहिले आहेत असा दिव्य अनुभव येतो आहे, असे श्रीदासराममहाराज सांगतात.

**विवरण -** या अभंगामधून चिमडसंप्रदायामधील नामभक्तीपंथाची रूपरेषा मांडलेली आहे. जीव आणि ब्रह्म यांच्या ऐक्याची प्रक्रिया, 'योग' या शब्दाने सूचित केले जाते. मनाचे मनत्व नाहिसे होणे, हे येथे अपेक्षित आहे. जीव वेगळेपणाने न राहता आत्म्याशी एकरूप झाल्याने, त्याचा वेगळेपणा, विभक्तपणा संपून तो भक्त होतो. या भक्तीचा योग हा आत्म्याशी एकरूप होऊन साधावयाचा आहे. योगाने भक्तीभाव सिद्ध होतो. नामभक्तीपंथ साधण्यासाठी 'खरे नाम' हाती येणे आवश्यक आहे. 'इडा' ही प्राणवाहक नाडी, माणसाच्या डाव्या नाकपुडीत, तर 'पिंगला' ही उजव्या नाकपुडीत असते. इडा आणि पिंगला एकत्र आल्या, त्यांचा संगम झाला की, त्रिवेणी सुषुम्ना प्रगट होते. या सुषुम्नेतील उर्ध्वगामी प्राणगतीमध्ये उमटणारा ध्वनी म्हणजे ते 'गतीरूप नाम' आहे. हे गतीरूप रामनाम साधणे, त्याची प्रचीति येणे, हे अत्यंत महत्वाचे आहे, असे श्रीमामामहाराजांनी रामपाठामध्ये सांगितलेले आहे. सुषुम्नेतील प्राणगतीमध्ये उमटणाऱ्या नादाला 'चैतन्यनाम' म्हणतात.

सुषुम्नेतील नामाच्या अभ्यासाने, जीवाचे पाप-पुण्य संपून जाते. 'सुषुम्ना' ही अग्निनाडी असल्याने, पापपुण्य दग्ध होऊन, केवळ शुद्ध पुण्य हाती येते. चैतन्य हे शुद्ध पुण्य आहे. प्रत्येक प्राणी पाप-पुण्य करून जन्माला येतो. पापपुण्यामुळे जन्माला येणे यात माणसाचे कर्तृत्व नाही. तर केवळ आत्मसाक्षात्काराने जीवनाला





कृतार्थता येते. सुषुम्नेतील नामाने पापपुण्य संपल्याने, पुन्हा जन्माला येण्यापासून मुक्ती मिळते.

सुषुम्नेतील प्राणगतीमधून उत्पन्न होणाऱ्या नादालाच नाम असे म्हणतात. म्हणून नादश्रवण म्हणजे नामस्मरण होय. या नामस्मरणातूनच चिदाकाशातील सोऽहंआत्मस्वरूप प्रगटते. चिदाकाशातील सोऽहंरूप सद्गुरूंच्या दर्शनाने, मनाची धावाधाव संपते. अशा निर्विकल्प स्थितीमध्ये त्याला 'सहजसमाधीची' अवस्था प्राप्त होते. हीच अमन/उन्मनीची अवस्था होय. ज्याचे नाम घेतले जाते, त्याला 'नामी' म्हणतात. येथे सोऽहं आत्मा हा 'नामी' आहे. चैतन्यनामाच्या योगे सोऽहंचैतन्य आत्म्याशी समरस झाले असता, मी देह नसून, मी आत्मा आहे, अशी आत्मबुद्धि स्थिर होते. असे झाले असता, खरी विश्रांतीची अवस्था प्राप्त होते. कारण आत्मा हा शांतरूप आहे.

सहजसमाधी अवस्थेमध्ये, देहभावावरील मनाची धावाधाव संपून जाते. अशा सहज उन्मनी अवस्थेमध्येही गुरूभक्ती चालूच राहते. हीच ज्ञानोत्तर भक्ती होय. अशा उन्मनी अवस्थेत, सर्वत्र सद्गुरूंच्या चरणांच्या अस्तित्वाचा अनुभव येत राहतो.

चैतन्यनाम हे सत्ब्रह्मस्वरूपाची प्राप्ती करून देणारे आहे. सद्गुरूकृपेने सुषुम्नेमधील चैतन्यनामाची आवड निर्माण झाली

असता, त्याच नामाने, चिदाकाशातील सद्गुरूंचे दर्शन होणार आहे. चिदाकाशातील दर्शनाला निश्चळत्व प्राप्त झाले असता, तोच सत्ब्रह्माचा अनुभव ठरतो. अशातऱ्हेने निश्चळत्व ब्रह्मरूप सद्गुरूंच्या दर्शनाने प्राप्त होणारा ब्रह्मरसाचा गोडवा अवीट आहे, असे दासराममहाराज सांगतात.

***





## ३३

**सद्गुरूंनी केले उघडे अंतर ।**
**विचार सागर प्रगट झाला ।।१।।**
**आनंद जोडिला आनंद जोडिला ।**
**अविनाश आला हाती ठेवा।।२।।**
**काय माझी सेवा काय माझा भाव ।**
**परी सद्गुरूराव संतोषला।।३।।**
**देवाजीची मात कळेचिना कोणा ।**
**दासराम चरणा हनुमंतांचे ।।४।।**

**अर्थ -** श्रीदासराममहाराज सांगतात की, सद्गुरूकृपेने मजला सच्चिदानंद ब्रह्माचा साक्षात्कार झाला. परब्रह्म हे अविनाशी सत्रुपाने आणि व्यापक ज्ञानरूप चिद्रुपाने प्रगट होताच, सर्वत्र आनंदाचा अनुभव येतो आहे. एक आदर्श ज्ञानी सद्गुरूभक्त असूनही श्रीदासराममहाराज स्वतःकडे कमीपणा घेऊन, 'आपला सेवाभाव पुरेसा नसतानाही सद्गुरू संतोषल्याचे' सांगतात. खरोखरीच देवाची लीला आगध असल्याचे, आपले सद्गुरू श्रीहनुमंतराय कोटणीसमहाराज यांचे चरणी लीन झालेले श्रीदासराममहाराज सांगतात.

**विवरण -** या अभंगामध्ये, गुरूकृपेने अनुभवास आलेल्या सच्चिदानंद स्वरूपाच्या साक्षात्काराचे वर्णन आलेले आहे. तसेच, गुरूसेवाभावाचे महत्वही सांगितलेले आहे. ''**अध्यात्मशास्त्रीये । अंतरंगची अधिकरिये । परी लोकू वाक्चातुर्ये । होईल सुखया ।।**'' (श्रीज्ञानदेव). अध्यात्मामध्ये सद्गुरूंच्या अंतरंगी शिरून, त्यांची कृपा संपादन करतो, तोच आत्मविद्येचा अधिकारी ठरतो. देह या उपाधीच्या आतील चैतन्याचा शोध, सद्गुरूंच्या अंतरंगात शिरूनच घेतला जातो. अंतरंगी प्रविष्ट झालेले साधकच, त्या परतत्त्वाला स्पर्श करून त्याच्याशी एकरूप होऊ शकतो. एकदा का असा प्रवेश झाला की मग सद्गुरू आपले अंतरंग, आपले हृदय उघड करतात व त्यानंतर, '**हृदया हृदय एक झाले । ये हृदयींचे ते हृदयी घातले ।।**' ही प्रक्रिया पूर्ण होते.

असे झाले असता, सच्चिदानंद ब्रह्माचा अनुभव येतो. आत्म्याच्या ज्ञानरूपतेचा अनुभव येथे ''विचारसागर प्रगटला'' अशा शब्दात केला आहे. विचारांचे मूळ सूक्ष्मरूप शब्द, शब्दाचे सूक्ष्म रूप नाद, नादाचे मूळ सूक्ष्मरूप जाणीव/ज्ञान आहे. चैतन्य हे ज्ञानरूप आहे म्हणून, 'विचारसागर हा चैतन्याचा सागर' आहे. हृदयाच्या सर्व ज्ञानाचे मूळ ज्ञानरूप आत्म्यात आहे.

आत्मा हा सत्रूप आहे, म्हणून तो अविनाशी आहे. ''**उपजे ते नासे । नाशिले ते पुनरपि दिसे । हे घटिकायंत्र जैसे । परिभ्रमेगा।।**'' आपणा सर्वांना उत्पत्ती-स्थिती व नाश असलेल्या या जगाचा अनुभव आहे. दृष्याचे होणारे सर्व कृत्रिम ज्ञान नाशवंत आहे. 'आत्मा' मात्र





अनादि, अनंत असल्याने, त्याला उत्पत्ती-स्थिती-नाश नाही. असा हा आत्मा तिन्ही काळी अविनाशी असतो व असा अविनाशी आत्मा 'मी' आहे, असा अनुभव घेतो. असा सत्चिद्आत्म्याचा अनमोल ठेवा हाती आला असता, तेथे आनंद आपोआप प्रगटतो. आत्मा हा आनंदरूप असल्याने, विषयनिरपेक्ष आनंदाचा म्हणजेच ब्रह्मानंदाचा लाभ होतो.

अभंगाच्या दुसऱ्या भागात, आत्मज्ञानाकरिता सद्गुरूंची अनिवार्यता सांगितलेली आहे. ''सद्गुरूवाचूनी सापडेना सोय'' असे सर्व संतांनी आग्रहपूर्वक सांगितले आहे. गुरूपेक्षा देव मोठा नाही व वेगळा नाही हे ओळखले असता, 'गुरू' दूर नाही. कारण गुरू हे तत्त्व असून ते सदैव उपलब्ध असते. गुरूत्व दुर्लभ नाही, सत्शिष्य होणे कठीण आहे. यासाठी गुरूंना सर्वस्व वहाण्याची तयारी पाहिजे. सेवकाची स्वतंत्र मालकी कशावरही नसते. त्यामुळे खऱ्या सद्गुरूसेवकाला भोवतालच्या जगावर व आपल्या देहावर केवळ सद्गुरूंची सत्ता आहे, असा दृढ विश्वास हवा. अत्यंत नम्रभावाने, सर्वस्व सद्गुरूंना वाहणे ही खरी सेवा, हीच खरी पूजा व हीच खरी उपासना होय.

सद्गुरू भक्तीचा अनन्यभाव दृढ झाला असता, सद्गुरूंना संतोष होतो. गुरूआज्ञा प्रमाण मानून केलेली गुरूभक्ती सिद्ध झाली असता सद्गुरू कृपा करतात. अशी कृपा झाली असता, अज्ञान आवरण दूर होऊन आत्मज्ञान होते.

श्रीदासराममहाराज हे आत्मज्ञानी गुरूभक्त होते. असे असूनही आपल्या हातून पुरेशी सद्गुरूसेवा झाली नाही, अशी विनम्र भूमिका घेतात. आपल्यावर झालेली गुरूकृपा ही देवाची लीला आहे, त्याची योजना आहे असे सांगून, आपले सद्गुरू श्रीहनुमंतराय कोटणीसमहाराज यांचे चरणाशी विनम्र होऊन राहतात.

***





## ३४

**हनुमंत सद्गुरू सुखाचे निधान ।**
**अविनाश धनराशी देही ।।१।।**
**अमतसागर प्रकाशाची कळा ।**
**भक्तीचा जिव्हाळा हनुमंत ।।२।।**
**ज्ञानियांचा राजा हनुमंतराय ।**
**जगताचे मायबाप धनी ।।३।।**
**ऐसे ते सद्गुरू कैसेनी वोळले ।**
**अबोल बोलविले दासरामा ।।४।।**

**अर्थ -** श्रीदासराममहाराज सांगतात, आपले सद्गुरू श्रीहनुमंतराय कोटणीसमहाराज हे सुखरूप ब्रह्म असून, त्यांना सर्वसुखाचे निधान म्हटले जाते. ते सत्‌रूप असल्याने, अविनाशी आत्मस्वरूपाच्या धनराशींनी ओतप्रोत आहेत. आत्मप्रकाशाचा अमृतसागर त्यांच्या हृदयी अथांग पसरलेला आहे. गुरूप्रेमाचा अखंड, न आटणारा झरा असलेले श्रीकोटणीसमहाराज हे ज्ञानियांचे राजे आहेत. ते देवांचेही देव असल्याने, ह्या जगताचे माय-बाप-धनी आहेत. असे हे दयाळू सद्गुरू मजवर प्रसन्न झाले आणि त्यांनी माझ्याकरवी निःशब्द आत्म्याचे अबोल बोल बोलविले आहेत.

**विवरण -** या अभंगामध्ये श्रीदासराममहाराजांनी आपले सद्गुरू श्रीहनुमंतराय कोटणीसमहाराज यांच्या सच्चिदानंद ब्रह्मस्वरूपाचे वर्णन केलेले आहे. श्रीकोटणीसमहाराज हे सुखरूप/आनंदरूप होते. हे आत्मसुख कोणत्याही बाह्य विषयावर अवलंबून नसते. हे आत्मसुख पदार्थनिरपेक्ष, व्यक्तिनिरपेक्ष व विषयनिरपेक्ष स्वरूपाचे असते. कोटणीसमहाराज असे ब्रह्मरूप होऊन ब्रह्मसुख भोगीत आहेत. ब्रह्म हे अमर्यादपणे व्यापक आहे. त्यामुळे तेथील ब्रह्मसुखाचा खजिनाही त्याच स्वरूपाचा आहे. म्हणून सुखरूप झालेले सद्गुरू म्हणजे व्यापक, अमर्याद सुखाचा ठेवाच असतात.

श्रीकोटणीसमहाराज हे सत्ब्रह्मस्वरूप आहेत. 'सत्‌रूप' म्हणजे जे कशानेही बाधित/निरस्त/नष्ट होत नाही. जे तिन्ही काळात, न बदलता असते, ज्याला कोणताही विकार नाही, असे ते अनादि अनंत तत्त्व आहे. श्रीकोटणीसमहाराज अशा निखळ 'असणेपणाने' आहेत. मी कायम आहे, मला विनाश नाही, अशा अविनाश स्वरूपाने असण्यात आनंद आहे. म्हणून श्रीकोटणीसमहाराज हे सोऽहंरूपाने, अविनाशी, सत्‌आनंदाचे निधानच होते. सद्गुरू हे चिद्रूप आहेत. चिद् याचा अर्थ 'चैतन्य' आहे. चिदाकाशातील चैतन्यप्रकाश/ज्ञानप्रकाश सारे विश्व प्रकाशित करते. जीवाला विश्वाचे ज्ञान, या ज्ञानप्रकाशाने होते. येथील 'चिदाकाश' ही 'संजीवनी' स्थिती आहे. हा अमृताचा सागर असून, ही अमृतमय अवस्था आहे. कोटणीसमहाराज अशा अमृतमय अवस्थेत आहेत. मृत नव्हे ते अमृत. आत्मस्वरुप हे खरे अमृत होय. कोटणीसमहाराज





हे अशा अविनाशी, अमृतमय चैतन्यरूपाने स्थित आहेत. चिद् चा एक अर्थ 'ज्ञान' असा आहे. सोऽहं साधनेतील 'सकार' व 'हकार' च्या पारड्यातून, देहबुद्धिजन्य अहंकाराचा निरास झाला असता, नामजप समत्वाने साधतो व आत्मबुद्धिमध्ये प्रवेश होतो. या आत्मबुद्धिच्या स्फुरणाला 'चैतन्याचे वारे' म्हणतात. असे ज्ञानरूप आत्मस्फुरण, कोटणीसमहाराजांचे ठिकाणी नित्य होते. म्हणून त्यांना 'ज्ञानियांचा राजा' म्हटले जाते.

कोटणीसमहाराज हे निष्ठावंत गुरूभक्त होते. त्यांचे ठिकाणी गुरूप्रेमाचा झरा अखंडत्वाने होता. 'चिमडचेमहाराज' हे कोटणीसमहाराजांचे सद्गुरू होत. चिमडचेमहाराजांव्यतिरिक्त अन्य देव कोटणीसमहाराजांना ठाऊक नव्हता. विष्णुरूपातील आपल्या सद्गुरूंचा नित्य साक्षात्कार हेच त्यांचे जीवन होते. सद्गुरूस्वरूप व आत्मस्वरूप एकच आहे. सद्गुरू हाच देव. '**सद्गुरू देव, सद्गुरू देव। देवांचाही थोर देव ।**' यादृष्टीने, गुरू हा देवाप्रमाणे जगत्‌कर्ता व नियंता आहे. तेच मायबाप होऊन सर्वांचे संगोपन करतात. ते जगाचे नियंते असून, जीवामध्ये आत्मरूपाने असतात.

परमात्मा निःशब्दरूप आहे. त्याचा अनुभवही निःशब्दरूपच आहे. श्रीदासराममहाराज सांगतात, 'असे असले तरी, सद्गुरू मजवर प्रसन्न झाले आणि हे निःशब्द ब्रह्मरूप प्रगट होईल असे अबोलाचे बोल, निवृत्तपर शब्दरचना, सहज कौतुकाने मजकडून प्रगट करून घेतली, हीच सद्गुरूंची अनुपम हातोटी आहे.'

***

# ३५

**किती कनवाळू नारायणराव ।**
**पाहोनिया भाव हृदयीचा ।।१।।**
**धावोनिया आले भक्ताचिया घरी ।**
**बोधामृत सत्वरी पाजियेले।।२।।**
**ब्रह्मतन्मयता करोनि दिधली ।**
**अलोट दाविली तेजोराशी ।।३।।**
**अनंता जन्मीचे जोडिले सुकृत ।**
**दासरामा हेत सुफळ झाला ।।४।।**

**अर्थ -** श्रीदासराममहाराज सांगतात की, 'श्रीनारायणराव म्हणजेच भगवान निंबरगीकरमहाराज हे अत्यंत दयाळू आहेत. त्यांनी माझ्या अंतःकरणातील भक्तीप्रेमभाव पाहिला आणि ते विनाविलंब माझ्या घरी अवतीर्ण झाले. सिद्धानंदरुपात साक्षात मजसमोर प्रकट होऊन ज्ञानबोध केला. त्या ब्रह्मबोधामुळे तत्काळ ब्रह्मरुपताच प्राप्त झाली. त्यामुळे तेजोप्रकाशाची सर्वत्र उधळण झाल्याचा दिव्य अनुभव प्राप्त झाला. अनंत जन्मांच्या सुकृताचे फळ म्हणूनच केवळ सद्गुरू निंबरगीकरमहाराजांच्या कृपेचा लाभ झाला आहे.'





**विवरण -** भगवान सद्गुरू श्रीनिंबरगीकरमहाराजांचे महात्म्य वर्णन करणारा हा अभंग आहे. परमार्थाचे 'दीपस्तंभ' म्हणता येईल, असे महान साधू श्रीनिंबरगीकरमहाराज हे कर्नाटकातील देवनिंबरगी या गावी सन १७९० ते १८९५ या काळात होऊन गेले. त्यांचे नांव नारायणराव भाऊसाहेब नीलवाणी असून, त्यांना निंबरगीकरमहाराज म्हणतात. सिद्धपदाला पोहोचल्यावर ते 'गुरूलिंगजंगम स्वामी' या नावाने विख्यात झाले. ते चिमड संप्रदायाचे मूळ संस्थापक आहेत. प्राणाच्या योगाने प्राणाचा होणारा निखळ व्यवहार हाच परमार्थ असून, 'प्राणावर लक्ष ठेवून राहणारा, हा आत्मतृप्त होतो हे त्यांच्या तत्त्वज्ञानाचे मुख्य सार आहे.'

संत हे स्वस्वरुपी मिळाल्यानंतर शरीराने दृश्य नसले तरी, निर्गुण रुपाने जगदाकार होऊन राहिलेले असतात. ते आपल्या अवताराचे उर्वरीत कार्य अनेकप्रकाराने चालूच ठेवतात. आपल्या निष्ठावंत भक्तांसाठी त्यांना दर्शन देऊन, त्यांच्यामार्फत नियोजित देवकार्य चालू ठेवतात. याचे साक्षात् उदाहरण म्हणजे श्रीनिंबरगीकरमहाराजांनी, आपल्या निर्याणानंतर ४३ वर्षांनी म्हणजे सन १९३८ च्या पौष शुद्ध नवमीस श्रीदासराममहाराज यांचे घरी प्रगट होऊन त्यांना ज्ञानबोध केला. 'सिद्धानंद' रुपाने प्रगट होऊन, अनेक कानडी पदे उच्चारून त्यांनी ज्ञानबोध केला. एकूण २२८ पदांचा संग्रह 'गुरूलिंगगीता' या नावाने प्रसिद्ध आहे. त्यामध्ये कानडी व्यतिरिक्त मराठी, इंग्रजी, संस्कृत पदांचाही समावेश आहे. यामध्ये अनेक पारमार्थिक सिद्धांत सूत्ररुपाने आलेले आहेत.

याच वरील गोष्टींचे वर्णन या अभंगामध्ये केलेले आहे. 'आपल्या ठिकाणी वसत असलेले सद्गुरूप्रेम, भक्ती पाहून अत्यंत दयाळू अशा निंबरगीकरमहाराजांनी घरी येऊन दर्शन दिले व बोध केला' असे श्रीदासराममहाराजांनी म्हटले आहे.

श्रीदासराममहाराज हे चिमड संप्रदायातील श्रेष्ठ अधिकारी पुरुष आहेत. श्रीगुरूलिंगजंगममहाराजांच्या ज्ञानबोधाने त्यांचा ब्रह्मस्वरूपाचा अनुभव, दृढ व अपरिवर्तनीय व निश्चळ स्वरूपाचा झाला. त्यामुळेच त्यांना चिदाकाशातील ज्ञानप्रकाशाच्या अमर्याद अनुभवाचे वैभव प्राप्त झाले. याचेच वर्णन गुरुलिंगगीतेतील एका पदामध्ये आलेले आहे.

''**भासुर अग्निद तेजवु कंडेनू । वायवु गगन गयिंया ।।**
**बेळकली हरी पूरद सर्वनू। प्रल्हाद शिवने कायदंथा।।**''(पद २८)
अर्थ - ''चिदाकाशाचे आत असणाऱ्या चिद्वायुचे ठिकाणी आत्मा हा अग्निरूपाने, तेजाने दैदिप्यमान होतो. हरि (आत्मा) हा सर्वप्रकाशक असून, प्रल्हादाचे ठिकाणी तोच आहे.''

अखेरीस श्रीदासराममहाराज म्हणतात की, 'माझे अनंत जन्मीचे पुण्य फळाला आले. त्यामुळे भगवान सद्गुरू श्रीनिंबरगीकरमहाराज प्रसन्न झाले व त्यांनी कृपा केल्याने मजला हा अलौकिक लाभ झाला आहे.'

***





# ३६

**श्रीगुरू श्रीगुरू देही जयजयकारू ।**
**होतसे उद्धारू परिसता।।१।।**
**चिमड ते क्षेत्र करिते पुनीत ।**
**जेथे विराजीत साधुराय ।।२।।**
**धन्य रामचंद्र सद्गुरू माऊली ।**
**करिती साऊली भाविकासी ।।३।।**
**धन्य लक्ष्मीअक्का मोक्षसुख देई ।**
**तये ठायी लाही समाधान ।।४।।**
**काडसिद्धराज शोभती त्या स्थानी ।**
**तेथे लोटांगणी दासराम ।।५।।**

**अर्थ -** नामसाधनेमध्ये सद्गुरूंच्या नावाच्या जयजयकाराने देह भरून जातो. अशा या नामाच्या श्रवणाने, जयजयकाराने, जीवाचा उद्धार होतो. तो आत्मरूप होतो. 'चिमड' हे गाव या संप्रदायाचे पवित्र तीर्थक्षेत्र आहे. या पवित्र स्थळी रघुनाथप्रिय साधुमहाराज विराजमान आहेत. तेथे स्थित असलेले सद्गुरू श्रीरामचंद्रमहाराज यरगट्टीकर (चिमडचे महाराज), हे माऊलीरुपाने भाविकांचे आश्रयस्थानच होऊन राहिले आहेत. तेथे वास्तव्यास असलेल्या मोक्षलक्ष्मी लक्ष्मीआक्कांचे पायी लीन झाले असता, समाधान प्राप्त

होते. अशा पवित्र स्थानी, निंबरगीकरमहाराजांचे सद्‌गुरू काडसिद्धराज हे शोभून दिसतात. ह्या सर्वांचे पायी दासराम लोटांगण घालीत आहे.

**विवरण -** या अभंगामध्ये प्रामुख्याने चिमड क्षेत्राचा महिमा वर्णिलेला आहे. 'चिमड' हे जसे तीर्थक्षेत्र आहे, तसेच या देहालाही क्षेत्र म्हटले जाते. आपल्या देहाचे क्षेत्र पुनीत झाल्याशिवाय, चिमड क्षेत्राच्या पावित्र्याचा महिमा आपल्याला कळणार नाही. म्हणूनच श्रीदासराममहाराजांनी या अभंगाच्या सुरवातीस, अध्यात्मातील देहाचे महत्व सांगून नंतर चिमड क्षेत्राचा महिमा सांगितला आहे.

सुषुम्नाकार झालेल्या ऊर्ध्वगामी प्राणगतीमध्ये अनाहत नादाचा अनुभव येऊ लागतो. या नादालाच नाम म्हणतात. नादासह असलेला हा प्राण चिदाकाशात पोहोचतो. तेथे अनाहत नादाचा प्रकर्ष होतो व तो सोऽहंनादरूपाने परावर्तित होतो. सद्‌गुरू येथे सोऽहंनादप्रकाशरूपाने स्थित असतात. येथील सोऽहंनाद श्रवणात जीवाचा उद्धार होतो व तो सोऽहंआत्मरूप होतो. मानवी देहक्षेत्राप्रमाणे ह्या भूतलावर अनेक संतमहात्म्यांच्या वास्तव्याने पुनीत झालेले 'चिमड' हे क्षेत्र आहे. चिमड संप्रदायाचे ते तीर्थक्षेत्र असून केंद्रस्थान आहे. ह्या अभंगामध्ये, चिमड येथे वास्तव्य करून राहिलेल्या श्रीसाधुराय, श्रीरामचंद्रमहाराज यरगट्टीकर, मोक्षलक्ष्मी लक्ष्मीआक्का व काडसिद्ध या चार महाराजांचे वर्णन आलेले आहे.





१.साधुराय :- साधुराय म्हणजे श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज. ते निंबरगीकरमहाराजांचे पट्टशिष्य होते. चिमड क्षेत्राचे ते अधिष्ठाता देव आहेत. ते चिमड संप्रदायाचे केंद्र बिंदू आहेत. साधुमहाराजांनी इ.स.१८७९ मध्ये चिमड येथे देहत्याग केला. चिमडचे महाराजांनी निंबरगीकरमहाराजांचे आज्ञेने, तेथील तापनाशी तीर्थाच्या मध्यभागी मंदिर बांधून, साधुमहाराजांच्या पादुकांची स्थापना केली. अशाप्रकारे साधुमहाराज हे देवरुपाने आजही तेथे स्थित आहेत.

२. श्रीरामचंद्रमहाराज यरगट्टीकर (चिमडचेमहाराज) : चिमडचे महाराज हे चिमड संप्रदायाचे प्रवर्तक असून साधुमहाराजांचे ते पट्टशिष्य होते. त्यांना श्रीएकनाथमहाराजांचे अवतार मानले जाते. श्रीनिंबरगीकरमहाराजांच्या आज्ञेने आपली नोकरी सोडून, ते चिमडास येऊन राहिले. त्यांनी साधुमहाराजांच्या मंदिराची स्थापना करून, आश्विन वद्य १२ (गुरूद्वादशी) ते कार्तिक शुद्ध ५ (पांडवपंचमी) या दिवसांच्या उत्सवात, साधुमहाराजांच्या रथोत्सवाचा कार्यक्रम आयोजित केला. आजही तो प्रतिवर्षी चालू आहे. भाविकांकरिता सावली बनून समाधीरुपाने आत्ताही त्यांचे वास्तव्य चिमड येथे आहे.

३. मोक्षलक्ष्मी आक्कामाऊली : मीराबाई, मुक्ताबाई प्रमाणे लक्ष्मीअक्कांची गणना थोर तपस्विनी, योगिनी यामध्ये केली जाते. श्रीनिंबरगीकरमहाराजांची सेवा व साधन करून, त्यांनी परमार्थातील श्रेष्ठ असे पद प्राप्त करून घेतले होते. निंबरगीकरमहाराजांच्या

निर्याणानंतर त्यांच्याच इच्छेप्रमाणे, लक्ष्मीबाईआक्का चिमडमठामध्ये वास्तव्यास राहिल्या. चिमडमहाराजांच्या निर्याणानंतर तेथील प्रपंच व परमार्थ यांची त्यांनी निरलसपणे देखभाल केली. शके १८९९ मध्ये त्या परमात्म्याशी एकरूप झाल्या. त्यांची समाधीही तेथेच आहे. त्यांना शरण गेल्याने अतीव समाधान लाभते, हा अनुभव आहे.

४. काडसिद्धराज : सिद्धसंप्रदायातील 'काडसिद्ध' हे निंबरगीकरमहाराजांचे सद्‌गुरू होते. श्रीकाडसिद्धांच्या आज्ञेने त्यांनी जनांना बोध केला. चिमडचे महाराजांनी, निंबरगीकरमहाराजांच्या अनुज्ञेने, तापनाशीनी गंगेमध्ये मंदिर स्थापन करून, त्यामध्ये साधुमहाराजांच्या पादुका, निंबरगीकरमहाराजांच्या नावाची पिंड व निंबरगीकरमहाराजांचे सद्‌गुरू श्रीकाडसिद्ध यांचे नावाचा बाण, अशा त्रिमूर्तींची स्थापना केली. अशातऱ्हेने श्रीकाडसिद्ध त्या स्थानी आजही शोभून दिसत आहेत.

अशा या सर्व सिद्ध महात्म्यांच्या चरणी मी अनेकवार लोटांगण घालीत आहे, असे श्रीदासराममहाराज म्हणतात.

***





## ३७

**श्रीगुरूंचा पाठ हनुमंत गुरूनी । वदविला वदनी बालकाच्या।।१।।**
**जयांचे सेवक पिताजी गोविंद । दिला ब्रह्मानंद कीर्तनी या ।।२।।**
**ऐशा हनुमंते बालाचे कवतूक । केलेची विशेख सत्यसत्य ।।३।।**
**अज्ञानिया मुखे बोलविले ज्ञान । साक्षात्कार काय आन सांगू ।।४।।**
**१८६१(अठराशेएकसष्ठ) पौष शुद्ध दशमी । सद्‌गुरूचे नामी दंग झालो।।५।।**
**हनुमंत सद्‌गुरू दाविती विचारू । ग्रंथ हा साधारू वर्णविला ।।६।।**
**नामाचा आनंद श्रीगुरूपाठ । ब्रह्म ते निघोट सत्य सत्य ।।७।।**
**विश्वास धरोनि कृपेची उत्तरे । बोलिलो सादरे सज्जन हो ।।८।।**
**तुम्हा संताप्रती करितो वंदन । जनी जनार्दन व्यापियेला ।।९।।**
**श्रोता आणि वक्ता धन्य हरिरूप । देखतो स्वरूप गुरूकृपे ।।१०।।**
**श्रीगुरूपाठ हनुमंत चरणी । अर्पी लोटांगणी दासराम ।।११।।**

**अर्थ -** श्रीदासराममहाराज म्हणतात, 'माझे पितृदेव गोविंदराय (श्रीमामामहाराज केळकर) हे सद्‌गुरू हनुमंतरायांचे सत्‌शिल सेवक असून, त्यांच्या नित्याच्या कीर्तनात प्रगट होणाऱ्या ब्रह्मानंदाचा मी लाभ घेतलेला आहे.' श्रीदासराममहाराज पुढे सांगतात की, 'सद्‌गुरुंच्या कृपेमुळेच मला, सत्घन ब्रह्माचा निघोट आनंद प्राप्त झाला आहे. सद्‌गुरुंनी बुद्धिस्थ राहून मला प्रेरणा दिली. गुरूप्रेरणेचा परिणाम म्हणून, हा गुरुपाठ साकार झालेला आहे. हा त्या निघोट

**अशा ब्रह्मानंदाचाच आविष्कार आहे. सद्गुरूंनी हा गुरूपाठ मजकडून वदवून घेऊन, माझे कोड पुरविले व कौतुक केले. हा केवळ त्यांचाच अधिकार आहे.'**

पुढे दासराममहाराज सांगतात की, 'सद्गुरूंनी मला सर्वव्यापक स्वरूपाचा अनुभव दिला. त्यामुळे श्रोता, वक्ता व सर्वजनांमध्ये फक्त हरिरूप दिसते आहे. अखेरीस सर्व संत सज्जनांना वंदन करून सांप्रतचा हा गुरूपाठ सद्गुरू हनुमंतराय कोटणीसमहाराज यांचे चरणाशी अर्पण करून, त्यांचे चरणी लोटांगण घालतो आहे.'

**विवरण -** या गुरूपाठाच्या अखेरच्या अभंगात, श्रीदासराममहाराजांनी या गुरूपाठाचे सर्व श्रेय आपले सद्गुरू श्रीहनुमंतराय कोटणीसमहाराजांना दिलेले असून, त्यांचे महात्म्य वर्णिलेले आहे. आपल्या सद्गुरूंचे महत्व सांगताना सुरवातीलाच श्रीदासराममहाराजांनी, आपले पितृदेव श्रीगोविंदराय (मामामहाराज केळकर) यांची अध्यात्मिक महत्ता सांगितलेली आहे. पितृदेव मामामहाराज हे एक थोर साक्षात्कारी संत होते. चिमड संप्रदायातील ते एक श्रेष्ठ गुरूभक्त होते. ते स्वतःला हनुमंत सद्गुरूंचे सेवक म्हणवून घेत असत. श्रीमामामहाराजांच्या नित्यकीर्तनामध्ये ब्रह्मानंदाचा लाभ होत असल्याचे श्रीदासराममहाराज सांगतात. अशा तऱ्हेने त्यांनी आपले पितृदेव, श्रीमामामहाराजांच्या 'संतत्वाचा' उल्लेख केला आहे. याच अभंगात दासराममहाराजांनी, आपल्याला झालेल्या साक्षात्काराविषयी सांगितलेले आहे. संतसत्पुरुषांना





साक्षात्काराचे अनेक प्रकारचे अनुभव येत असतात.

सगुण उपासकाला आपल्या उपास्य देवतेचा साक्षात्कार होतो. तसेच निर्गुण उपासकाला नाद, प्रकाश अशाप्रकारचे साक्षात्कार होतात. श्रीदासराममहाराजांचे अवघे जीवन साक्षात्कारांनी समृद्ध होते. तरीही त्यांनी इथे केलेला साक्षात्काराचा उल्लेख म्हणजे व्यवहारातील एक चमत्कारच म्हणावा लागेल. शके १८६१ पौष शुद्ध नवमी या दिवशी दासराममहाराज आपले घरी एका खोलीमध्ये बसून, नामामध्ये दंग झाले असता, साक्षात् निंबरगीकरमहाराज सिद्धानंदरूपाने त्यांचे समोर प्रगट झाले आणि 'येनू इल्ले दानू' हे कानडी पद उच्चारून त्यांना बोध केला. अशाप्रकारे अनेक पदे त्यांना श्रुत झाली. अशातऱ्हेने गुरुलिंगगीता या माध्यमातून 'आत्मज्ञान' आपल्यामार्फत प्रगट केले. खरेतर, हा एक विलक्षण साक्षात्कार आहे व श्रीगुरूलिंगगीता म्हणजे गुरूपाठाचेच एक अनन्यसाधारण तत्त्व आहे. म्हणून येथे गुरूलिंगगीतेचा उल्लेख केला आहे.

प्रस्तुत 'गुरूपाठाचे' सर्व श्रेय श्रीदासराममहाराजांनी आपल्या सद्गुरूंना दिलेले आहे. निश्चळ नामाने सत्घन निघोट ब्रह्मस्वरूपाची प्राप्ती झाली असता, त्याठिकाणी सहजच ब्रह्मानंद प्रगटतो. निश्चळ ब्रह्मानंद हा या गुरुपाठाचा आधार आहे. बुद्धिस्थ राहून हनुमंतराय कोटणीसमहाराजांनी चालना दिल्याने, गुरुपाठाचा हा विचार शब्दबद्ध झाला आहे. हा ब्रह्मानंदाचा आविष्कार आहे.

श्रीदासराममहाराज हे सर्व अधिकारसंपन्न पुरुष होते. परंतु सद्‌गुरू समोर अत्यंत विनम्र भाव धारण करून, स्वतःला ते अज्ञ बालक म्हणवून घेतात. ही गुरूभक्तीची थोरवी आहे. श्रीदासराममहाराज म्हणतात, ''असा हा गुरूपाठ श्रीहनुमंतरायांनी माझेकडून वदवून घेऊन, माझे विशेष कौतुक केले आहे. त्यांच्याच कृपेने मजकडून हा 'श्रीगुरूपाठ' बोलविला गेला आहे.''

केवळ सद्‌गुरूकृपेने स्वरूपाचा व्यापक अनुभव येऊ शकतो. श्रोता, वक्त्यासह सर्व जनांमध्ये, एक हरिरूपच व्यापून राहिले आहे, अशा स्वरूपाचा हा अनुभव असतो. ''अशा स्वरूपी समरस झालेल्या सर्व संतसज्जनांना, मी विनम्र भावाने वंदन करतो आणि हा 'श्रीगुरुपाठ' सद्‌गुरू श्रीहनुमंतराय कोटणीसमहाराज यांना अर्पण करून, त्यांचे चरणी लोटांगण घालीत आहे'' असे श्रीदासराममहाराज म्हणतात.

***





## गुरूपाठ

### ३८

**गुरू जगी थोर बोलतसे श्रुती ।**
**गुरू कोण चित्ती उमगेना ।।१।।**
**ऐसा गुरूपाठ विचारेचि घ्यावा ।**
**विचारे शोधावा गुरूबोध ।।२।।**
**गुरू जगी एक बोले गुरूगीता ।**
**परी तया अर्था जाणती ना।।३।।**
**सद्रूपी ओळख करी तो सद्‌गुरू ।**
**येर ते गुरगुरू करिताती ।।४।।**
**गुप्तरूप जेणे प्रगटची दिसे ।**
**ऐसा गुरू वसे दासरामी ।।५।।**

अर्थ - जगामध्ये गुरूंची थोरवी सर्वात जास्त आहे, असे श्रुती सांगते. तसेच 'गुरू' हे एकच तत्त्व सर्वश्रेष्ठ आहे, असे गुरुगीतेमध्ये म्हटले आहे. असे असले तरी, खरा गुरू कोण? गुरुतत्त्व म्हणजे काय? त्याचे आकलन सामान्य माणसांना होत नाही. परंतु गुरुपाठाच्या सखोल विचाराने/चिंतनाने त्याचा शोध घेतला असता, गुरुकृपेने त्याची उकल होते. स्वतःला 'गुरू' समजणारी, गुरुपणाचे

सोंग घेतलेली ढोंगी माणसे समाजात आढळतात. परंतु सत्‌ब्रह्माची ओळख करून देणारा, त्याचे गुरुरूप प्रगट करून दाखविणारा 'खरा सद्‌गुरू' विरळाच असतो. खऱ्या सद्‌गुरुंची ओळख गुरूबोधानेच होते. असा सत्‌रूप सद्‌गुरू दासरामाचे अंतःकरणात वसतो आहे.

**विवरण -** गुरूपाठाच्या पहिल्याच अभंगात दासराममहाराजांनी गुरूंचे महत्व सांगितले आहे. गुरूंचे महात्म्य अगाध आहे, असे श्रुतीमध्ये व गुरूगीतेत म्हटले आहे. चिमड संप्रदायाच्या पंचपदीमधील, ''**सद्‌गुरू चिद्‌घन तुजला । आलो शरण मी तारी मजला ।।**'' या पदामध्ये सद्‌गुरूंची थोरवी यथार्थपणे वर्णिलेली आहे. श्रुती म्हणजे वेद होय. वेदांमधून अनेक ठिकाणी गुरूंचे वर्णन आलेले आहे. श्रुतींच्या अध्ययनानंतर ऋषींच्या स्मृतीमधून उतरलेले लेखन म्हणजे 'स्मृती' होय. भगवत्‌गीता/गुरूगीता ह्यांनाही स्मृतीच म्हटले जाते. गुरूगीता ही तर गुरूमहात्म्यास वाहिलेली आहे. सर्व शास्त्रेही गुरूंना, ब्रह्मा-विष्णु-महेश मानून त्यांचा गौरव करतात. अनेक पुराणांच्यामधूनही गुरूमहिमेचे वर्णन आढळते. तसेच सर्व संतसज्जनानांनीही ''**गुरू तोचि देव**'' असे त्यांचे वर्णन केलेले आहे. '**सद्‌गुरू माझा जीवाचा जीवलग**' असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात. समर्थ म्हणतात, '**असो जयासि मोक्ष व्हावा । तेणे सद्‌गुरू करावा । सद्‌गुरूविण मोक्ष पावावा । हे कल्पांती न घडे ।।**' तर जगद्‌गुरू श्रीतुकाराममहाराजांच्या मते, '**सद्‌गंरूवाचोनी सापडेना सोय । सद्‌गुरू महिमा अगाधची।।**'.

असे सर्वांनी गुरूंचे महात्म्य अनेक प्रकारांनी सांगितले असले





तरी, सामान्यजनांना गुरूंचे /गुरुतत्वाचे आकलन यथार्थतेने होत नाही. याचे कारण म्हणजे सध्या समाजामध्ये गुरूंच्या नावाने चाललेले ढोंगी प्रकार होय. आपले अंगी सद्‌गुरूंची कोणतीही लक्षणे नसताना, आपण संत/सद्‌गुरू आहोत, असे भासवून लोकांना लुबाडणाऱ्या ढोंगी माणसांपासून सावध राहण्याची सूचना सर्व संतांनी वेळोवेळी दिलेली आहे. समर्थ रामदासस्वामींनी दासबोधातील पाचव्या दशकातील दुसऱ्या समासामध्ये - ''**जे करामती दाखविती । तेहि गुरू म्हणिजेती । परंतु सद्‌गुरू नव्हेती । मोक्षदाते ।।**'' या पहिल्याच ओवीमध्ये, वेगवेगळ्या करामती दाखविणाऱ्या ढोंगी साधूंच्या, जे स्वतःला गुरू म्हणवून घेतात, त्यांचा निषेध केला आहे.

ब्रह्म हे सच्चिदानंदरूप आहे. अशा ब्रह्मस्वरूपाची सद्‌गुरू परोक्षज्ञानाने शिष्याला ओळख करून देतात. गुरू ह्या शब्दातील - गु = अंधःकार व रू = अंधार नाहिसा करणारा प्रकाश. सद्‌गुरू आपल्या शिष्याला अपरोक्ष आत्मज्ञानाचे साधन सांगतात व त्यांच्या अंतःकरणातील अज्ञान अंधःकाराचा नाश करून, त्याच्या देहामध्ये स्थित, गुप्त आत्मरूप प्रगट करून दाखवितात.

सद्‌गुरूंना शरण जाऊन, त्यांनी सांगितलेला साधनपाठ/ साधन अभ्यास मनापासून केला असता, गुरूबोध होऊन आत्मसाक्षात्कार होतो, असे श्रीदासराममहाराज सांगतात.

***

# ३९

**गुरूत्व तो गुरू गुरूत्व तो गुरू ।**
**परी हा निर्धारू कैसा व्हावा।।१।।**
**गुरूत्व पाहता कळते लघुत्व ।**
**लघुत्वे गुरूत्व प्रत्यया ये ।।२।।**
**गुरूत्वे लघुत्व लघुत्वे गुरूत्व ।**
**जेणे परतत्व स्पर्शू होये ।।३।।**
**गुरूत्वे जाणीव गुरूत्वे राणीव ।**
**गुरूत्वे बरव जाणीव नुरे ।।४।।**
**म्हणोनिया गुरू गुरूचे समान ।**
**सर्वासी समान समत्वेची ।।५।।**
**दासरामी ऐसा गुरू आकळीला ।**
**गुरूरूप झाला ब्रह्मगोळ ।।६।।**

**अर्थ -** 'सद्गुरू हे ब्रह्मस्वरूप असतात', असा परमार्थ करताना साधकाचा निश्चय होणे महत्वाचे आहे. गुरूत्वाचा म्हणजे ब्रह्मस्वरूपाचा शोध घेताना जीवीत्व (लघुत्व) म्हणजे काय, याची कल्पना येते. जीव हा ब्रह्मस्वरूपच असल्याने, साधनप्रक्रियेत





जीवाला ब्रह्मस्वरूपाचा प्रत्यय येतो. जीव ब्रह्मस्वरूपापासूनच निर्माण झाला असल्याने, जीवाच्या अंगी पुन्हा आपले मूळ ब्रह्मस्वरूप प्राप्त करून घेण्याची, त्या परमतत्त्वाला स्पर्श करण्याची क्षमता असते. ब्रह्मवस्तुमुळेच जीवाला 'मी'पणाची जाणीव होते, पुढे या 'मी' पणाच्या जाणीवेतूनच विषयाकार जाणीवेचे जणू राज्यच विस्तारले जाते. थोडक्यात म्हणजे, गुरु हे ब्रह्मस्वरूप असून, हे ब्रह्मत्व/गुरुत्व सर्वांचे ठिकाणी समत्वाने वास करीत असते. साधन केले असता गुरूकृपेने त्याचे ठायी ब्रह्मत्व प्रगट होते व ब्रह्मानंदाची शोभा तेथे विलसत राहते. अशा गुरूत्वाच्या साक्षात् आकलनाने गुरुरूप/ब्रह्मरूप होऊन राहिलेल्या दासरामाला सर्वत्र ब्रह्मरूपाचा अनुभव येतो आहे.

**विवरण -** ''जीवो ब्रह्मेव नापरः|'' जीव हा ब्रह्मस्वरूप आहे. याची अनुभूती घेताना, ज्या जीवाने ब्रह्मरूप व्हावयाचे आहे, त्या जीवाचे स्वरूप काय आहे हे पाहिले पाहिजे. त्या ब्रह्माला, 'एकोऽहं बहुस्याम् ।' - मी एकटा आहे, मी बहु व्हावे, असे स्वेच्छा स्फुरण झाले. या स्फुरणातून जीव निर्माण झाला. ब्रह्माला झालेले पहिले 'मी' चे स्फुरणच जीवाचे ठिकाणी आहे. ''**एऱ्हवी सर्वांच्या हृदयदेशीं। मी अमुका आहे ऐसी । जे बुद्धि स्फुरे अहर्निशी । ते वस्तु गा मी ।।**'' तेच ते ब्रह्म आहे. आपल्या सर्वांचे ठिकाणी 'मी' चे अखंड स्फुरण आहे. हेच ब्रह्मचैतन्याचे स्फुरण आहे. आपल्याला सतत स्वतःच्या

असण्याची जाणीव असते, कारण ब्रह्म हे सत्‌रूपाने म्हणजे असणेपणाने नित्य स्फुरत असते. आपल्या सर्व क्रियांना 'मी' जोडलेला आहे. आपल्या प्रत्येकाचे बारशामध्ये ठेवलेले विशेष नाम वेगवेगळे असले तरी आपल्या प्रत्येकाचे सामान्य नाम 'मी' मात्र एकच आहे. आपल्या सर्वांचे ठिकाणी 'मी' च्या रूपाने ब्रह्मवस्तुच स्फुरत असताना, जीव मात्र हे 'मी' चे स्फुरण देहाच्या तादात्म्याने स्विकारतो व स्वतःच्या देहालाच 'मी' समजून सर्व क्रिया करीत राहतो. व्यापक ब्रह्म (गुरूत्व) संकोचित होऊन त्याला देहतादात्म्यामुळे लघुत्व म्हणजे जीवपणा प्राप्त झाला आहे. '**संकोचोनी काय झालासे लहान। घेई आपोषण ब्रह्मांडाचे ।।**' - व्यापक ब्रह्म संकोचित होऊन देहाएवढे लहान झाले. अविद्या मायेमुळे जीवाला, ब्रह्मस्वरूपापासून/ गुरूत्वापासून घसरण होऊन, लघुत्व/लहानपणा प्राप्त झाला. जीवित्व/जीवदशा प्राप्त झाली. जीवदशेचा परिणाम म्हणून देहाहंकार/ मीपणा निर्माण झाला. या 'मी' पणापासून विषयाकार जाणीव जगत्‌रूपाने फोफावली. जीवाने निर्माण केलेला हा द्वैताकार जाणीवेचा पसारा मोठा आहे.

जीवाला पुन्हा ब्रह्मरूप व्हावयाचे असेल तर, हा द्वैताचा पसारा आवरता घेऊन उलट दिशेने प्रवास करावा लागेल. जीव हा ब्रह्मापासून निर्माण झाला असल्याने, त्याचे अंगी पुन्हा ब्रह्मरूपता प्राप्त करण्याची क्षमता आहे. हे घडण्यासाठी, प्रथम आपले सद्‌गुरू





हे सच्चिदानंद ब्रह्मस्वरूप आहेत व हे ब्रह्मस्फुरण सर्वांचे ठिकाणी सारखेपणाने स्फुरते आहे, असा दृढ निश्चय अंतरंगी असणे आवश्यक आहे. कारण सद्‌गुरूशिवाय परमार्थाला सिद्धी नाही. दुसरे म्हणजे, सद्‌गुरूंनी सांगितल्याप्रमाणे साधन अभ्यास झाला असता, सद्‌गुरूकृपेने जीव आपल्या मूळ सच्चिदानंद स्वरूपाला पोहोचतो. असे झाले असता सर्वत्र सच्चिदानंद ब्रह्मभावाचा अनुभव येत रहातो, असे श्रीदासराममहाराज स्वानुभवावरून सांगतात.

***

## ४०

**गुरूत्वाकर्षण विश्वा आकर्षण ।**
**शोधिती गहन संतजन ।।१।।**
**आकर्षे प्रकर्ष प्रकर्षे आकर्ष ।**
**याचेनी सौरस विश्व दिसे ।।२।।**
**ऐसे आकर्षण दावी संकर्षण ।**
**याचेनी भ्रमण विश्वासी या ।।३।।**
**अणू रेणू यांची खेच आकर्षण ।**
**चलन वलन याचि गुणे ।।४।।**
**श्वासोश्वासी हेचि दिसो येई सत्य ।**
**आणिक ते मिथ्य दासरामी।।५।।**

**अर्थ -** गुरूत्वाकर्षण हे ईश्वराच्या शक्तीचे एक रूप आहे. विश्व हे शक्तिस्वरूप कसे आहे, याचा शोध संतांनी/ऋषीमुनींनी घेतला आहे. स्पंदरूप शक्तीच्या आकर्ष व प्रकर्षामुळे हे विश्व दिसते आहे. आकर्षण व प्रकर्ष अशा शक्तीच्या समन्वयामुळे विश्वाचे भ्रमण चालू आहे. तसेच ह्या विश्वातील अणू/रेणू ह्यांचे परस्परातील आकर्षण ह्या गुणांमुळे, ह्या विश्वातील चलनवलन चालू आहे. मानवी देहातील





श्वासोच्छ्वासा–मध्येही याचेच प्रतिबिंब दिसून येते. श्वासामध्ये असलेल्या रजःकणांना दृश्याचे आकर्षण असते, म्हणून श्वास खाली येतो व चैतन्यरूप आत्म्याच्या आकर्षणामुळे श्वास वर जातो. श्वासाच्या वर–खाली होण्यामुळे देहाला सचेतनता प्राप्त झाली आहे. हेच केवळ सत्य असून अन्य सर्व गोष्टी मिथ्या आहेत.

**विवरण -** संतमहात्म्यांनी विश्वाचे स्वरूप, विश्वामध्ये घडणाऱ्या अनाकलनीय घडामोडी, यांचा शोध सखोल चिंतनाने घेतलेला होता. अध्यात्माप्रमाणेच आधुनिक विज्ञानानेही विश्वाच्या रहस्याचा शोध घेऊन, काही सिद्धांत मांडलेले आहेत. गुरुत्वाकर्षणाचा शोध हा अनेक वैज्ञानिक सिद्धांतापैकी एक महत्त्वाचा सिद्धांत आहे. दोन वस्तुंमधील आकर्षिल्या जाणाऱ्या प्रवृत्तीला गुरुत्वाकर्षण असे म्हणतात. पृथ्वीवरील पदार्थांचे, गुरुत्वाकर्षणाच्या नियमानुसार, पृथ्वीच्या केंद्राशी असलेले आकर्षण हा एक भाग व पृथ्वी आणि चंद्र यामधील आकर्षण हा दुसरा भाग. दोन्ही गोष्टी वेगवेगळ्या वाटत असल्या तरी, दोन्ही ठिकाणी कार्य करीत असलेली गुरुत्वाकर्षण शक्तीची आंतरक्रिया सारख्याच पद्धतीने कार्यान्वित असते. तसेच आकाशामधील ग्रह व तारे यांचे परस्परांमधील आकर्षण हाही त्या आकर्षण शक्तीचाच एक भाग आहे.

श्रीदासराममहाराजांनी या भौतिक सिद्धांताचा उलगडा अध्यात्मशास्त्रातील सिद्धांतानुसार केलेला आहे. ब्रह्मस्वरूपाच्या

स्फुरणातून/स्पंदातून हे विश्व निर्माण झाले. या चिद्तत्त्वाच्या स्फुरणातील गतीतत्त्वाला 'शक्ती' म्हणतात. भौतिक शास्त्रातील अनेक शक्तींपैकी गुरुत्वाकर्षण शक्ती 'एक' आहे. परंतु भौतिकशास्त्रातील सर्व शक्तींचे मूळ, हे मूळ स्फुरणातील चैतन्यशक्तीमध्ये आहे. पृथ्वीवरील पदार्थांचे व चंद्राचे पृथ्वीकडे असलेले आकर्षण ही 'आकर्ष क्रिया' असून पृथ्वी व सूर्य यामधील आकर्षण हा 'प्रकर्ष' होय. आकर्षण व प्रकर्ष ह्या दोन्ही पातळीवरील समन्वय हे त्या चिद्शक्तीचे कार्य आहे. चैतन्यशक्तीच्या या समन्वयामुळे/समतोलामुळे हे विश्वभ्रमण हे नियमितपणे चालू आहे.

विश्वातील कोणत्याही दोन वस्तुमानांमध्ये, दोन अणूरेणूंमध्येही हीच आकर्षणशक्ती काम करते. 'गती' हे अध्यात्माच्यादृष्टीने मूलभूत तत्त्व आहे. या चिद्गतीमुळेच सर्व पदार्थ गतीमान असून ते परस्परांना आकर्षित करतात. याचा परिणाम म्हणून विश्वामध्ये उत्पत्ती, स्थिती व नाशरुपाने हे चलन-वलन चालू आहे. माणूस हा या विश्वाचाच एक भाग आहे. त्यामुळे त्याच्या श्वसनामध्ये त्याच चिद्शक्तीचे/प्राणगतीचे प्रतिबिंब दिसून येते. या श्वसनातील प्राणगतीवर माणसाचे जीवन अवलंबून आहे.

उत्पत्ती-स्थिती-नाश रुपाने जगामध्ये सतत बदल घडत असतो. मानवी देहसुद्धा याच प्रक्रियेतून जात असतो. गतीमुळे/परिभ्रमणामुळे हे जग खरे वाटते. कोलीत फिरवले की सोन्याचे कडे





दिसते, ते गतीमुळे व ते आपण खरे मानतो. आपल्या देहातही ही गती श्वासामुळे आहे. श्वसनातील रजःकणांमुळे श्वसन खाली आले असता देहतादात्म्यामुळे जीवाला हा देह, हे विश्व खरे वाटते.

उत्पत्ती - स्थिती - नाश या प्रक्रियेमधून जाणारे हे विश्व व हा देह मिथ्या असून, हे विश्व व हा देह ज्या उत्पत्ती -स्थिती - नाश रहित, सच्चिदानंद ब्रह्मापासून उत्पन्न झाला, ते ब्रह्मच केवळ सत्य आहे, असे दासराममहाराज सांगतात.

***

## ४७

**गुरूत्वमध्य तो जीवनाचा मध्य ।**
**ताले तोले साध्य साधतसे ।।१।।**
**तेंचि एक असे जीवनी माध्यम ।**
**येर ते मध्यम दुय्यमची।।२।।**
**दुजे पाहता गौण हे एक प्रधान ।**
**जेणे संप्रदान जीवनाचे।।३।।**
**जीवना जीवन होतसे प्रदान ।**
**तेंचि ते जीवन दासरामी ।।४।।**

**अर्थ -** अभंगातील शब्दार्थाकडे पाहता, आपल्या जीवनात मध्यवर्ती स्थान असलेले सद्‌गुरू व त्यांचे महत्व त्याचे वर्णन येथे केलेले दिसून येते. पण लक्ष्यार्थाने पहाता श्वसनरूपी जीवनाची मुख्यधारा/मध्यवर्ती धारा असलेला 'प्राण' हे आत्म्याकडे जाण्याचे प्रधान माध्यम आहे. या प्राणामुळे श्वासोच्छ्‌वासाचा ताल आणि तोल यांचा समन्वय सांभाळला जातो. श्वासोच्छ्‌वासाच्या या क्रियेमुळे देहाचे धारण पोषण होते. त्यामुळे जीवाला जीवदान मिळून त्याला आत्मरूप होण्यासाठीचे माध्यम प्राप्त होते. अशातऱ्हेने या श्वासोच्छ्‌वासरूपी उपाधीतून जीवनाचा प्राणरूपी आत्मिक जीवनात लय होतो. अशा या आत्मरूप जीवनाचा लाभ या दासरामाला





झाला आहे.

**विवरण -** ह्या अभंगाच्या शब्दार्थातून, येथे सद्‌गुरू व त्यांचे महात्म्य सांगितलेले आहे, असे दिसून येते. खऱ्या साधकाच्या दृष्टीने पाहता, सद्‌गुरू हे साधकाच्या जीवनाचा केंद्रबिंदू असतो. गुरू हे ब्रह्मरूप असल्याने गुरूत्व म्हणजे ब्रह्मत्व होय. त्यामुळे साधकाच्या जीवनामध्ये गुरूत्वाला/गुरूतत्त्वाला मध्यवर्ती स्थान असते. गुरू तो देव, देव तो गुरू, हेच खरे आहे. 'एका जनार्दनी गुरू देव । एथे नाही बा संशयो ।।' असे श्रीएकनाथमहाराज म्हणतात. सद्‌गुरू हे देवरूप आहेत, ब्रह्मरूप आहेत, अशी साधकाची दृढ श्रद्धा असते. साऱ्या त्रिखंडात सद्‌गुरूहून श्रेष्ठ कोणीही नाही, असा त्याच्या अंतरी निःसंदेहपणाने दृढ निश्चय झालेला असतो. आपले जन्मदाते आई व वडिल, हे आपल्या प्रत्येकालाच पूजनीय असतात. परंतु त्याहीपेक्षा आपले मोक्षदाते सद्‌गुरू श्रेष्ठ आहेत. कारण ते साधकजीवाला संसारभयापासून मुक्त करुन त्याला आनंदपदी बसवतात. सद्‌गुरू जीवनाचा केंद्रबिंदू झाला असता, त्या साधकाची पंचपदीमधील पदामध्ये वर्णन केल्याप्रमाणे अवस्था होते. ''तूच माझी मातापिता। तूच माझी भगिनी भ्राता । तुजविणे चित्ता । नावडेचि दुसरे ।।'' या जगामध्ये सर्व गोष्टी गौण असून, केवळ सद्‌गुरूच प्रधान आहेत असा विवेक झाल्याने केवळ गुरूमूर्तीच त्याच्या हृदयात ठासून राहते.

असे झाले असता, सद्‌गुरू त्याचा प्रपंच व परमार्थ ह्यांचा समतोल साधला जाईल, याची काळजी घेतात. सद्‌गुरू त्याच्या

सर्व इच्छा पूर्ण करतात. याचा अर्थ, त्या साधकाच्या मनातील सर्व इच्छा/अपेक्षा नष्ट करून त्याला निःष्काम/इच्छारहित करतात. सर्व इच्छांची पूर्तता निःष्कामतेमध्येच आहे. अशा निःष्काम भावाने साधन झाले असता, सद्‌गुरू त्याला आत्मरूपी जीवन प्रदान करतात.

आता लक्ष्यार्थाने या अभंगाकडे पाहता, श्वसनाच्या माध्यमातून साधली जाणारी साधनप्रक्रिया दासराममहाराज येथे सांगत आहेत, असे दिसून येते. प्राणरूप सोऽहंआत्म्याच्या अधिष्ठानावर आपले श्वसन चालू असते. श्वसनधारेच्या मध्यातून ही सूक्ष्म व अदृश्य प्राणगती वहात असते. श्वसनामध्ये या प्राणगतीबरोबरच प्राणवायूही असतो. हा प्राणवायू व मध्यवर्ती प्राणधारा ह्यामध्ये अंतर आहे. प्राणवायुमुळे देहातील सर्व संस्था कार्यान्वित होतात व त्यामुळे सर्व इंद्रिये आपापली कार्ये करू लागतात व त्यामुळे देहाला धरून आपले लौकितील जीवन चालू राहते. अध्यात्माच्या दृष्टीने, श्वसनातील मुख्य प्राणगती हेच आत्मरूपजीवन साधण्याचे महत्त्वाचे माध्यम आहे. प्राणगतीच्या मुख्य साधनाव्यतिरिक्त अन्य साधने मध्यम स्वरूपाची फळ देणारी, दुय्यम साधने आहेत. अन्य साधनांपेक्षा हे साधन तात्काळ फळ देणारे आहे. साधन करून श्वसन सूक्ष्म झाले असता, श्वसनातील जडांश दूर होऊन प्राणगती ऊर्ध्वगामी होते व चिदाकाशातील प्राणमय सोऽहंगतीशी एकरूप होते. अशातऱ्हेने श्वसनातील उपाधीभूत जीवन हे सोऽहंआत्मरूपजीवनच होऊन राहते. दासरामाचे अंतरी हेच आत्मरूप जीवन स्थित आहे.

***





## ४२

**गुरूत्वमध्य तो दावी विश्वमध्य ।**
**तयाचा जो मध्य मध्यबिंदू।।१।।**
**विश्वाचा पहाता जो का मध्यबिंदू ।**
**तेथेचि हा सिंधू अथांगची।।२।।**
**बिंदूने परीघ परीघाने बिंदू ।**
**परीघात बिंदू सहजेची ।।३।।**
**बिंदूबिंदूने जो अफाट सागर ।**
**बिंदूविणे तर तेथे काय? ।।४।।**
**गुरूत्वमध्य तो जीवनाचे साध्य ।**
**साधिल्या असाध्य नोहे काही।।५।।**
**सर्व विश्वामाजी असे जे सामान्य ।**
**तेचि असामान्य दासरामी।।६।।**

**अर्थ -** विश्वाचा गुरूत्वमध्य हा 'आत्मा' आहे. बिंदूरूप आत्म्यापासून हे अथांग विश्व प्रसवले आहे. त्या अथांग विश्वामध्ये आत्म्याव्यतिरिक्त अन्य कशाचेही अस्तित्व नाही. जसे, बिंदू बिंदूने अथांग सागर तयार होतो. बिंदूच्या अस्तित्वाशिवाय सागराला वेगळेपण नाही,

तसेच वर्तुळाचा परीघ हा बिंदू बिंदूने बनतो. अवघा परीघ हा बिंदूरूपच असतो. या विश्वाचा तसेच या देहाचाही गुरुत्वमध्य केवळ आत्मा असून, या आत्म्याच्या साक्षात्काराने साध्य साधले असता, जीवाला अन्य काही साधावयाचे उरत नाही. विश्वात सामान्यत्वाने/ व्यापकत्वाने असलेला आत्मा दासरामांच्या दृष्टीने असामान्य गोष्ट आहे.

**विवरण -** विश्वाच्या बुडाशी एकच सत्‌घन, चिद्‌घन, आनंदघन तत्त्व असलेला निश्चळ ब्रह्मबिंदू आहे. या निश्चळ ब्रह्मबिंदूच्या स्फुरणामधून चंचळ सच्चिदानंद आत्मा निर्माण झाला. या चिदाकाशरुप आत्म्यापासून भूताकाश, पंचमहाभूते व पुढे सर्व भूतसृष्टी उत्पन्न झाली. म्हणून या सर्व विश्वाचा केंद्रबिंदू 'आत्मा' आहे. हा आत्मा बिंदू एवढाच आहे. परंतु या आत्मविश्वाचा केंद्रबिंदू 'आत्मा' आहे. हा आत्मा बिंदू एवढाच आहे, परंतु या आत्मबिंदूपासून प्रसवलेल्या विश्वाची व्याप्ती अनंत आहे. सूर्याभोवती जशा ग्रहमाला फिरतात, तसे हे विश्व 'आत्मबिंदू' भोवती फिरते आहे.

जसे वर्तुळाचा परीघ हा बिंदू बिंदूने बनलेला असतो. याचे कारण बिंदू-बिंदू एकत्र येऊन रेषा व या रेषेपासून भिन्न प्रकारच्या आकृत्या बनतात. म्हणून सर्व आकृत्या ह्या बिंदू बिंदूंच्या पासून बनतात. तसेच सागराला जलबिंदू व्यतिरिक्त वेगळे अस्तित्व नाही. याचप्रमाणे आत्मा हा आकाशासारखा सर्वत्र भरला आहे. आत्म चैतन्याशिवाय या जगात काहीच नाही. हे अखिल विश्व त्या





सच्चिदानंद आत्म्याचा विलास आहे. विश्वाची मूलभूत गती नादरूप आहे. म्हणून तो चंचळ आत्मा नादरूपाने सर्वत्र घुमतो आहे.

भोवतालची प्रकृती ही जड-चेतन पदार्थांचे मिश्रण आहे. त्यामुळे प्रत्येक पदार्थांचे गुणधर्म वेगवेगळे भासतात. चैतन्याचे प्रकटीकरण प्रत्येक पदार्थांमध्ये भिन्नतेने असते. म्हणून पदार्थांची चेतन/जड अशी विभागणी आपण आपल्या सोयीकरता करतो. मानवी देहामध्ये हा 'आत्मा' आपल्या अत्युच्च भावाने प्रगट झालेला आहे. असे असले तरी आत्मचैतन्य हे विश्वात समभावाने व्याप्त असते.

दुसरे असे की, विश्वाचे कारण ब्रह्म आहे. विश्व हे कार्य आहे. कारण हे कार्यामध्ये नेहमी अधिष्ठानरूपाने व्याप्त असते. म्हणून हे विश्व 'ब्रह्मरूप' आहे. तसेच विश्व प्रगट होण्याच्या भावाने हे विश्व 'आत्मरूप' आहे.

विश्वामध्ये व देहामध्ये, गुरुत्वमध्य असलेला 'आत्मा' ही एकच गोष्ट प्राप्त करुन घेण्याची आहे. तेच जीवाचे अंतिम साध्य आहे. हे साधले असता, अन्य काही साधण्याची इच्छाच संपून जाते. तो आत्मतृप्त होतो. विश्वामध्ये आकाशासारखा आत्मा सामान्यत्वाने म्हणजेच व्यापकत्वाने सर्वत्र भरलेला आहे. असा हा आत्मा दासरामांच्या करिता मात्र 'असामान्य' गोष्ट आहे.

***

## ४३

**व्यासाने परीघ परीघाने व्यास ।**

**तयाचा हव्यास जीवालागी।।१।।**

**व्यास कळलीया खरा कळे व्यास ।**

**महर्षी ते व्यास सर्वा गुरू।।२।।**

**तरी येथे त्रिज्या साधिली पाहिजे ।**

**मग हे सहजे उकलो लागे ।।३।।**

**त्रिज्या साधिताची कळती तीन रेषा ।**

**तेचि खरी रेषा आयुष्याची ।।४।।**

**मग ते जीवन येई पूर्णतेला ।**

**दासराम झाला शरणागत ।।५।।**

**अर्थ -** सर्वांचे गुरू असलेल्या महर्षी व्यासांची महती, भूमितीतील काही संकल्पनांच्या आधाराने येथे सांगितली आहे. त्रिज्या साधणे म्हणजे इडा व पिंगलामधील जीवनाचा लय होऊन सुषुम्नेची प्राप्ती होणे होय. हे साधले असता, व्यासरूपी आत्म्याची प्राप्ती होते. हाच व्यासरूपी आत्मा पुढे परीघरूपाने ब्रह्मत्वाला प्राप्त होतो. असे प्राप्त झालेले 'ब्रह्मरूप जीवन' हे परिपूर्ण असून, दासराम त्याठिकाणी शरणागत आहे.





**विवरण -** भूमितीमध्ये त्रिज्या, व्यास यासारख्या संकल्पना आहेत. तसेच ह्या संकल्पनांना धरून काही सिद्धांतही मांडलेले आहेत. दासराममहाराजांनी भूमितीमधील काही मूलभूत संकल्पना, बिंदू, त्रिज्या, व्यास, परीघ घेऊन त्यांचे स्पष्टीकरण अध्यात्माच्या परिभाषेत दिलेले आहे. तसेच पूर्ण वर्तुळ हे ३६० अंशाचे असते. वर्तुळाच्या गोलाकार भागास परीघ म्हणतात व गोलाकार पूर्ण असतो. अशा काही सिद्धांतांचा उहापोह अध्यात्मिक दृष्टिने केलेला आहे.

प्रस्तुत अभंगामध्ये प्रामुख्याने 'त्रिज्या' ह्या संकल्पनेचा विचार केला आहे. वर्तुळकेंद्रापासून परिघावरील कोणत्याही बिंदूस जोडणारी रेषा म्हणजे त्रिज्या, ही झाली भूमितीतील व्याख्या. दासराममहाराजांनी त्रिज्या हा शब्द इडा, पिंगला व सुषुम्ना ह्या तिन्हींच्या संदर्भाने योजलेला आहे. म्हणूनच येथे, '**त्रिज्या साधिताची कळती तीन रेषा ।**' असे म्हटले आहे. त्रिज्या ही साधण्याची गोष्ट आहे असे म्हणताना, इडा-पिंगला-सुषुम्नेच्या योगाने साधावयाची साधनप्रक्रिया येथे सांगितली आहे. दासराममहाराज सांगतात, नासिकेच्या ठिकाणी असलेल्या इडा-पिंगला गतीमध्ये, रामनामधारणेची रवी फिरवली की या दोन्ही नाड्यांचे एकीकरण होते व सुषुम्ना खुली होते. रवी फिरवल्याने घर्षण होऊन उष्णता उत्पन्न होते, म्हणून सुषुम्नेला 'अग्निनाडी' म्हणतात. सुषुम्नेच्या ह्या अग्नीमध्ये पंचमहाभूते व त्रिगुण ह्यांच्या जडांशाचे ज्वलन होते व केवळ आकाशरूप शुद्ध जीवन शिल्लक राहते. पुढे ही गती

आकाशतत्त्वाच्याही पलिकडे जाऊन, गुरूस्वरूप ब्रह्मस्वरूपाशी एकरूप होते.

परंतु हे होण्यासाठी जीवाला त्या आत्मस्वरूपाचा/ब्रह्मस्वरूपाचा हव्यास लागावा लागतो. असा हव्यास लागण्यासाठी अध्यात्मिक अधिकार प्राप्त व्हावा लागतो. असा अधिकार प्राप्त झाला असता, सुषुम्नेची रेषा स्पष्ट होते व आपोआपच दृश्याची रेषा अस्पष्ट होते. सुषुम्नेतील प्राणगतीची रेषा सापडणे, ही गुरुकृपा फलद्रुप झाल्याचेच लक्षण आहे. यासाठी, उलट्या वेलांटीसारखी असणारी श्वसनगती सरळ आणि ऊर्ध्वगामी होणे आवश्यक आहे. असा श्वसनगती/प्राणगतीचा ऊर्ध्वगामी सरळ कोन, आत्मरूपाचा अनुभव प्राप्त करून देतो. भूमितीमध्येही वर्तुळाच्या मध्यबिंदूपासून परीघापर्यंतची त्रिज्या रेषा ही सरळ कोन करून 'व्यास' बनते. व्यास हे आत्मरूपतेचे प्रतिक आहे. आत्मा हा पूर्णच असतो. म्हणून आत्मरूपता प्राप्त झाली असता अवघे जीवन परिपूर्ण होते, म्हणजेच तो आत्मतृप्त होतो.

महर्षी व्यास ही आत्मरूप होते. म्हणूनच त्यांचे जीवन परिपूर्ण होते. सर्वांचे गुरू असलेने व परिपूर्ण आत्मरूप असलेल्या अशा महर्षी व्यासांचे चरणी दासराम शरणागत आहे.

***





## ४४

**गुरू दावी गोल गोल दावी गुरू ।**
**तोची कल्पतरू पूर्णकाम।।१।।**
**वर्तुळात त्रिज्या त्रिज्येने वर्तुळ ।**
**जेणे ब्रह्मगोल साधतसे ।।२।।**
**परी ऐसी त्रिज्या कैसी विस्तारली ।**
**बिंदूनेच झाली सत्य पहा।।३।।**
**ऐसी हे भूमिती जाणोनिया घ्यावी ।**
**तरीच पावावी मुक्त दशा।।४।।**
**भू आणि मनाची जेणे होय मिती ।**
**तयाचिये मिती कोण करी ।।५।।**
**ब्रह्म पूर्ण जेणे आनंद भू मन ।**
**तेचि ते उन्मन दासरामी ।।६।।**

**अर्थ -** जे गोल असते ते पूर्ण असते व आत्मा हा पूर्ण आहे. कल्पतरू असलेले सद्गुरू, अशा पूर्ण आत्म्याच्या दर्शनाची खूण दाखवतात. यासाठी येथे भूमितीमधील संकल्पनांचा दृष्टांत दिलेला आहे. वर्तुळाला मध्यबिंदू असतो. या बिंदूपासून त्रिज्येचा विस्तार

होतो व पुढे व्यास व परिघरुपाने वर्तुळ पूर्ण होते. येथेही साधनप्रक्रियेमध्येही सुषुम्नारुपी त्रिज्येच्या सहाय्याने, आत्मरूपी व्यास व पुढे परीघरूपी ब्रह्मस्वरूपाची प्राप्ती होते. 'भू' भूत, म्हणजे झालेले हे विश्व. या विश्वरूपाशी एकरूप झालेले मन हे 'उन्मन' झालेले असते. अशा उन्मनी अवस्थेमधून प्राप्त झालेल्या पूर्णब्रह्मस्वरूपाचा आनंद दासराम भोगतो आहे.

**विवरण -** मागील अभंगातील भूमितीमधील संकल्पनेचा विषय येथे विस्ताराने सांगितला आहे. ''ॐ पूर्णमदः पूर्णमिदं'' हा ईशावास्य उपनिषदातील श्लोक प्रसिद्ध आहे. ब्रह्मवस्तु खंडित नाही, ती अपूर्ण नाही. ती अनंत आहे. पूर्ण आहे. अनंत ब्रह्मांडे ही त्याचीच निर्मिती असल्याने, तीही पूर्णच आहेत. आत्मवस्तु परिपूर्ण आहे व परिपूर्ण वस्तू गोलच असते. गोलाकार हा पूर्णता दर्शवितो. 'देवाची ती खूण करावे वाटोळे' येथे 'वाटोळे' याचा अर्थ 'परिपूर्ण'. विश्व हे शून्यातून/शून्यबिंदूतून/ब्रह्मबिंदूतून निर्माण झाले म्हणून ते 'वाटोळे' आहे. या शून्यबिंदूला लांबी/रूंदी/जाडी/स्थिती नाही. म्हणजेच ते निराकार आहे. त्याला आरंभ व शेवट नाही, म्हणून ते अनंत आहे. यात काही मिसळा, वजा करा तरीही ते शून्यच , पूर्णच राहते. दृश्यामध्येही गोलाकाराचे महत्व दिसते. ब्रह्मांड गोल, हवेतील लहरी गोल, पाण्याच्या लहरी गोल. जीवही आपल्यातील अपूर्णत्व/जीववृत्ती लोपली असता, पूर्णत्वाने विकसित होतो, ब्रह्मरूप होतो. पण हे होण्यासाठी कल्पतरू असलेल्या सद्गुरूंची गाठ पडणे आवश्यक





आहे. हे सद्गुरू शिष्याला पूर्णकाम म्हणजे निःष्कामच करून, पूर्ण ब्रह्माची खूण दाखवितात. वर्तुळामधील त्रिज्या, व्यास, परीघ इ.ची निर्मिती वर्तुळाच्या केंद्रबिंदूमधून होते. येथेही सारे विश्व गतीमान असले तरी, त्याचा केंद्रबिंदू एकच आहे. तो स्थिर, निश्चळ, ब्रह्मबिंदू होय. या बिंदूपासून विस्तारीत जाणाऱ्या सगुण विश्वाचा विस्तार पुन्हा या निर्गुण निश्चळ केंद्रबिंदूत सामावून जातो. त्रिज्येच्या म्हणजेच सुषुम्नेतील प्राणगतीच्या सहाय्याने, व्यासरुपी परिपूर्ण आत्म्याची प्राप्ती होते व हा आत्मस्वरूपी व्यास व परीघरूपाने पूर्णब्रह्म होऊन राहतो. ब्रह्म हे अत्यंत व्यापक असते व जे अत्यंत व्यापक असते ते अत्यंत सूक्ष्म असते. म्हणजेच तो जीव अखेर निर्गुण/निश्चळ परब्रह्माशी एकरूपच होऊन जातो.

अशी ही भूमिती जाणून घेणे महत्वाचे आहे. भूमिती जाणून घेणे म्हणजे भूमिती साधणे होय. येथे भूमिती, या शब्दाला भू-मिती यातील भू म्हणजे झालेले व मिती म्हणजे मोजमाप/प्रमाण. झालेल्या या विश्वाचे प्रमाण म्हणजे पंचज्ञानेंद्रियांमार्फत झालेले ज्ञान होय. विश्वातील विश्वमनाशी जीव एकरूप झाला असता मनाचे उन्मन होते व खरी भूमिती जाणली जाते. अशी उन्मनी साधण्याने प्राप्त होणाऱ्या पूर्णस्वरुपाचा आनंद दासराममहाराज निरंतर भोगत आहेत.

***

## ४५

**पौर्णिमा ते व्यास व्यास ते पौर्णिमा।**
**म्हणोनी पौर्णिमा व्यासांचिये।।१।।**
**ज्यास कळला व्यास, व्यास कळे त्यास ।**
**तया जीवनास पूर्णता ये।।२।।**
**व्यास तेथे ज्ञान, ज्ञान तेथे व्यास ।**
**न जाणे तयास अज्ञानची ।।३।।**
**व्यासाची पौर्णिमा उमगोनी घ्यावी ।**
**तरीच पदवी परमार्थी ।।४।।**
**ऐसी हे पदवी जेणे संपादिली ।**
**दासराम धूळी तयांचिये ।।५।।**

**अर्थ -** पौर्णिमेचा चंद्र हा पूर्ण असतो. तसेच भूमितीमध्येही व्यासाने वर्तुळ पूर्ण होते. व्यासरूपी आत्मा ज्यास कळला, त्याच्या जीवनाला पूर्णता प्राप्त होते. आत्मा हा 'ज्ञानरूप' असतो. महर्षी व्यासही आत्मरूप/ज्ञानरूप आहेत. म्हणून व्यासपौर्णिमेचा खरा अर्थ उमगला असता, परमार्थामध्ये 'पदवी' प्राप्त होते. अशी पदवी ज्याने प्राप्त करून घेतली असेल, त्यांची पायधूळ दासराम आपले माथी धारण करीत आहे.





**विवरण -** अमावस्येपासून पौर्णिमेपर्यंत चंद्राची कला हळू हळू वाढत जाते. आकारमानाने वाढत जाऊन प्रकाशित होत जाणाऱ्या चंद्रकोरीना चंद्राच्या कला म्हणतात. चंद्र जेंव्हा सूर्यापासून पृथ्वीच्या बरोबर विरुद्ध बाजूस असतो, तेव्हा दिसणाऱ्या चंद्राच्या कलेस पौर्णिमा म्हणतात. पौर्णिमा महिन्यातून एकदा येते. चंद्र सूर्याशी सरळ रेषेत असल्याने, १०० टक्के प्रकाश परावर्तित करतो. त्यावेळच्या पूर्णचंद्राला पौर्णिमा म्हणतात. आषाढ महिन्याच्या पौर्णिमेला ''व्यास पौर्णिमा'' म्हणतात. याच दिवशी वेदव्यासांचा जन्म झाला, अशी धार्मिक श्रद्धा आहे, म्हणून याला गुरुपौर्णिमेबरोबरच 'व्यास पौर्णिमा' असेही म्हटले जाते. असे मानले जाते की, चारही वेदांचे ज्ञान, प्रथम वेदव्यासांनी दिले, म्हणून महर्षी व्यासांना 'प्रथम गुरू' अशी पदवी देण्यात आली आहे. भारतीय संस्कृतीमध्ये, अध्यात्मिक जीवन जगताना, गुरूंना अनन्यसाधारण महत्व दिलेले आहे. प्रत्येकाच्या साधक जीवनामध्ये गुरूंचे विशेष महत्व आहे. आपल्या परंपरेमध्ये सद्‌गुरूंना देवापेक्षा श्रेष्ठ मानले आहे. अज्ञानाच्या अंधःकारातून ज्ञानाच्या प्रकाशाकडे घेऊन जाणारा तो गुरू होय. पौर्णिमेचा चंद्र हा पूर्णत्व दर्शवितो. तसेच महर्षी व्यास देखील आत्मरूप/ब्रह्मरूप होऊन जीवनाच्या पूर्णत्वाला पोहोचलेले आहेत. म्हणून ही आषाढामधील पौर्णिमेला, 'व्यास पौर्णिमा' हे संबोधन यथार्थ आहे.

आत्मा हा पूर्ण आहे. आत्मा हा ज्ञानरूप आहे, म्हणजे तो ज्ञानाने परिपूर्ण आहे. आपल्याला एखाद्या वस्तूचे ज्ञान होते. म्हणजेच

ती वस्तु जाणवते, तेव्हा ते वृत्ती ज्ञान असते. जीवाला वृत्तीज्ञान होण्यासाठी ज्ञानरूप आत्म्याची आवश्यकता आहे. ज्ञानरुपता ही वृत्तीज्ञाननिरपेक्ष आहे. ते ज्ञेय निरपेक्षज्ञान असते. जोपर्यंत ज्ञानरूप आत्म्याचा अपरोक्ष अनुभव येत नाही, तोवर सर्व वृत्तीज्ञान हे अज्ञानातच मोडते. ज्ञानरूप आत्म्याचा अनुभव, जीवनाला पूर्णता प्रदान करणारा असतो.

परमार्थात, 'पदी बैसोनि पदवी घेईजे |' त्या पदावर म्हणजेच आत्मपदावर आरूढ झाले असता, ती पदवी आपोआपच प्राप्त होते. 'पदवी' हा शब्द योग्यता, अधिकार तसेच अवस्था दर्शवितो. सर्व संत, सज्जन, भगवद्भक्त हे ब्रह्मपदी विराजमान झालेले असतात. महर्षी व्यासांनी अशी पदवी प्राप्त करून घेतलेली होती. म्हणून दासराममहाराज अशा थोर विभूतीच्या चरणांची धूळ आपल्या मस्तकी धारण करतात.

***





## ४६

**ज्यास कळे व्यास विरे पंचत्वास ।**

**दास म्हणती त्यास संतजन।।१।।**

**ऐशीया दासांचा दास करी देवा ।**

**आशिर्वाद द्यावा हाचि मज।।२।।**

**दास होता होय गुरूचे पूजन ।**

**दासरामा खूण गवसली ।।३।।**

**अर्थ -** ज्यास हा व्यास (आत्मा/ब्रह्म) कळतो, त्याचे ज्ञान होते, त्याचे ठिकाणी पंचमहाभूतरूपी उपाधींचा लय झालेला असतो. संत महात्मे अशा विभूतींना 'दास' ही पदवी देतात. अशी 'दास' ही पदवी प्राप्त झाली असता, खरे 'गुरूपूजन' होते. अशी गुरूपूजनाची परमार्थातील नेमकी खूण मजला गवसली असून, अशा दासांचाही दास होण्याचा आशीर्वाद प्राप्त व्हावा, अशी प्रार्थना दासराममहाराज करतात.

**विवरण -** निःश्चळ, निर्गुण परब्रह्माच्या, त्या सत्-तत्त्वाच्या स्फुरणातून जीव निर्माण झाला. त्या निःश्चळ चिद्तत्त्वाचा विलास म्हणजे हे विश्व आहे. त्रिगुण व पंचमहाभूताचे आवरण घेऊन, प्रगट

झालेले विश्व हे जीवासाठी कोडेच होऊन राहिले आहे. जीवाला हे दृश्य जड आणि चंचळत्वाने भासते, पण ह्या दृश्याचे अधिष्ठान असलेला, लपून राहिलेला, निःश्चळ व चैतन्यरूप आत्मा मात्र अनुभवास येत नाही. जीवाला ब्रह्माच्या/परमात्म्याच्या अंगीभूत असलेली सृष्टी ही उपाधी बनली आहे. या नामरूपात्मक सृष्टीचा निरास झाल्याशिवाय, आतील अधिष्ठानरूप चैतन्याचा अनुभव जीवाला येत नाही. हे सर्व सद्गुरूंच्या कृपेशिवाय होणे शक्य नाही. सद्गुरूंनी सांगितलेले साधन निष्ठेने केले असता अंतःकरण शुद्ध होते, असे शुद्ध अंतःकरण एकाग्र होते. अशा एकाग्र चित्ताने केलेल्या ध्यान-साधनाने प्रथम जड उपाधीरूप दृश्याचा निरास होतो. निरास होतो याचा अर्थ जड व नाशवंत देहाचे मिथ्यत्व बुद्धित ठसते व अज्ञानाचे आवरण दूर होऊन आत्मज्ञानाची प्राप्ती होते. ''**उपाधिमाजी गुप्त । चैतन्य जे सर्वगत। ते तत्त्वज्ञ संत । स्विकारती ।।**'' असे झाले असता पंचमहाभौतिक उपाधींचा निरास होऊन, त्यामधील गुप्त चैतन्याचा अनुभव येतो. या ज्ञानोत्तर अवस्थेमध्ये बाहेरील सृष्टी चैतन्यमय दिसते. तसेच या सृष्टीतील प्राणीमात्रांमध्येसुद्धा ''**जे जे भेटे भूत । ते ते मानीजे भगवंत ।।**'' असा अनुभव त्या ज्ञानी भक्ताला येऊ लागतो.

अशा ज्ञानी भक्तालाच 'दास' ही पदवी प्राप्त होते. सर्वोत्तम दास कसा असतो, याचे वर्णन समर्थांनी 'मनोबोधा'मध्ये केलेले आहे. ज्याच्या आत बाहेर समरूप भरून गेलेले असते, ज्याला सर्वत्र





रामच दिसतो, त्याला ज्ञानीही म्हणावे व भक्तही म्हणावे. समर्थांचा दास हा 'जाणता' आहे. त्याचे ठिकाणी ज्ञान व भक्ती एकरूप झालेले असते. पूर्ण ज्ञानी असूनही ज्याचे ठिकाणी सगुणाचे प्रेम आहे, तो सर्वोत्तम दास होय असे समर्थ सांगतात.

निष्ठापूर्वक समर्पणाने दास्यभक्ती सिद्ध होते. 'नराचा नारायण' बनविणारी ही दास्यभक्ती आहे. सेवाभावातून ज्ञान व ज्ञानातून भक्तीचा जन्म होतो. दास जसजसा सेवाप्रवण होतो, तसतसा ईश्वर/गुरू हे चराचरात व्यापून आहेत, अशी प्रचीति त्याला येत राहते. असे असले तरी ज्ञानोत्तर भक्ती करणारा सेवक आपला सेवाभाव विसरत नाही. 'तू देव व मी भक्त' असाच भाव निरंतर राहू दे, अशी प्रार्थना भक्त करीत राहतो.

ज्ञान होण्याआधी सेवाभाव व ज्ञानोत्तरही सेवाभाव कायम राहणे ही अत्युच्च अवस्था होय. श्रीमामामहाराज केळकर म्हणतात, '**आणिक कांही दास न मागे । इच्छा मनी नसो दे ।।**' माझ्या मनी कोणतीही इच्छा नसावी व केवळ अखंडितपणे चरणसेवा घडावी अशी प्रार्थना, श्रीमामामहाराज करतात. अशा तऱ्हेने जाणता भक्त / दास होऊन राहणे, हीच खरी गुरूपूजनाची वर्माची खूण आहे, असे दासराममहाराज सांगतात.

***

## ४७

**सद्‌गुरूसमान नाही कोणी जगी ।**
**व्यासरूप अंगी सदा असे।।१।।**
**तोचि एक व्यास जया नाही नाश ।**
**दिक् काल आकाश जयाचेनी।।२।।**
**जयाचेनि देव दानव मानव ।**
**ऐसा तो सदैव ओळखावा ।।३।।**
**ज्यास कळे व्यास सर्व कळे त्यास ।**
**सर्व तोचि व्यास व्यास सर्व।।४।।**
**ऐशा व्यासालागी सदाची नमन ।**
**तेणे समाधान दासरामा ।।५।।**

**अर्थ -** चैतन्याच्या अंगाने आत्मरूप असलेल्या सद्‌गुरूसमान, या जगात अन्य कोणीही नाही. अविनाशी सत् आत्म्यापासून, दिक् काल व आकाश झाले. तसेच देव, दानव व मानव ह्यांची उत्पतीही त्याच सच्चिदानंद आत्मरूपापासून/ब्रह्मापासून झाली. अशा व्यासरूपी आत्म्याचे ज्ञान झाले असता, सर्वत्र तोच ब्रह्मरूप आत्मा व्यापून उरला आहे, अशी प्रचीति येते. अशा ज्ञानरूप/





आत्मरूप महर्षी व्यासांना नमन केल्याने दासरामाला समाधान प्राप्त झाले आहे.

**विवरण -** ब्रह्मवस्तु सत्‌घन, चिद्‌घन व आनंदघन आहे. या सत्‌वस्तुला नाश नाही, ती अमर आहे. ती अनादि असल्याने, ती अखंड व अभेदत्वाने आहे. याउलट, मर्यादित व खंडित असा देह व भोवतालचे विश्व नाशवंत आहे. देहधारण करुनही आत्मरूप झालेले सद्‌गुरू मात्र जीवनमुक्त होऊन राहिलेले असतात.

सत्‌घन, चिद्‌घन, आत्मवस्तुमधील चिद्‌चे/ चैतन्याचे स्फुरणातून चिदाकाश निर्माण झाले. चिदाकाशामध्ये ब्रह्मच सोऽहंआत्मरूपाने स्फुरू लागते. सोऽहंस्फुरण गतीचे अवकाश म्हणजेच चिदाकाश होय. म्हणूनच ''आकाशात आत्मा, आत्म्यात आकाश'' असे गुलाबरावमहाराज म्हणतात. या आत्म्यापासूनच पुढे दिक्‌काल व आकाश निर्माण झाले. याचाच अर्थ आत्मा हा दिक्‌कालातीत आहे.

विज्ञानाच्या दृष्टिने दिक् व काल ह्या परस्पर सापेक्ष संकल्पना आहेत. काळाबरोबरच स्पेस निर्माण होते. ते दोघे एकमेकांशी निगडीत आहेत. अध्यात्मात चिदाकाशापासून विश्व निर्मितीच्या प्रक्रियेतील गतीमुळे, आत्म्यापासून आकाश (भूताकाश) व दिक्/काळ यांची निर्मिती झाली. भूताकाशापासून पुढे पंचमहाभूतांनी बनलेले त्रिगुणात्मक विश्व निर्माण झाले. दुसऱ्या बाजूने अष्टधा प्रकृतीच्या

देह उपाधींसह देव, दानव व मानव हे जीवरूपाने उत्पन्न झाले. आत्मा सच्चिदानंद आहे याचा अर्थ सत्‌रूप, चित्‌रूप व आनंदरूप हे वेगवेगळे नाहीत. जे सत् आहे, तेच चिद् आहे व जेथे सत् चिद् आहे, तेथे आनंद असतोच. चिद् म्हणजे ज्ञान. आपल्या जीवभावावर राहून प्राप्त केलेल्या ज्ञानामध्ये भेसळ आहे. त्यामुळे ते विपरित ज्ञान आहे. ज्ञानरूप आत्म्यामध्ये कोणतीच भेसळ नाही. ते निर्भेळ ज्ञान आहे. एकदा हे निर्भेळ ज्ञान जाणले असता, अन्य कांही जाणावयाचे शिल्लक रहात नाही. बाहेरील ज्ञानाची वखवख संपते. याकरिता ऊर्ध्वगामी सुषुम्नाकार मार्गाने गेले असता, चिदाकाशातील सोऽहंआत्मा लक्ष्य होणार आहे. जीवाला जी अवस्था प्राप्त होते त्यानुसार त्याला जगाचे भान/ज्ञान असते. देहभावावरील अवस्थेत रात्र व दिवसाची, स्थळाची, रसरशीत जाणीव असते. चिदाकाशरूप आत्मस्थिती ही स्थळकाळ व आकाशरहित स्थिती असून तेथे केवळ ज्ञानरूपता आहे.

सद्‌गुरू हे आत्मरूप असून सर्वश्रेष्ठ आहेत. महर्षी व्यास हे आत्मरूप महात्मे असून, त्यांचे सम अन्य कोणीही नाही. अशा व्यासांना नित्य नमन केल्याने दासरामाला पूर्ण समाधान प्राप्त झाले आहे.

✻✻✻





## ४८

**गुरू ध्येय ध्यान गुरू संध्या स्नान । त्याचे अनुसंधान तेची भक्ती।।१।।**

**तेथे अविनाश जोडिले जयाने । तया काय उणे जगामाजी।।२।।**

**गुरू थोर सान सुखाचे निधान । संत करिती गान सद्‌गुरूंचे।।३।।**

**गुरू कृपा करी तया कोण मारी । गुरू जै संहारी कोण राखी ।।४।।**

**गुरू हाचि देव संत महानुभाव । तयापायी भाव दासरामी।।५।।**

**अर्थ -** स्नानसंध्यादि नित्य नैमित्तिक कर्मे निःष्काम बुद्धिने करणे तसेच ध्येय ध्यान रुपाने सद्‌गुरूंची उपासना करणे, हीच अनुसंधानात्मक भक्ती होय. अशा सद्‌गुरूभक्तीने, त्या अविनाशी ब्रह्माची प्राप्ती होते. ब्रह्मप्राप्तीनंतर जगामध्ये अन्य मिळविण्यासारखे काही रहात नाही. अत्यंत सूक्ष्म, म्हणूनच अत्यंत व्यापक असलेल्या ब्रह्माचे ठिकाणी सर्वसुखाचा/आनंदाचा ठेवा आहे. ब्रह्मरूप असलेल्या सद्‌गुरूंचे संतमहात्मेही स्तवन करीत असतात. सद्‌गुरूकृपा झाली असता, निर्भयता प्राप्त होते. परंतु त्यांच्या अवकृपेने विनाश अटळ असतो. संत, महंत, सिद्ध ही सर्व सद्‌गुरूंचीच रुपे आहेत. गुरु हे साक्षात् देवस्वरूप असतात. अशा सद्‌गुरूं पायी माझा शुद्धभाव वसतो आहे, असे दासराममहाराज सांगतात.

**विवरण -** गुरू व परब्रह्म वेगळे नाही. सद्‌गुरू हे चालते बोलते सगुण ब्रह्म आहे. साधक भक्तासाठी निर्गुण ब्रह्मच सगुणरुपाने/

ईश्वररुपाने सद्गुरूरुपात अवतरले. म्हणून गुरू हे देवांचेही देव आहेत. यासाठीच गुरू उपासना व ईश्वर उपासना ह्यात भेद नाही. व्यवहारात संध्या, स्नान, इ कर्मे सद्गरूंच्या स्मरणात करणे, प्रत्येक कृती त्यांना सांगून करणे, '**जेथे जातो तेथे तू माझा सांगाती । चालविसी हाती धरोनिया ।।**' याप्रमाणे त्यांच्या सानिध्यभावाने, व्यवहारातील कर्मे करीत राहिल्याने, सद्गुरूंचे अनुसंधान आपोआप राहते. अंतरंग साधनेमध्ये सद्गुरू हेच ध्येय प्राप्तव्य मानून ध्यान करणे, सद्गुरूंचे ठिकाणी प्रेमवृत्ती वळविणे, हे अंतरिक अनुसंधानाचे साधन आहे.

ब्रह्म सुखरूप आहे, आनंदरूप आहे. म्हणून सद्गुरूही सुखरूप व ब्रह्मानंदरूप आहेत. ते स्वतः सुखरूप असल्याने शिष्याला परमसुख देतात. स्वतः ज्ञानरूप असल्याने शिष्याला ज्ञान प्रदान करतात. आकाशाप्रमाणे ब्रह्म हे अत्यंत व्यापक, म्हणूनच अत्यंत सूक्ष्मरुपाने असते. सद्गुरूही ब्रह्माप्रमाणेच विश्वव्यापकत्वाने असतात, तेच सद्गुरू शिष्याच्या हृदयाकाशात सूक्ष्मपणाने वास करीत असतात. अशा या गुरूंचे स्तवन, श्रुति/वेद तसेच सर्व संतमहात्म्यांनी केलेले आहे.

या सद्गुरूंच्या कृपेशिवाय ब्रह्मसाक्षात्कार होणे शक्य नाही. गुरूवचनांची अक्षरे अनुभवाशिवाय असत नाहीत. म्हणूनच ते शिष्याला ब्रह्मप्राप्तीचा मार्ग सांगून, त्या सत्स्वरूपाचा साक्षात्कार घडवून आणतात. हा साक्षात्कार अनाहत नादरूपाने तसेच अंतर





आकाशात अनेक रंगांच्या/ प्रकाशाच्या अनुभवाने होतो. विविध ताप नष्ट होऊन त्यांच्याच कृपेने संसारभय नाहिसे होते. याकरिता सद्गुरू प्रसन्न असणे महत्वाचे आहे. त्यांच्या कृपेने निर्भयता प्राप्त होते. अन्यथा आपली धडगत राहणार नाही.

प्रेमाची पराकाष्ठा म्हणजे भक्ती होय. व्यवहारातील प्रेम हे सापेक्ष व स्वार्थी असते. सद्गुरूभक्ती निरपेक्ष व शुद्ध असते. गुरूभक्तीने ब्रह्मसाक्षात्कार आपोआप होतो. अन्य साधनांची आवश्यकता लागत नाही. सत् व अविनाशी ब्रह्मरूपतेने, ह्या विश्वातील विनाशी व मर्यादित सुख देणाऱ्या गोष्टींचे आकर्षण संपून जाते. मिळविण्यासारखे अन्य काही रहात नाही. पूर्ण समाधान प्राप्त होते.

संत, महानुभाव, वैष्णव, हरिदास हे सर्व सद्गुरूंचेच विविध रुपाने आविष्कार असतात. अशा सर्वांचे ठिकाणी दासराम प्रेमभावाने लीन आहे.

***

## ४९

**गुरूलागी जेणे लावियेला गुणा ।**
**तया काय खुणा प्राप्त होती।।१।।**
**सदा अंगी क्रिया दावितसे गुरू ।**
**तोचि परात्परू महाराजा।।२।।**
**तेंचि क्रिया ज्याची आपुली जहाली ।**
**ज्योती झळकली परब्रह्मी।।३।।**
**मंडलाकार हे जेणे चराचर ।**
**अखंड परपार तोचि गुरू।।४।।**
**दासरामालागी हा गुरू पावला ।**
**तयाच्या हाकेला सदा धावे।।५।।**

**अर्थ -** परात्पर हे ब्रह्मस्वरूपाला उद्देशून म्हटले जाते. सद्‌गुरू हेही परात्परस्वरूपाने असतात. अशा गुरूमहाराजांची भक्ती जेव्हा पटीपटीने वाढत जाते, तेव्हा गुरुकृपा होते. या कृपेची खूण म्हणजे, सद्‌गुरू त्या शिष्याला सत्क्रिया आचरणाची प्रक्रिया समजावून सांगतात व ती क्रिया स्वतः करुन दाखवितात. ती सत्क्रिया शिष्याच्या ठिकाणी उमटणे, ही गुरूकृपेची खरी खूण होय. असे झाले असता, सोऽहंज्योती प्रकाशमान होऊन त्याला परब्रह्माची





प्राप्ती होते. त्यामुळे शिष्याच्या ठिकाणी, आपले सद्‌गुरू हे परब्रह्माप्रमाणे, ब्रह्मांडातील चराचरामध्ये व त्याही पलिकडे, व्यापून राहिलेले आहेत, असा अनुभव येतो. आपल्या हाकेला धावून येणाऱ्या, सर्वव्याप्त सद्‌गुरुंची प्राप्ती आपल्याला झालेली आहे, असे दासराममहाराज सांगतात.

**विवरण -** ब्रह्म हे परात्पर आहे. ब्रह्माच्या ज्या भागावर विश्व भासमान होते, त्या ब्रह्माला अपराब्रह्म/सगुणब्रह्म म्हणतात. या विश्वाच्या/अपराब्रह्माच्या सर्वोपरी जे आहे, ते परात्पर ब्रह्म होय. परात्परब्रह्म हे सर्वश्रेष्ठ/सर्वोपरी व सर्वकाही असण्याच्या पलिकडे अनंतरूपाने आहे. सद्‌गुरू हे परात्पर ब्रह्मरूपाने आहेत. अशा सद्‌गुरूंची भक्ती अनन्यभावाने, निष्ठेने व एकविध होऊन केली जाते. सद्‌गुरूभक्ती जेव्हा क्रमाक्रमाने व पटीपटीने वाढत जाते, तेव्हा, सद्‌गुरू प्रसन्न होऊन कृपा करतात. सद्‌गुरूंची कृपा झाल्याचा संकेत म्हणजे प्रथम ते आपल्या सत्‌शिष्याला सत्क्रियेचे साधन समजावून सांगतात आणि त्याहीपुढे, ती सत्क्रिया स्वतः करुन दाखवितात. सद्‌गुरूंच्या कृपेची ही खूण प्राप्त होणे, ही त्या सत्‌शिष्याच्या परमभाग्याची गोष्ट असते.

'जीव हा ब्रह्मरूप आहे' हे सद्‌गुरूवचन बुद्धिमध्ये ठसणे महत्वाचे आहे. जीव, ब्रह्म ह्यांचे ऐक्य होण्यासाठी कराव्या लागणाऱ्या साधनाचे आचरणाला, सत्क्रियेचे आचरण म्हणतात. आपले जीवभावावरील/देहभावावरील जीवन हे सत्‌वस्तुच्या अस्तित्वामुळे

आहे. त्या सत्स्वरूपाला दाखविणारी सत्क्रिया साधणे, ही साधनातील वर्माची खूण आहे.

'**चारी वाचा कुंठित झाली । सोऽहं ज्योती प्रकाशली॥**' (**संत जनाबाई**). साधन अभ्यासाने चारी वाचेचा लय होणे, कुंठित होणे, हेच सत्क्रियेचे आचरण होय. जरी आपल्या डोळ्याला दिसत नसले तरी, वाणी हे एक कर्मेंद्रिय आहे. चार वाचा/ वाणींपैकी वैखरी म्हणजे ज्याचा आपण उच्चार करतो, मध्यमा म्हणजे तोंड न उघडता जी गुणगुणली जाते, पश्यंती म्हणजे मनातल्या मनात स्मरणरूपाने असते आणि परावाचा ही नाभीस्थानी स्थित, निर्विकल्प, आठवरूप व श्वासाचे पहिले स्फुरणरूपाने असते. वाणी जप साधनेने, या चारी वाणी सूक्ष्म व शुद्ध होतात. वैखरी व मध्यमा या बहिर्मुख वृत्तींचा आणि पश्यंती व परा ह्या अंतर्मुख वृत्तींचा लय होतो. अखेरीस, चारी वाचेचे मूळ असलेली अनिर्वाच्य वाचा म्हणजेच प्रकाशरूपीणी सोऽहंज्योतीचा अनुभव येतो. सोऽहंज्योती हे परब्रह्माचेच स्फुरण आहे. ती परब्रह्माचाच अनुभव आहे. म्हणून जनाबाई म्हणतात, '**ज्योत परब्रह्मी जाणा । जनी म्हणे निरंजना॥**'.

सद्गुरू हे परब्रह्माप्रमाणे चराचरामध्ये व्याप्त असून, ह्या विश्वाच्याही पलिकडे अनंत, अखंडत्वाने व्यापून उरलेले आहेत. 'असे सद्गुरू फळाला आल्याने, ते माझ्या प्रत्येक हाकेला प्रतिसाद देतात' असा श्रीदासराममहाराज आपला स्वानुभव सांगतात.

***





## ५०

**गुरू एक ग्रह ऐसा ज्याचा ग्रह । तया अनुग्रह काय करी ॥१॥**
**गुरू निःसंदेह तेथे हा संदेह । मग पापग्रह उफाळती ॥२॥**
**गुरू हा पाहता न धरी आग्रह । करी तो विग्रह समासाचा ॥३॥**
**ज्याची कुंडलीनी जागृतींसी आली । तयाची फिरली कुंडली हे॥४॥**
**कुंडलीनी जरी घेईल विश्रांती । स्थापकता स्थिती राहीचना ॥५॥**
**कुंडलीनी जेथे राहिली जागृत । तेंथे जो जागृत जागृतीते ॥६॥**
**गुरू हा तो करी सहजे निग्रह । तेथे निःसंदेह जीव होय ॥७॥**
**संदेह तो गेला मंदेह वारिला । अर्घ्य समयाला गुरूपदी ॥८॥**
**निर्विकल्प होये ऐसी फलश्रुती । ऐसी बोले श्रुती गुरूगीता ॥९॥**
**देव तरी भेटे जनी आणि वनी । ऐसी बोले वाणी तुकयाची॥१०॥**
**परी ते घडावे सद्गुरूभजन । तुकोबा हे खूण बोधिताती ॥११॥**
**पवनात्मज तो सोऽहंरूप गुरू । माथा कृपाकरू ठेवियेला ॥१२॥**
**चित्ताचिया समता समत्वे प्रसाद । अंतरी आनंद केला जेणे ॥१३॥**
**गुरूपाठ करी गुरूपाठ करी । गुरूलिंग वरी कृपाछत्र॥१४॥**
**गुरूपदी ऐसी प्रेम सुमनांजली । प्रेमे समर्पिली दासरामे॥१५॥**

**अर्थ -** गुरू हा आपल्याप्रमाणेच एक देहधारी माणूस आहे अशी ज्याची समजूत असते, कल्पना असते, अशा माणसाला सद्गुरूंनी दिलेल्या अनुग्रहाचा काय उपयोग होणार बरे? गुरू हा निःसंदेहपणे ब्रह्मरूप असतानाही, एकदा का त्यांचे गुरुत्वाविषयी मनामध्ये

संदेह उठला की, पुढे अशाप्रकारच्या अनेक पापी विचारांचे काहूर माजते. अशावेळी, पश्चात्तापबुद्धिने सद्गुरूंना शरण गेले असता, ते सद्गुरू कृपाळूपणाने त्या शिष्याच्या संशयबुद्धिचा निरास करून, त्याच्या संदेहाची पूर्णपणे निवृत्ती करतात.

अशातऱ्हेने सद्गुरूठायी निःसंदेह होऊन साधन केले असता, कुंडलिनी म्हणजेच प्राणशक्ती जागृत होते. त्याचा परिणाम म्हणून, साधकाच्या कुंडलितील सर्व ग्रह परमार्थाला अनुकूल होतात. जोपर्यंत कुंडलिनी सुप्तावस्थेत/विश्रांती अवस्थेत असते, तोवर त्याचे ठिकाणी आत्मस्थितीची स्थापना होत नाही. कुंडलिनी/प्राणशक्ती जागृत झाली असता, सर्वप्रकारच्या संदेहाची निवृत्ती होते. मंदेह म्हणजे अंतःकरण. या अंतःकरणातील संदेह/संशय निःशेष गेला असता, साधक आपला जीवभाव गुरूपदी अर्पण करतो. गुरूपदी संपूर्ण शरणागतीची फलश्रुती म्हणजे त्या साधकाचे ठिकाणी ज्ञानाची जागृती होऊन, त्याला 'निर्विकल्प समाधी' अवस्थेचा लाभ होतो, असे श्रुतीमध्ये तसेच गुरुगीतेत म्हटले आहे. अशा साधकाला देवाची भेट आपोआपच होते व तो देव जनी, वनी, सर्वत्र व्यापून राहिल्याचा अनुभव येतो. अशा सर्वव्यापक ब्रह्माचा/देवाचा अनुभव येणे, ही सद्गुरू भजनाची वर्माची खूण आहे, असे जगद्गुरू तुकाराममहाराज सांगतात.

चिद्वायुस्वरूप सोऽहंआत्मा, हे गुरूंचेच रुप आहे. असे सोऽहं सद्गुरू मस्तकावरती कृपाहस्त ठेवतात, तेव्हा योगाचे सार





असलेले 'समत्वचित्ताची' स्थिती प्राप्त होते. त्यामुळे चित्तावर प्रसन्नता उमटते व अंतरात आनंद ओसंडून वाहू लागतो.

या 'गुरूपाठाचा' अभ्यास दृढ झाला असता, श्रीगुरुलिंगजंगम महाराजांचे कृपाछत्र सदैव आपल्यावर राहणार आहे. श्रीगुरूलिंगजंगममहाराजांच्या पदकमलावर ही प्रेमरूपी फुलांची ओंजळ, अत्यंत प्रेमाने हा दासराम समर्पित करीत आहे.

**विवरण -** या अभंगामध्ये प्रामुख्याने सद्गुरूंचे सगुण तसेच निर्गुण स्वरूप, साधनमार्गामध्ये कुंडलिनीचे/प्राणशक्तीचे कार्य तसेच गुरूपाठाचे महत्व याचे वर्णन आलेले आहे.

सद्गुरूंचे महत्व विशद करताना, दासराममहाराजांनी येथे 'गुरू' या आकाशातील ग्रहाचा दृष्टांत दिला आहे. 'गुरू' हा आकाशातील बुध, मंगळ, इत्यादि ग्रहाप्रमाणे एक तेजोगोल/ग्रह आहे, एवढेच त्याविषयी आपण समजूत करून घेतली असता, आपणास 'गुरू' या ग्रहाचे वेगळेपणाने असणारे वैशिष्ट्य ध्यानात येणार नाही. ह्याचप्रमाणे आपले सद्गुरू हे आपल्याप्रमाणेच देहधारी माणूस आहे, अशी आपण समजूत करून घेतो व त्यांच्याशी आपण त्याच पद्धतीने वागतो व त्यामुळे आपण त्यांचे महत्व जाणत नाही. गुरूंना केवळ देहधारी समजणारा, गुरूकृपेविना, अखेरपर्यंत देहधारीच राहतो.

गुरूंना आपल्याप्रमाणे देहधारी मानणे म्हणजे, त्यांच्या ब्रह्मत्वाविषयी संशय निर्माण होणे होय. संशय हा निवडुंगासारखा

असतो. तो सतत फोफावत रातो. संशयाचा एक विचार, अनेक वैकल्पिक विचारांना जन्म देतो. त्यांच्या उक्ती व कृती विषयी अनेक तर्क-कुतर्क निर्माण होतात. अशा माणसाला सद्गुरूंनी केलेल्या अनुग्रहाचा कांहीही उपयोग होणार नाही. ''संशयात्मा विनश्यन्ति''या न्यायाने त्याची अधोगती अटळ ठरते.

सद्गुरू हे दयाळू असतात. त्यामुळे संदेहांनी ग्रासलेल्या जीवाला जर मनापासून पश्चात्ताप झालेला असेल व तो मनोभावे शरणागत झाला असता, सद्गुरू त्याचेवर कृपा करतात.

'संदेहाची निवृत्ती म्हणजे आत्मज्ञानाची प्राप्ती'. या संदेहाची निवृत्ती होत नाही, कारण आपण देहाविषयी सत्यत्त्वबुद्धि बाळगतो. त्यामुळे सद्गुरूंचा देहच केवळ सत्य आहे असे समजून त्यांना देहधारी मानतो. परंतु सद्गुरूकृपेने या संदेहाची निवृत्ती होते.

मराठी भाषेमध्ये सामासिक शब्दांची फोड म्हणजे विग्रह करून त्याचा अर्थ केला जातो. उदा. 'पति-पत्नी' या द्वंद्व समासाचा विग्रह, पति आणि पत्नी असा होतो. दासराममहाराजांनी, व्याकरणातील 'समासाचा विग्रह' ही संकल्पना दृष्टांतासाठी घेतलेली आहे. परमार्थामध्ये सद्गुरू शिष्याच्या संदेहनिवृत्तीकरिता, त्याच्या अंतःकरणातील चिदाचिद्ग्रंथीच्या द्वंद्वाचा विग्रह करतात, त्यांच्यातील भेद स्पष्ट करतात. चिदाचिदामधील भेद स्पष्ट होण्यासाठी शिष्याची सारासार विवेकबुद्धि जागृत करतात. त्यामुळे असार/जड वस्तू दूर सारून, सारभूत वस्तूचा निश्चय त्याचे ठिकाणी उत्पन्न होतो.





असा सारासार विवेक जागृती होऊन साधन केले असता, कुंडलिनी/प्राणशक्ती जागृत होऊन त्या शिष्याची कुंडली फिरते. कुंडली फिरते याचा अर्थ त्याच्या पत्रिकेतील सर्व ग्रह परमार्थाला अनुकूल होतात. कुंडलिनी/प्राणशक्ती जागृत होते म्हणजे काय? कुंडलिनी म्हणजे प्राणशक्ती होय. देहातील प्राणशक्तीमुळे आपण जिवंत आहोत. ही प्राणशक्ती नित्य जागृतच असते. प्राणाच्या नित्यजागृतीने देहाला जीवंतपणा आहे. ती जर सुप्त झाली तर प्राणी जीवंतच राहणार नाही. प्राणशक्ती नित्य जागृत असते, पण जीव हा बहिर्मुख असल्याने त्याला आपल्या देहातील 'जागृत प्राणाचा'अनुभव येत नाही. परंतु अंतर्मुख होऊन साधन केल्याने, जीव, जागृत कुंडलिनी जगदंब/प्राणशक्तीशी सन्मुख होईल. जीवाला येणारी ही खरी जागृती होय. या जागृत अवस्थेत गुरुचरणी संपूर्ण शरणागतीची क्षमता/पात्रता शिष्याच्या ठायी येते व तो आपल्या जीवभावाचे अर्घ्य देतो. गुरुचरणी जीवभाव समर्पित करतो. ''**संसार उडाला । संदेह फिटला । तोचि पूर्ण झाला । तुका म्हणे ।।**'' अशी अवस्था होते. अशातऱ्हेने, जीवभावाचा संकल्प नष्ट झाल्याने, निर्विकल्प समाधी अवस्था प्राप्त होते व संदेहाची संपूर्ण निवृत्ती होऊन आत्मज्ञानाची प्राप्ती होते व त्याचा परमार्थ पूर्णत्वास जातो.

आतापर्यंत सगुणरुपातील सद्गुरूंचे स्वरूप व कार्य पाहिले. दासराममहाराजांनी अभंगाच्या अखेरच्या भागात, निर्गुणस्वरूपातील सद्गुरूंचे वर्णन केले आहे. देहामधील चिदाकाशात प्राणरूप

सोऽहंआत्मा, हे सद्‌गुरूंचे सूक्ष्म, निर्गुणरूप आहे. '**सः अहम् - अहम् सः**' ह्या येथील गुरूपादुका आहेत. साधन करून चिदाकाशापर्यंत आलेला साधक, 'सोऽहंगतीरूप' चरणांवर आपल्या जीवभावाचा अभिषेक करतो. त्यावेळी सोऽहं सद्‌गुरू आपला कृपाहस्त त्याचे मस्तकी ठेवतात, म्हणजे त्याचे ठिकाणी 'सोऽहंभावाची' जागृती करतात. सोऽहंभाव जागृतीने, सोऽहंब्रह्माचा अनुभव आपोआप येतो. अशावेळी चित्त हे चित्तरूप न राहता, त्याचे चैतन्य होते. अंतरंगात आनंदाचा बहार येतो. अशाप्रकारे, सद्‌गुरूभजनाने/भक्तीने अंतरंगात सोऽहंभावाने व बाहेर सर्वत्र तोच आत्मदेव व्यापून उरला आहे, असा आपला अनुभव तुकाराममहाराज सांगतात. 'गुरूपाठ' हा सारासार विचारांचा आहे. तो एका पातळीवर आकलनाचा व दुसऱ्या पातळीवर अनुभवाचा विषय आहे. गुरूपाठातील ''गुरूविद्या'' बुद्धिच्या पातळीवर आकलन करून घेणे, हा एक भाग व योगमार्गातील प्राणसाधनेद्वारा ब्रह्मरूप सद्‌गुरूंचा साक्षात्कार अनुभवणे हा दुसरा भाग. हीच गुरूपाठ साधनेची पूर्णता होय.

गुरूपाठाची पूर्णता अनुभवल्यानंतर, सोऽहंरूप सद्‌गुरू श्रीगुरुलिंगजंगममहाराज हे सदैव आपल्यावरती कृपाछत्र धरतात. अशा या गुरुलिंगजंगममहाराजांच्या चरणावरती प्रेमसुमने अत्यंत प्रेमभावाने, श्रीदासराममहाराज समर्पित करीत आहेत.

***





## ५१

**संच साधोनिया मंचकी संचले । आणि बरसले आशिर्वाद ।।१।।**
**वसुदेवी पहाता जो का वासुदेव । स्वरूपी सद्‌भाव ठसावला ।।२।।**
**सदा जे संचले तेचि ते संचले । यावीण संचले काय सांगा ।।३।।**
**संचले ते चळे चळे ते संचले । चळे ते चळवळे उपाधी या ।।४।।**
**भक्ती तरी कलेकलेने वाढावी । पौर्णिमा ते व्हावी भक्तिचिया ।।५।।**
**शिवाचे मस्तकी सोळावी ते कळा । तयासी चित्‌कळा बोलताती ।।६।।**
**पौर्णिमेचा चंद्र तुका पूर्ण झाला । तुकयाचे बोला विचारावे ।।७।।**
**ऐसी तरी व्हावी सदाची पौर्णिमा । तयासी उपमा नाही जगी ।।८।।**
**आनंदी आनंद गोविंदी गोविंद । संवादू विनोद पूर्णतेचा ।।९।।**
**चैतन्य ते ब्रह्म ब्रह्म ते चैतन्य । तेथेची अनन्य जीवन हे ।।१०।।**
**दासराम म्हणे ऐसी ते पौर्णिमा । ते गुरुपौर्णिमा मनी घ्यावी ।।११।।**

**अर्थ -** ब्रह्मस्वरूपाच्या मंचकी चिद्‌तत्त्व/चैतन्य निश्चळत्वाने विराजमान असते. त्याचे ठिकाणी 'एकोहं बहुस्याम' 'मी बहू व्हावे' अशा कल्याणकारी इच्छेचे स्फुरण होते. येथूनच विश्वनिर्मितीच्या कार्याला सुरवात होते. या चैतन्यरूप स्फुरणातून चिदाकाश उत्पन्न होते. चिदाकाशाचे ठिकाणी, वसुदेवी (शक्ती) व वसुदेव (शिव) 'शिवशक्तीभव' ठसावलेला असतो. अशातऱ्हेने ब्रह्मस्वरूपाचे ठिकाणी निश्चळाने असलेले चिदतत्त्व/चैतन्य हे स्फुरणरुपाने,

चंचळत्वास प्राप्त होते. चिदाकाशात साचून राहिलेल्या चैतन्यापासून/शिवशक्तींपासून, पंचमहाभौतिक विश्व निर्माण झाले. या जड पंचमहाभौतिक उपाधीमध्ये चैतन्य चंचळत्वाने, गुप्तरुपाने वास करीत असते.

कले कलेने वाढणारा चंद्र, पौर्णिमेला पूर्ण आकाराने विलसतो. साधकाची भक्तीही कलेकलेने वाढत राहते. चैतन्याकडे वृत्ती वळवून केलेली भक्ती ही पौर्णिमेप्रमाणे कलेकलेने वाढते. अखेरीस चिदाकाशामध्ये स्थित, शिवात्म्याचे मस्तकातील सोळावी कला (चित्कला) त्याला प्राप्त होते व त्याची भक्ती पूर्णत्वास जाऊन, तो आत्मरूपच होऊन जातो. तुकाराममहाराजांनी आपला हाच अनुभव सांगितला आहे. पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणे त्यांचा आत्मरूपाचा अनुभव पूर्णत्वास गेला व अखेर ते अनुभवरूप/आत्मरूप होऊन राहिले.

ब्रह्म म्हणजे चैतन्य व चैतन्य म्हणजेच ब्रह्म, अशा अवस्थेत गोंदवलेकरमहाराज होते. म्हणूनच ब्रह्मरूप गोंदवलेकरमहाराजांना ''ब्रह्मचैतन्य'' म्हणतात. सच्चिदानंदाशिवाय त्यांचे ठिकाणी अन्य जीवन नव्हते.

श्रीतुकाराममहाराज व श्रीगोंदवलेकरमहाराजांचे प्रमाणे श्रीमामामहाराज केळकर हेसुद्धा ब्रह्मस्वरूप होते. श्रीमामामहाराज (श्री. गोविंदराय केळकर) हे नित्य आत्मस्वरूपाशी एकरूप झालेले





होते. त्यांचे ठिकाणी आत्मानंद/गोविंदानंद नित्य असून त्यांच्या संवादातून, बोलण्यातून हा आत्मानंद विलसत असे.

अशारितीने जे महात्मे आत्मरूप होऊन राहतात, त्यांना नित्याचीच पौर्णिमा असते. त्यांच्या भाग्याला उपमा असत नाही. हे साधण्यासाठी गुरूपौर्णिमेचे वर्म ध्यानी येणे आवश्यक आहे, असे श्रीदासराममहाराज सांगतात.

**विवरण -** गुरूपाठाच्या या अखेरच्या अभंगामध्ये, सत्ब्रह्मापासून विश्वाची निर्मिती कशी झाली, याची प्रक्रिया सांगितली आहे. तसेच चैतन्याकडे वृत्ती वळवून भक्ती कशी केली जाते याचे वर्णन आले आहे. शेवटी ब्रह्मस्वरूप संत श्रीतुकाराममहाराज, श्रीगोंदवलेकरमहाराज तसेच श्री.गोविंदराय केळकर (मामामहाराज) यांचे पारमार्थिक महत्व विशद केले आहे.

ब्रह्म हे सत्घन, चिद्घन, आनंदघन आहे. ते निश्चळ, निःशब्द आहे. या परमात्म्याला ''अहं बहुस्याम'' अशी प्रेरणा/स्फुरण झाले. विश्वाच्या/जीवाच्या कल्याणासाठी, स्वेच्छेने स्फुरणे म्हणजे त्या परमात्म्याच्या शुभेच्छांचे, त्याच्या आशीर्वादाचे बरसणे होय. घन, निःशब्द परमात्म्याचे ठिकाणी चंचळत्व/चैतन्य निर्माण झाले. चैतन्याचे चंचळत्व स्फुरणरूपाने असते. यातूनच चिदाकाशाची निर्मिती झाली. चिदाकाशाचे वैशिष्ट्य सांगताना श्रीदासराममहाराज सांगतात की, 'चिदाकाश तत्व हे देहामध्ये वेगळे काढून दाखविता येत नसले तरी, ते बुद्धिगम्य आहे.' येथे ब्रह्मस्वरूपातील घनचैतन्य/

चिद्घनतत्त्व हे चंचळ चैतन्य होऊन साचून राहिले आहे. या चिदाकाशात जीव व शिव आहेत. येथेच त्रिगुण व पंचमहाभूते सूक्ष्म बीज स्वरूपात असतात.

चिदाकाशात शिवात्मा/सोऽहंआत्मा आपल्या ध्वनीप्रकाश शक्तीसह/ प्रकृतीसह साक्षीरूपाने असतो. सोऽहंआत्म्याचा निजस्मरण -प्रकाश, त्रिगुणांच्या प्रकृतीद्वारे/ शक्तिद्वारे जीव वनला. तसेच याच चिदाकाशातील पंचमहाभूतांच्या सूक्ष्म बीजांपासून, भूताकाश व पुढे चराचर विश्व तयार झाले. अशाप्रकारे अवघे विश्व हे चैतन्याचाच विलास आहे. जीवाला जरी याचा जडत्वाने अनुभव येत असला तरी, या जड उपाधीमध्ये गुप्तरूपाने चैतन्याची चळवळ, म्हणजेच सूक्ष्म हालचाल चालू असते. या चंचळ चैतन्याच्या अधिष्ठानावरच जडाचे/उपाधीचे अस्तित्व अवलंबून आहे.

या अभंगामध्ये वसुदेवी व वासुदेव यांचा उल्लेख आलेला आहे. येथे वसुदेवी हा शक्तीगर्भ प्राण व वासुदेव म्हणजे सोऽहंशिवात्मा होय. चिदाकाशापर्यंत आलेल्या साधकाला, उर्ध्वगामी प्राणसाधनेने वासुदेवरूपी शिवात्म्याचा/सोऽहंआत्म्याचा साक्षात्कार होतो. पुढे या सोऽहंस्वरूपाचे ठिकाणी, निश्चळ सत्‌ब्रह्म ठसावल्याचा अनुभव त्या साधकाला येतो.

या प्राणसाधनेचा अधिक विस्तार करताना, ही साधना कशी भक्तीरूपाने विकसित झालेली आहे, हे सांगितले आहे. येथे भक्तीची





व्याख्या - चैतन्याकडे वृत्ती वळविणे म्हणजे भक्ती - अशी केली आहे. जीव हा ब्रह्मरूप/चैतन्यरूप असल्याने त्याची स्वाभाविक खेच चैतन्याकडे असते. परंतु बहिर्मुख वृत्तीच्या रेट्याने, जीव चैतन्याकडे न वळता, सुखासाठी, आनंदासाठी बाहेरील जगाकडे आकर्षित होतो. पूर्वपुण्याईने सद्‌गुरूंची गाठ पडली असता व त्यांना मनोभावे शरण गेले असता, गुरूकृपेने साधन साधले जाते म्हणजे त्या साधकाची वृत्ती चैतन्याकडे वळते. ही चैतन्यभक्ती कलेकलेने वाढते. अखेर चिदाकाशामध्ये प्रवेश केल्यानंतर तेथे सोऽहंशिवात्म्याशी गाठ पडते. या शिवात्म्याच्या मस्तकी सोळावी कळा आहे. तिलाच 'चित्कळा' म्हणतात. ही सोऽहंभावाची कळ साधली असता, जीव निश्चळ भवतीच्यायोगे शिवरूपच होऊन राहतो.

शेवटी आत्मस्वरूप होऊन राहिलेले संत जगद्‌गुरू श्रीतुकाराममहाराज, श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकरमहाराज व शांतीब्रह्म श्रीमामामहाराज यांचा दाखला देऊन, पारमार्थिक जगतामध्ये त्यांचे असलेले महात्म्य वर्णिलेले आहे.

''**पौर्णिमेचा चंद्र तुका पूर्ण झाला । क्षणात निमाला पायाजवळी।।**'' तुकाराममहाराज साक्षात् वस्तुरूप/ब्रह्मरूपच होऊन राहिले होते. म्हणूनच त्यांना 'जगद्‌गुरू' म्हणून संबोधले जाते. पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणे, श्रीतुकाराममहाराजांची भक्तीसुद्धा पूर्णत्वास पोहोचली होती.

''**ब्रह्म म्हणजे चैतन्य व चैतन्य म्हणजे ब्रह्म**'' असे श्रीगोंदवलेकरमहाराज हे चैतन्याशी/ब्रह्मस्वरूपाशी एकरूपच होऊन राहिलेले होते. म्हणूनच त्यांना 'ब्रह्मचैतन्य' ही पदवी प्राप्त झाली.

तिसरे म्हणजे श्रीमामामहाराज (गोविंराय केळकर) '**जो जनामध्ये वागे । परी जगावेगळी गोष्टी सांगे ।। ज्याचे अंगी ज्ञान जागे । तोचि साधू ।।**' शांतीब्रह्म श्रीमामामहाराज हे आत्मसाक्षात्कारी, ज्ञानरूप साधू होते. त्यांच्या नित्य कीर्तनात बहरून येणाऱ्या आनंदाला ''गोविंदानंद'' म्हणणे उचित ठरेल.

अशातऱ्हेने सर्व आत्मरूप संतमहात्म्यांची नित्याचीच पौर्णिमा असते. त्या सर्वांना भाग्याचेही भाग्य प्राप्त झालेले असते.''गुरूपौर्णिमेचे'' नेमके वर्म ध्यानात आले असता, असे भाग्य प्राप्त होणार आहे, असे श्रीदासराममहाराज सांगतात.

***





## ५२

**श्रीगुरूची वसती असे जया धामा ।**
**ते ठायी पौर्णिमा नित्य नवी।।१।।**
**सदाचि संपूर्ण नोहेचि अपूर्ण ।**
**त्याचे महिमान कोण वानी ।।२।।**
**समत्वेचि पूर्ण म्हणोनी संपूर्ण ।**
**अधिक ना न्यून नाही तेथे ।।३।।**
**दासरामा वाटे नवल तयाचे ।**
**काय बोलू वाचे मौन पडे ।।४।।**

**अर्थ -** श्रीसद्‌गुरूंचे ज्या ठायी वास्तव्य असते, त्याठिकाणी नित्य नवी पौर्णिमा असते. तेथे नित्य आनंदच असतो. त्याठिकाणी वास्तव्यास असणाऱ्या सद्‌गुरूंचे महिमान/मोठेपणा, अवर्णनीय असतो. त्यांचे ठिकाणी कोणत्याही गोष्टीचे कमी अधिकपण, कोणत्याही प्रकारची अनित्यता नसते. ते समचित्त असून, पूर्ण ब्रह्मरूप असतात. देह विनाशी असूनही, त्यामध्येच राहून अविनाशित्व प्राप्त करुन घेणाऱ्या सद्‌गुरूंचे नवल वाटते आणि त्यामुळे त्यांचेविषयी काही बोलण्याऐवजी, वाणी 'मौन' धारण करुन बसते.

**विवरण -** विनाशी देहामध्ये, सत्ब्रह्मस्वरूप धारण करुन राहणाऱ्या सद्गुरूंचे महिमान सांगणारा हा अभंग आहे. लौकिक दृष्टिने सद्गुरूंच्या निर्याणानंतर ते देहरुपाने नसले तरी, शक्तीरुपाने ते सर्वत्र असतात. भक्तांचा उद्धार करण्याचे त्यांचे कार्य आताही चालूच आहे. त्यांचे वास्तव्य असलेल्या स्थानी आजही अनेक भक्त येतात. अदृश्यरूपाने आजही त्या पवित्रस्थानी ते वास्तव्य करून आहेत, अशी भक्तांची गाढ श्रद्धा असते. सद्गुरू देह स्वरूपात व्यक्त असतात, तोवर त्यांचा सहवास मिळविता येतो. ते ज्या स्थानात वास्तव्यास असतात, ते स्थानही संतरूप होऊन गेलेले असते. काही ठिकाणी त्यांची समाधी व त्यावरती पादुकांची स्थापना केलेली असते. गुरूसंप्रदायात सद्गुरूंच्या पादुकांची उपासना केली जाते. चिमड संप्रदायात चिमड या गावी श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज यांच्या पादुकांची स्थापना केलेली असून, तेथे नित्य उपासना चालते. पूर्ण श्रद्धेने तेथे जाऊन उपासना केली असता सद्गुरूंची कृपा होते, असा अनेकांचा अनुभव आहे. अशा पुण्यक्षेत्रात राहून साधन केले/उपासना केली असता ती लवकर फळाला येते. इतर ठिकाणी कर्मामुळे येणारे प्रतिबंध असतात. येथे सद्गुरूकृपेने प्रतिबंध दूर होतात. त्यामुळे येथे नित्य आनंदरूप पौर्णिमा असल्याचा अनुभव येतो. जगताचे मूळ कारण जे ब्रह्म, त्यालाच परब्रह्म/पूर्णब्रह्म असेही म्हणतात. संतांचे अवतार हे पूर्णब्रह्मरूप असतात. म्हणून सद्गुरुंची 'पूर्णब्रह्म' या भावाने उपासना करावी, असे वेदांत सूत्रात सांगितले आहे. अशी त्याची उपासना केली असता, परब्रह्माच्या ऐक्याचा अनुभव





येतो. ब्रह्म व्यापक आहे याचा अर्थ ते निरावयव आहे. त्यामुळे त्याचे भाग पाडता येत नाहीत, ते अखंड आहे. त्याचे कमी-अधिक असे भाग पाडता येत नाहीत म्हणजे ते समत्वाने पूर्णपणे व्यापक आहे. ब्रह्मरूप झालेल्या पुरुषाचे चित्तही समत्वाला पोहोचलेले असते. अशा ठिकाणी मन व बुद्धि यांचे ऐक्य झालेले असते. याचा अर्थ, 'चैतन्य' हाच केवळ मन व बुद्धिचा विषय झालेला असतो.

त्या समत्वाकडे असेही पाहिले जाते :- स-कार धारणेतील परब्रह्माचे शिवस्वरूप व ह-कार धारणेतील प्रतिबिंबित झालेला जीव, या दोन्ही ठिकाणी एकच हरि आत्मा/ब्रह्म सारखेपणाने भरलेले आहे, असे दासराममहाराज म्हणतात. जीव व शिव ह्या दोहोंमध्ये असणारे जीवचैतन्य व शिवचैतन्य अशा दोहोमध्ये फरक आहे. फक्त उपाधीचा जीव व शिवामध्ये अनुक्रमे अज्ञान व ज्ञानाची उपाधी असली तरी दोहीकडे असलेले चैतन्य हे समत्वाने असते.

देहरुपात असलेले सद्गुरू हे ब्रह्मरूप असतात. देहाला मर्यादा/अपुरेपणा आहे. परंतु त्यामधील ब्रह्म मात्र अमर्याद व परिपूर्ण आहे. अशातऱ्हेने मर्यादित असूनही अमर्याद असणे, अपूर्ण असूनही पूर्णत्वाने राहणे ही खरोखरीच नवलाईची/ आश्चर्याची गोष्ट आहे. या गोष्टीचे कार्यकारण भाव तपासणे, तर्कबुद्धिला शक्य नाही. अशावेळी तर्क पांगुळला जातो. अशीही नवलाईची गोष्ट पाहून वाचेला मौनावस्था प्राप्त होते, असे श्रीदासराममहाराज सांगतात.

***

## ५३

**हृदयी वसती श्रीगुरू पाऊले ।**
**लक्ष हे वेधले ज्ञानेशांनी ।।१।।**
**अखंड चांदणे चैतन्याचे जेथ ।**
**अर्धचंद्र तेथ पूर्ण होय ।।२।।**
**चंद्र सूर्य अग्नि कैचे लुप्त होती ।**
**समाधान चित्ती संतांचिये ।।३।।**
**नामपाठ करी नामपाठ करी ।**
**तरी चुके फेरी चौऱ्यांशीची ।।४।।**
**श्रीगुरूचरणी ठेवियला माथा ।**
**दासरामी कथा विश्रांती हे ।।५।।**

**अर्थ -** श्रीदासराममहाराज सांगतात की, माझ्या हृदयामध्ये श्रीगुरुंची पाऊले विराजमान आहेत. हाच गुरुचरणांचे विषयी भाव व्यक्त करणाऱ्या, ज्ञानेश्वरीतल्या पंधराव्या अध्यायातील प्रथम ओवीने, (आता हृदय हे आपुले....), माझे लक्ष वेधले गेले. सद्गुरुंनी सांगितल्याप्रमाणे साधन केले असता, चंद्र, सूर्य व अग्नी म्हणजेच इडा, पिंगला आणि सुषुम्ना लुप्त होतात. शिरोहृदयी चैतन्यरूपी चांदण्याचा अखंड वर्षाव सुरू होतो. अर्धचंद्र पूर्णत्वाला पोहोचतो





म्हणजे – अंशात्मक असलेला जीव, पूर्णांशरूपी शिवाशी ऐक्य पावतो व हा जीव चौऱ्यांशीलक्ष फेऱ्यातून/ जन्ममरणाच्या चक्रातून मुक्त होतो. हे सर्व गुरुंनी दिलेल्या नाभ्यासाने होते. अशा सद्गुरूंच्या चरणी दासराम माथा ठेवित आहे, कारण याच ठिकाणी आत्मस्थितीची विश्रांती प्राप्त होते.

**विवरण -** गुरूंनी सांगितलेल्या साधनमार्गाचे आचरण केले असता, येणारे हे अनुभव या अभंगात सांगितलेले आहेत. ''**आता हृदय ते आपुले । चौफाळुनि या भले । वरी बैसवू पाऊले । श्रीगुरुंची।।**'' आपल्या सद्गुरूचरणांची निर्गुण व निरामय रुपात पाद्यपूजा, हा खरा 'पुरूषोत्तमयोग' आहे, असे ज्ञानदेव म्हणतात. आत्मानात्मविवेक, वैराग्य, शमदमादि षट्क व तीव्र मुमुक्षुत्व अशा चार पायांनी बनलेल्या हृदयाच्या चौरंगावरती, श्रीगुरूंचे चरण दृढतेने धारण करु. आत्मानात्मविवेकादि चार चरणांच्या अभावी, विषयांचे ध्यान सुरू होते व त्यामुळे श्रीगुरुंचे चरण हृदयात दृढतेने धरले जात नाहीत. आपले शरीर व प्राण यांच्या पादुका करुन त्या गुरूचरणी घालाव्यात. अशा ह्या गुरूचरणांवरून भोग व मोक्ष दोन्ही ओवाळून टाकीन असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात. 'आपले हृदयी सद्गुरूंची पाऊले विराजमान आहेत असे सांगताना, श्रीज्ञानदेवांच्या वरील ओवीकडे आपले लक्ष वेधले गेले' असे श्रीदासराममहाराज सांगतात.

ज्ञानदेव ज्ञानेश्वरीच्या तेराव्या अध्यायात म्हणतात की, '**जयाचे वक्त्र । वाहे गुरुनामाचे मंत्र । गुरूवाक्यावाचून शास्त्र ।**

**हाती न शिवे ।।**' सद्गुरूंचे नाम हाच एकमेव मंत्र आहे, अशा श्रद्धेने नामपाठ व्हावयास हवा. त्यांनी सांगितले त्याचेच चिंतन करायचे. सद्गुरूवाचून अन्य काही ज्याला माहितच नाही, असा भक्त तरून जातो, असे ज्ञानदेव म्हणतात. अशा निष्ठेने केलेल्या नामपाठाचा परिणाम म्हणून सद्गुरू प्रसन्न होतात व त्यामुळे सुषुम्नामार्गाचा प्रवेश मोकळा होतो. इडा, पिंगला म्हणजेच चंद्र-सूर्य नाडीमधील प्राणगतीच्या मिळणीतून, अग्निरुपी सुषुम्ना नाडीमध्ये जीवाचा प्रवेश होतो. दोन्ही नाड्या अग्निनाडीत लय पावतात. प्रवृत्ती/निवृत्ती तसेच संकल्प/विकल्प मावळतात. मन पांगुळते, मनाचे उन्मन होते. चित्त हाती येते, चित्ताचे चैतन्य होते व महानाद श्रवणाला सुरवात होते.

महानादश्रवणी तदाकारता हा आत्मस्वरूपाचा प्रत्यय असतो. जीव अपूर्ण, आत्मा पूर्ण. दिव्याशिवाय काजळी नाही, आत्म्याशिवाय जीव नाही, पूर्णाशिवाय अपूर्ण नाही. हा अर्धचंद्ररूपी जीव, पौर्णिमेच्या पूर्णचंद्रात/आत्म्यात मिळून शेवटी पूर्णच होतो. चंद्राच्या प्रत्येक कलेमध्ये चंद्रप्रकाश समत्वाने असतो, त्याप्रमाणे जीवात्मचैतन्यात व शिवात्मचैतन्यात, ब्रह्मचैतन्य हे समत्वाने/पूर्णत्वाने व्यापून असते. त्याठिकाणीच चित्ताला खरे समाधान प्राप्त होते.

आत्मरूपता ही शांत व निःशब्द अवस्था असून, जीवाला खरी विश्रांती आत्मरूप होण्यात आहे. येथे मनाची/बुद्धिची धावाधाव





संपते. वासनारुपाने सळसळणारा देहभाव संपून जातो. त्यामुळे प्राणाला कामच न उरल्याने, त्याला पूर्ण विश्रांती मिळते. 'प्राण एव आत्मा' म्हणून आत्मरूप झालेला जीव विश्रांतरूप होतो.

सद्गुरू हे ब्रह्मरूप असतात, म्हणून त्यांचे चरणी माथा ठेवणे म्हणजे त्यांच्यामधील ब्रह्मस्वरूपी लीन होणे. असे झाले असता, त्या शांतरूप आत्म्याचे ठिकाणी खरी विश्रांती प्राप्त होते, असे श्रीदासराममहाराज सांगतात.

***

**ॐ पूर्णमिदं पूर्णात् पूर्णमुदच्यते ।**
**पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ।।**

## साधकोपयोगी ग्रंथ

(खालील यादीतील ग्रंथ हे श्रीदासराम ग्रंथमाला पुष्पयादी व्यतिरिक्त

१. श्रीहनुमद्-गुरू-चरित्र-बोध-सार (श्रीमामामहाराज केळकर लिखित श्रीकोटणीसमहाराजांचे चरित्र)
२. श्रीगोविंद चरित मानस (प.पू.श्रीमामामहाराजांचे ओवीबद्ध चरित्र)
३. श्रवणी पाजुनी अमृतवाणी (प.पू.मामामहाराजांचे निवडक अभंगांचे विवरण)
४. नित्य नवा दिस जागृतीचा (श्रीदादांच्या ३६५ वचनांचे चिंतन)
५. श्रीहनुमत् गुरूचरित्र (न.दा.दिवेकर कृत श्रीकोटणीसमहाराजांचे ओवीबद्ध चरित्र)
६. श्रीदासरामगाथा (अभंग गाथा)
७. संजीवन पाठ (श्रीदासराममहाराज यांचे अभंग अर्थासह)
८. श्रीदासराममहाराजकृत आरती संग्रह
९. श्रीनित्यपाठामृत (श्रीदादांची नित्यपाठावरील कीर्तने)
१०. साधन संध्या (श्रीरामनिकेतन येथील नित्यक्रम)
११. चिन्मय नित्यपाठ (श्रीरामनिकेतन येथील नित्यक्रम)
१२. अमृतवाणी (प.पू.श्रीमामामहाराज केळकर यांचा अभंग गाथा)
१३. सन्मार्ग दीप (चिमड मठ प्रकाशित)
१४. श्रीनारायणीय शिष्यप्रबोध अथवा भारतीय आत्मविद्या (प.पू.श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर यांची कीर्तने)
१५. श्रीगुरुलिंग गीतम् (प्रा.डॉ.के.वा. आपटे लिखित)
१६. श्रीदासराम गीतम् (प्रा.डॉ.के.वा. आपटे लिखित)
१७. श्रीदासराम वचनामृत (श्रीदादांची वचने)





## श्रीदासराममहाराजांची ग्रंथसंपदा

| क्रमांक | ग्रंथाचे नांव |
|---|---|
| १ | **नासदीय सूक्तावरील ओविबद्ध टीका** |
| २ | **श्रीदासरामगाथा** (अभंग गाथा) |
| ३ | **श्रीरामदासबोध** (ओवीबद्ध) |
| ४ | **संजीवन पाठ** (श्रीदासराममहाराज यांचे अभंग अर्थासह) |
| ५ | **श्रीचांगदेव पासष्टी एक नाम कला** (ओवीबद्ध टीका) |
| ६ | **श्रीदासराममहाराजकृत आरती संग्रह** |
| ७ | **ग्रंथत्रयी** (आत्मबोधप्रत्ययामृत, दासराम विंशिका व पंचविशी) |
| ८ | **श्रीदासराममहाराजप्रणित भजन तरंग** |
| ९ | **श्रीदासराममहाराज कथित हरिपाठ संकीर्तन** |
| १० | **श्रीदासराममहाराजांचा वचन संग्रह** (३६५ वचने) |
| ११ | **श्रीगुरुमहिमा** |
| १२ | **श्रीदासरामगाथा पुरवणी** |
| १३ | **श्रीदासराममहाराज आत्मचरित्र** |
| १४ | **श्रीदासराममहाराज कृत श्लोकरचना** |
| १५ | **श्रीज्ञानदेवकृत अमृतानुभव** (श्रीदासरामकृत समओवी टीकेसह) |
| १६ | **रामदासस्वामीकृत आत्माराम** (श्रीदासरामकृत गद्यार्थासह) |
| १७ | **श्रीगुरुलिंगगीता** (२२८ पदे) |
| १८ | **श्रीज्ञानदेवकृत उत्तरगीता** (श्रीदासरामकृत गद्यार्थासह) |
| १९ | **श्रीदासराममहाराज लिखित लघु संतचरित्रे** |
| २० | **श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस चरित्र** (श्रीदासरामलिखित) |
| २१ | **श्रीदासराममहाराज यांची आत्मलहरी** |
| २२ | **श्रीदासराममहाराजकृत हरिनामसंकीर्तन** |
| २३ | **श्रीदासराममहाराज यांची प्रवचने** (१०८) |
| २४ | **समर्थ रामदासकृत करुणाष्टके** (श्रीदासराममहाराजकृत विवरणासह) |

| क्रमांक | ग्रंथाचे नांव |
|---|---|
| २५ | **श्रीगुरुलिंगगीता** (६६ पदे व अर्थ) |
| २६ | **श्रीदासराममहाराजकृत रामदासबोध** (विवरणासह) |
| २७ | **ज्ञानेश्वरी ६वा अध्याय** (श्रीदासराममहाराजकृत गद्यार्थासह) |
| २८ | **श्रीज्ञानदेवांचे निवडक अभंग** (श्रीदासराममहाराजकृत अर्थासह) |
| २९ | **श्रीएकनाथकृत आनंदानुभव** (श्रीदासरामकृत टीकेसह) |
| ३० | **परमार्थ प्रश्नोत्तरी** |
| ३१ | **श्रीदासराम चिंतनिका** (श्रीदासराममहाराज लिखित लेख संग्रह) |
| ३२ | **श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ**(श्रीदादांचे १६अभंगांचे विवरण) |
| ३३ | **अक्षरे चैतन्याची भाग-१** (ज्ञानदेवांच्या वाङ्मयावरील लेखन) |
| ३४ | **अक्षरे चैतन्याची भाग-२** (ज्ञानदेवांच्या वाङ्मयावरील लेखन) |
| ३५ | **ज्ञानगंगा** (श्रीदासराममहाराजांची प्रवचने) |
| ३६ | **अक्षरधारा** (श्रीदासराममहाराजांचे संकीर्ण लेखन) |
| ३७ | **श्रीरामपाठांमृत** (श्रीदादांची रामपाठावरील कीर्तने) |
| ३८ | **श्रीनित्यपाठांमृत** (श्रीदादांची नित्यपाठावरील कीर्तने) |
| ३९ | **श्रीबाबासाहेब मुजुमदार यांचे चरित्र** (श्रीदासराम लिखित) |





## श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प सूची

| पुष्प क्रमांक | ग्रंथाचे नांव | सन |
|---|---|---|
| १ | **चिमड संप्रदाय** | २००५ |
| २ | **श्रीरामदासस्वामी चरित्र** | २००६ |
| ३ | **श्रीदासराममहाराजप्रणित भजन तरंग** | २००६ |
| ४ | **श्रीदासराममहाराज कथित हरिपाठ संकीर्तन** | २००७ |
| ५ | **श्रीदासराममहाराज नित्यपाठ चरित्र** | २००७ |
| ६ | **दासबोधातील तत्त्वज्ञान** | २००७ |
| ७ | **श्रीदासराममहाराजांचा वचन संग्रह** | २००८ |
| ८ | **श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज चरित्र** | २००९ |
| ९ | **साधन संध्या** | २००९ |
| १० | **अनंत अमृत स्मरण** | २००९ |
| ११ | **श्रीगुरुमहिमा** | २००९ |
| १२ | **श्रीज्ञानेश्वरी प्रसाद** (श्रीज्ञानेश्वरीतील निवडक ओव्या अर्थासह) | २००९ |
| १३ | **श्रीदासरामगाथा पुरवणी** | २००९ |
| १४ | **श्रीदासराममहाराज आत्मचरित्र** | २०१० |
| १५ | **श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर चरित्र** | २०१० |
| १६ | **श्रीदासराममहाराज श्लोकरचना** | २०१० |
| १७ | **श्रीज्ञानदेवकृत अमृतानुभव**(श्रीदासरामकृत समओवी टीकेसह) | २०१० |
| १८ | **श्रीदासराममहाराज सहस्रनामस्तोत्र** | २०१० |
| १९ | **रामदासस्वामीकृत आत्माराम**(श्रीदासरामकृत गद्यार्थासह) | २०१० |
| २० | **श्रीगुरुलिंगगीता (कानडी लिपीत)** | २०१० |
| २१ | **श्रीगुरुलिंगगीता (मराठी)** | २०१० |
| २२ | **श्रीरामनिकेतन (माहिती पुस्तिका)** | २०११ |
| २३ | **श्रीरामनिकेतनमधील आराधना** | २०११ |
| २४ | **ग्रंथत्रयी**(आत्मबोधप्रत्ययामृत,श्रीदासरामविंशिका, श्रीदासरामपंचविशी) | २०११ |

| पुष्प क्रमांक | ग्रंथाचे नांव | सन |
|---|---|---|
| २५ | श्रीज्ञानदेवकृत उत्तरगीता (श्रीदासरामकृत गद्यार्थासह) | २०११ |
| २६ | अभंगदरबार (आवृत्ती १) | २०११ |
| २७ | सद्बोध दशक (श्रीदादांच्या १० अभंगांवरील विवरण) | २०११ |
| २८ | श्रीदासराममहाराज नित्यपाठचरित्र | २०११ |
| २९ | श्रीगुरुराजकथित ज्ञान आणि बोध (श्रीदादांच्या अभंगांवरील विवरण) | २०११ |
| ३० | प.पू.श्रीमाईसाहेबमहाराज यरगट्टीकर चरित्र | २०११ |
| ३१ | पाठांतर सुलभ भगवत्गीता | २०११ |
| ३२ | श्रीदासराममहाराज लिखित लघु चरित्रे | २०११ |
| ३३ | श्रीतात्यासाहेबमहाराजकृत मनोबोध (निवडक अभंग विवरणासह) | २०११ |
| ३४ | प.पू.श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर चरित्र | २०११ |
| ३५ | महायोगिनी श्रीलक्ष्मीबाईअक्का चरित्र | २०११ |
| ३६ | तो हा दासबोध (दासबोधातील सारभूत ओव्या अर्थासह) | २०११ |
| ३७ | श्रीदासराममहाराज चरितामृत | २०११ |
| ३८ | श्रीनिंबरगीकरमहाराज चरित्र | २०११ |
| ३९ | श्रीदाजीसाहेबमहाराज यरगट्टीकर चरित्र | २०११ |
| ४० | श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस चरित्र (श्रीदासरामलिखित) | २०११ |
| ४१ | श्रीदासराममहाराज यांची आत्मलहरी | २०११ |
| ४२ | श्रीदासराममहाराजकृत हरिनामसंकीर्तन | २०११ |
| ४३ | श्रीदासराममहाराज यांची प्रवचने (१०८) | २०१२ |
| ४४ | प.पू.श्रीमामामहाराज केळकर चरित्र | २०१२ |
| ४५ | श्रीदासरामगीतम् (श्रीदादांचे संस्कृत चरित्र व संस्कृत रचना) | २०१२ |
| ४६ | श्रीदासराममहाराज वचनसंग्रह (३६५ वचने) | २०१२ |
| ४७ | चैतन्यब्रह्म | २०१२ |
| ४८ | श्रीदासराममहाराजकृत वायुलहरी (विवरणासह) | २०१३ |
| ४९ | स.रामदासकृत करुणाष्टके (श्रीदासराममहाराजकृत विवरणासह) | २०१३ |





| पुष्प क्रमांक | ग्रंथाचे नांव | सन |
|---|---|---|
| ५० | श्रीगुरुलिंगगीता (६६ पदे व अर्थ) | २०१३ |
| ५१ | चिमड संप्रदायातील पंचपदी (विवरणासह) | २०१३ |
| ५२ | गुरुलिंगगीतेचे अंतरंग भाग -१ | २०१४ |
| ५३ | श्रीदासराममहाराजकृत रामदासबोध (विवरणासह) | २०१४ |
| ५४ | श्रीदासरामायण (श्रीदासराममहाराजांचे गीतचरित्र) | २०१४ |
| ५५ | श्रीदासराममहाराज केळकर नामसाधना मंदिर वास्तुशांत | २०१४ |
| ५६ | श्रीदासराममहाराजकृत रेवणसिद्धपाठ (विवरणासह) | २०१४ |
| ५७ | गुरुलिंगगीतेचे अंतरंग भाग-२ | २०१५ |
| ५८ | अभंग दरबार (आवृत्ती २ री) | २०१५ |
| ५९ | श्रीदासरामचरित्र (ओवीबद्ध) | २०१५ |
| ६० | आत्मारामपाठ (श्रीदादांच्या २० अभंगांवरील विवरण) | २०१५ |
| ६१ | ज्ञानेश्वरी ६वा अध्याय (श्रीदासराममहाराजकृत गद्यार्थासह) | २०१५ |
| ६२ | श्रीमद्दासबोधातील प्रपंचयोग | २०१५ |
| ६३ | अभंग दरबार भाग - २ | २०१५ |
| ६४ | श्रीज्ञानदेवांचे निवडक अभंग (श्रीदासराममहाराजकृत अर्थासह) | २०१६ |
| ६५ | श्रीएकनाथकृत आनंदानुभव (श्रीदासरामकृत टीकेसह) | २०१६ |
| ६६ | नासदीयसूक्त विवरण | २०१६ |
| ६७ | श्रीज्ञानदेवतेहेत्तिशी भावार्थ विवरण | २०१७ |
| ६८ | पाठांतर सुलभ भगवद्गीता आवृत्ती दुसरी | २०१९ |
| ६९ | दासबोधातील परमार्थ योग | २०१९ |
| ७० | चांगदेवपासष्टी एक नामकळा (विवरणासह) | २०१९ |
| ७१ | परमार्थ प्रश्नोत्तरी (पुनर्मुद्रण) | २०१९ |
| ७२ | चिन्मयबोध (गुरुपरंपरेतील सिद्धपुरुषांची पदे अर्थासह) | २०१९ |
| ७३ | श्रीदासराम चिंतनिका (लेख संग्रह) | २०१९ |
| ७४ | श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ(श्रीदादांचे १६अभंगांचे विवरण) | २०१९ |

| पुष्प क्रमांक | ग्रंथाचे नांव | सन |
|---|---|---|
| ७५ | **अक्षरे चैतन्याची भाग-१**(ज्ञानदेवांच्या वाङ्मयावरील लेखन) | २०२० |
| ७६ | **अक्षरे चैतन्याची भाग-२**(ज्ञानदेवांच्या वाङ्मयावरील लेखन) | २०२० |
| ७७ | **ज्ञानगंगा** (श्रीदासराममहाराजांची प्रवचने) | २०२० |
| ७८ | **अक्षरधारा** (श्रीदासराममहाराजांचे संकीर्ण लेखन) | २०२० |
| ७९ | **श्रीनिंबरगी संप्रदाय दर्शन** (सचित्र मार्गदर्शन पुस्तिका) | २०२० |
| ८० | **श्रीरामपाठांमृत** (श्रीदादांची रामपाठावरील कीर्तने) | २०२० |
| ८१ | **नित्यकीर्तनानंदा** | २०२० |
| ८२ | **चैतन्याचा महामेरू** (श्रीदादांचा जन्मशताब्दी गौरवग्रंथ) | २०२० |
| ८३ | **सांप्रदायबोध** (श्रीदादांच्या अभंगांवरील विवरण) | २०२० |
| ८४ | **अभंग सुधा** (श्रीदादांच्या अभंगांवरील विवरण) | २०२० |
| ८५ | **श्रीदासरामचरित्र** (ओवीबद्ध)(द्वितीय आवृत्ती) | २०२० |
| ८६ | **आरती संग्रह** (द्वितीय आवृत्ती) | २०२१ |
| ८७ | **संजीवन पाठ** (द्वितीय आवृत्ती) | २०२१ |
| ८८ | **अमृतवाणी** (द्वितीय आवृत्ती) | २०२१ |
| ८९ | **श्रीदासरामायण** (द्वितीय आवृत्ती) | २०२१ |
| ९० | **शांतीब्रह्म मामा** (श्री. गणपतराव कानिटकर लिखित) | २०२१ |
| ९१ | **श्रीगोविंदचरितमानस** (ओवीबद्ध)(तृतिय आवृत्ती) | २०२१ |
| ९२ | **कूटार्थ बोधिनी** (कूट अभंगांवरील टीपा व विवरण) | २०२१ |
| ९३ | **अभंग तरंग** (प.पू.सद्गुरू श्रीदासराममहाराज केळकर संग्राहित संतांचे अभंग) | २०२१ |
| ९४ | **श्रीरामसुतामृत** (प.पू.श्रीअण्णामहाराज केळकर चरित्र) | २०२२ |
| ९५ | **श्रीदासरामरक्षास्तोत्र** | २०२३ |
| ९६ | **श्रीतात्यासाहेबमहाराज चरित्र** | २०२४ |